संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018
महासागर NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २५० * * अकोला * गुरुवार, दिनांक ६ मार्च २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

॥ परमात्मा एक ॥
मानव इंटरप्रायजेस मोबाईल शॉप
टि.व्ही. फ्रिज, वॉशिंग मशीन, मोबाईल रिचार्ज
0% FINANCE
SAMSUNG iPhone VIVO OPPO xiaomi LAVA ONEPLUS
7020267005 गजानन देशमुख 9284478885 सिद्धांत देशमुख
प्लॉट नं. १३, दुर्गा नगर, भरतवाडा, नागपूर-०४

अग्रलेख

## खरीखरी..

## असेच ठाम रहा देवेंद्रजी !

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांनी आपला दणका दाखवून दिलेला आहे. त्यांनी आपला व्हेटोचा अधिकार वापरला. त्यामुळे धनंजय मुंडे नावाच्या मुजोऱ्या करून कधीही मुंडी खाली न घालणाऱ्यांना स्वतःची मुंडी मुख्यमंत्र्यांच्या चरणापर्यंत खाली घालावी लागली. हे महागुंडीबाज मुंडे अनेक गुंडे हाताशी धरून बीड जिल्ह्यात मोगलाई पसरवीत होते. इतकेच नव्हे तर ते आधुनिक औरंगजेब मुघलच आहेत. यात अजिबात शंका नाही. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची जी विटंबना या महाभागाच्या चेल्यांनी केली. ती औरंगजेबाचीच वृत्ती होती, यात कसलाही संशय नाही. आपल्या देशात असेही जहरी सर्प आहेत, याची महाराष्ट्राला आज लाज वाटते. अजित दादांच्या आवरणाखाली आपली अनैतिक नैतिकता टिकवण्यासाठी या धनंजय मुंडे यांनी इतके दिवस राजीनामा देण्याचे टाळले. आताचा त्यांचा नाराजीनामा मुख्यमंत्री यांनी ठाम भूमिका घेतल्यामुळे त्यांना द्यावाच लागला. राजीनामा देता की बडतर्फ करू, इतक्या थराला गोष्ट गेल्यावरही स्वतःची खुर्ची सोडण्यासाठी हे गणंग तयार नव्हते. आपल्याला वाल्याचा वाल्मिकी झाल्याचे ठाऊक आहे. पण या कलियुगात हे धनंजयमित्र वाल्मिकीचा वाल्या झाला हे आपण डोळ्यांनी बघितले. सध्याचे मंत्रिमंडळ तीन पक्षांचे असले. तरी भारतीय जनता पक्षाशिवाय इतर दोन पक्ष भारतीय जनता पक्षाच्या मेहेरबानी मुळेच सत्तेत आहेत. अजून पाच-दहा आमदार मिळवणे. हे भारतीय जनता पक्षाला कठीण नाही. पण आता परवा मस्साजोगचे सरपंच देशमुखांच्या हत्येचा जो किळसवाणा प्रकार उघड झाला. त्यावरून मुंडे यांची ही मंडळी किती क्रूर आहेत. किती माणुसकीचे शत्रू आहेत, किती निर्लज्ज आहेत आणि किती निगरगट्ट आहेत. हे अत्यंत स्पष्टपणे दिसून आलेले आहे. भारतीय जनता पक्षाचे आमदार सुरेश धस यांनी बीड जिल्ह्यातील मुंडे यांचे हे धसकट अखेर सत्तेपार केले. एकीकडे धस आणि दुसरीकडे धनंजय मुंडे यांची बहीण पंकजा ताई या दोघांचाही अशा कृत्याला स्पष्ट विरोध होता. म्हणूनच पंकजाताईंनी आपल्या भावाने शपथ घ्यायलाच नको होती, असे म्हटल्याचे आम्हाला नवल वाटत नाही. मुंडे यांनी आपली खुर्ची वाचवण्यासाठी 'जी जान कोशिश' केली. पण परवा या निष्पाप सरपंचाच्या क्रूर हत्येचा प्रकार संपूर्ण जगाने दूरचित्रवाणीवर पाहिला. त्यामुळेच सगळ्या जगासमोर तो उघडकीस आला. त्याला सभ्य जगात अजिबात स्थान नाही. भारतीय जनता पक्षाला निवडणुकीपूर्वीची युती असल्यामुळे शिंदे यांची शिवसेना आणि अजित दादांची मुंडे सेना सांभाळून ठेवणे गरजेचे असले. तरी मित्र कर्तव्य म्हणून काही काळ प्रतीक्षा करणे आवश्यकच होते. मात्र महाराष्ट्राच्या तडफदार मुख्यमंत्र्यांना आमची अशी विनंती आहे की, त्यांनी अशा प्रकारच्या वाह्यातपणाला ठेचूनच काढले पाहिजे. देवेंद्रजी यांच्याबाबत त्यांचा शत्रूही अशा प्रकारचा आरोप करणार नाही. पण मुंडे यांचा राजीनामा घेण्यासाठी इतका वेळ लावल्यामुळे निश्चितच विरोधकांच्या हाती आयतेच कोलीत आले होते. असे म्हणणे अयोग्य ठरणार नाही. मंत्रिमंडळात आणखी असे कुणी नसतील, असे आम्हाला वाटते. पण समजा जरी कोणी असले आणि त्यांचे काही क्रूर कारनामे उघड झाले. तर जराही विलंब न लावता त्यांना चांगलेच लंबे केले पाहिजे. आता हे धनंजय मुंडे बीड जिल्ह्यात पुन्हा असले काही प्रकार करू नयेत. म्हणून सरकारने यापुढे अजून जागृत राहून, मुंडे यांच्या अशा पिल्लावळीच्या मुसक्या आवळल्या पाहिजेत. शेवटी महाराष्ट्र हे कल्याणकारी राज्य आहे आणि या राज्यात यापुढे असले प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली पाहिजे. देवेंद्रजी आपला नागपुरी पणा आणि ताठर बाणा असाच कायम ठेवतील आणि महाराष्ट्राला गुंडगिरीच्या व्याधीतून मुक्त करतील. याबद्दल आमच्या मनात तीळमात्र शंका नाही. कारण ते न्यायप्रिय आणि संवेदनशील व्यक्ती म्हणून ओळखले जातात. मुख्यमंत्र्यांच्या ठाम भूमिकेमुळेच मुंडेंची ही ब्याद कायमची संपली, असे आपण सध्या तरी समजले पाहिजे. गेल्या तीन चार महिन्यापासून सातत्याने तापत असलेल्या या घाणेरड्या प्रवृत्तीला होळीच्या पर्वाआधीच जाळून टाकता आले. त्याबद्दल मुख्यमंत्री अभिनंदनास पात्र आहेत.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

आमदार अबू आझमींच्या औरंगजेब प्रेमावरून

# सत्ताधाऱ्यांचाच गदारोळ

दोन्ही सभागृहे ठप्प, मुंडेंच्या राजीनाम्यावर आक्रमक होण्याची विरोधकांना संधीच नाही



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :** मोगल बादशहा औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता. त्याच्यात व छत्रपती संभाजी महाराज यांच्यात धमार्ची लढाई नव्हती. उलट त्याच्याच काळात भारताला सोन्याची खाण म्हणून संबोधले जाते होते, असे औरंगजेबप्रेमी वक्तव्य समाजवादी पार्टीचे आमदार, प्रदेशाध्यक्ष अबू आझमी यांनी सोमवारी केले. त्याचे पडसाद मंगळवारी उमटले.

आझमींवर देशद्रोहाचे कलम लावून कारवाई करावी, या मागणीसाठी विधानसभा आणि विधान परिषदेत सत्ताधाऱ्यांनीच गदारोळ केला. त्यामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज तहकूब करण्यात आले. परिणामी मंत्री धनंजय मुंडे राजीनामा प्रकरणावर आक्रमक होण्याची संधी विरोधकांना मिळालीच नाही.

विधानसभेचे कामकाज मंगळवारी सकाळी ११ वाजता सुरू होताच आमदार महेश लांडगे, अतुल भातखळकर, गुलाबराव पाटील आणि सुधीर मुनगंटीवारांनी आझमींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्यांच्या निलंबनाची मागणी केली. उद्धवसेनेचे आमदार भास्कर जाधव यांनी आझमींसह राहुल सोलापूरकर, प्रशांत कोरटकरवरही कारवाईचा मुद्दा लावून धरला.

पण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आझमींविरुद्ध आक्रमकपणे बोलत राहिले. आदित्य ठाकरेंच्या सूचनेवरून उद्धवसेनेच्या आमदारांनीही घोषणा दिल्या तर काँग्रेस, शरद पवार गट शांत होता.

### आमदार आझमींचे सदस्यत्व अधिवेशनभरासाठी रद्द

अर्थसंकल्पीय अधिवेशन संपेपर्यंत आमदार अबू आझमी यांचे सदस्यत्व रद्द करण्याचा ठराव सत्ताधारी पक्षाने सभागृहात मांडला. संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी हा प्रस्ताव विधानसभेत सादर केला, ज्याला अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मतविभाजनाद्वारे मंजुरी दिली. या निर्णयावर चर्चा सुरू असताना, माजी मंत्री व भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी फक्त अर्थसंकल्पीय अधिवेशनापुरते निलंबन न करता, एक आमदारांची समिती स्थापन करून छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करून औरंगजेबाची स्तुती करणाऱ्यांवर पुढेही निलंबन वाढवावे, अशी मागणी केली.

दुसरीकडे आझमी म्हणाले की, मी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज किंवा इतर कोणत्याही महापुरुषाबद्दल अपमानास्पद टिप्पणी केलेली नाही. पण माझ्या बोलण्याने कुणी दुखावले असेल तर मी माझे शब्द, माझे विधान मागे घेतो.

**कठोर कारवाईचे सभापतींचे निर्देश**

दरम्यान, विधान परिषदेतही आझमी प्रकरणामुळे कामकाज होऊ शकले नाही. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, अनिल परब, काँग्रेसचे सतेज बंटी पाटील आदींनी राहुल सोलापूरकर, प्रशांत कोरटकरविषयीही चर्चेची मागणी केली.

सत्ताधाऱ्यांनी औरंगजेब छत्रपती शिवाजी महाराजांच्या पाया पडत असल्याचे बॅनर झळकवून घोषणाबाजी केली. त्यानंतर सभापती राम शिंदे यांनी राष्ट्रपुरुषांचा अवमान करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे निर्देश दिले. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आझमींवर देशद्रोहाचे कलम लावावे.

## महाविकास आघाडी करणार का नेहरू, आव्हाडांचा निषेध?

मुख्यमंत्री फडणवीसांचा विरोधकांना सवाल



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :** औरंगजेबाबद्दल बोलणाऱ्या अबू आझमींना १०० टक्के जेलमध्ये टाकणार आहे. पण औरंगजेबाचे उदात्तीकरण करणाऱ्या आव्हाडांचा मविआने निषेध केला का असा सवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी डिस्कव्हरी ऑफ इंडियामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल जे म्हटलंय त्यांचा निषेध तुम्ही करणार आहात का?, ही हिंमत आहे का तुमच्यामध्ये. जितेंद्र आव्हाड यांच्या वक्तव्याचा तुम्ही निषेध केला नाही, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर बॉम्ब टाकला.

फडणवीस पुढे म्हणाले की, आम्ही छत्रपती शिवाजी महाराज, शंभुराजे यांचा अपमान सहन करणार नाही. मविआच्या लोकांमध्ये पंडीत नेहरु यांचा निषेध करण्याची हिंमत आहे का? असा सवाल त्यांनी केला.

**कोरटकर हा चिल्लर....**

विधान परिषदेमध्ये बोलत असताना फडणवीस म्हणाले की, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी प्रशांत कोरटकरबद्दल संपूर्ण माहिती घेऊन बोलले पाहिजे. कोरटकर याने कोल्हापूर कोर्टातून स्थगिती घेतली आहे. मी त्यांच्यावर जाण्यासाठी सांगितले आहे. कोरटकर हे चिल्लर लोकं आहेत, असे ते म्हणाले.

**फर्मली डील अन् राजीनामा...**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी बुधवारी धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्यास विलंब झाल्याची स्पष्ट कबुली दिली. आरोपी मंत्र्यांच्या जवळचा होता. त्यामुळे मंत्र्यांनी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा देण्याची गरज होती. पण आघाडीचे सरकार आहे. त्यामुळे निर्णय घेण्यास उशीर झाला. पण आम्ही फर्मली डील केले आणि त्यांनी राजीनामा दिला, असे ते म्हणालेत. आरोपपत्र दाखल केल्यानंतरच मी देशमुख हत्याकांडाचे फोटो पाहिले, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले. राजकारणात पहिला दिवस असो की शेवटचा लोकांना जे बोलायचे असते ते बोलतात, पण राजीनामा घेतला गेलाच, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## राहुल गांधींना दंड

■ **वृत्तसंस्था, लखनौ, दि. ५ :** लखनौच्या एका न्यायालयाने बुधवारी काँग्रेस नेते राहुल गांधी यांना २०० रुपयांचा दंड ठोठावला. सुनावणीला सतत गैरहजर राहिल्याबद्दल अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी (एसीजेएम) न्यायालयाने दंड ठोठावला.

तसेच १४ एप्रिल २०२५ रोजी न्यायालयात हजर राहावे, जर ते या तारखेलाही हजर राहिले नाहीत तर कठोर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते, असा इशारा दिला.

तक्रारदार नृपेंद्र पांडे यांच्या मते, राहुल गांधी यांनी १७ डिसेंबर २०२२ रोजी महाराष्ट्रातील अकोला येथे आयोजित पत्रकार परिषदेत स्वातंत्र्यसैनिक वीर सावरकर यांच्याबद्दल वादग्रस्त विधान केले होते. त्यांनी सावरकरांना 'ब्रिटिशांचे सेवक' आणि 'पेन्शनधारक' म्हटले होते.

## मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती

नाशिक सत्र न्यायालयाचा निर्णय



■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. ५ :** राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांच्यावर असलेल्या शिक्षेला नाशिक सत्र न्यायालयाने स्थगिती दिली आहे. २० वर्षांपूर्वी सदनिका लाटल्याच्या प्रकरणात कोकाटे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता, आणि त्यासंदर्भातील खटला अद्याप न्यायप्रविष्ट आहे.

या प्रकरणात न्यायालयाने काही दिवसांपूर्वी त्यांना शिक्षा सुनावली होती. मात्र, कोकाटे यांनी याविरोधात सत्र न्यायालयात आव्हान दिले. न्यायालयाने त्यांच्या याचिकेची दखल घेत शिक्षेला तात्पुरती स्थगिती दिली आहे. या निर्णयामुळे कोकाटे यांना राजकीय आणि वैयक्तिक दोन्ही पातळीवर मोठा दिलासा मिळाला आहे. आता या प्रकरणाचा पुढील न्यायालयीन लढा कसा असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## प्रमाणपत्रांसाठी लागणारे मुद्रांक शुल्क माफ

महसूलमंत्री बावनकुळे यांचा निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :** राज्यातील लाखो विद्यार्थ्यांसह कोट्यवधी नागरिकांना दिलासा देणारा मोठा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेयर सर्टिफिकेट आणि राष्ट्रीयत्व प्रमाणपत्रासह शासकीय कार्यालयात दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रांसाठी लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क (स्टॅम्प ड्यूटी) माफ करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे विशेषतः दहावी आणि बारावीच्या निकालानंतर प्रमाणपत्रांसाठी होणारा ३ ते ४ हजार रुपयांचा खर्च वाचणार आहे. यापुढे अर्जदारांना एका साध्या कागदावर स्वसाक्षांकित अर्ज लिहून तहसील कार्यालयातून आवश्यक प्रमाणपत्र मिळू शकेल.

महसूलमंत्री बावनकुळे यांनी या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. हा निर्णय लागू झाल्यामुळे नागरिकांची आर्थिक बचत होणार असून, प्रमाणपत्र काढण्याच्या प्रक्रियेत सुलभता येणार आहे.

भूमिगत मॅग्नीज खाणीचा बोगदा खचला

## दोघांचा मृत्यू, १ जखमी



■ **महासागर प्रतिनिधी भंडारा, दि. ५ :** भंडारा जिल्ह्यातल्या चिखला भूमिगत मॅग्नीज खाणीचा बोगदा खचून दोघांचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. बुधवारी सकाळी ही घटना घडली.

चिखला मोइल वर्टीकल दोन अंडरग्राउंड लेव्हल ३ मध्ये १०० मीटर खोली असलेल्या ठिकाणी पहिल्या शिपचे कामगार काम करत होते. सकाळी ९ वाजता स्लॅब कोसळला. या ढिगाऱ्याखाली तीन कामगार दबले. त्यातील दोन कामगारांचा जागीच मृत्यू झाला. विजय नंदलाल (५०), रा. खरपडी तिरोडी, अरुण चोरमार (४१), रा. सीतासावंगी, अशी त्यांची नावे आहेत. शंकर सहदेव विश्वकर्मा जखमी आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी जखमींची भेट घेऊन विचारपूस केली.

## दोन जहाल नक्षलवाद्यांना अटक



■ **महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि.५ :** भामरागडचे माजी पंचायत समिती सभापती सुखराम मडावी यांच्या हत्या प्रकरणासह दिरंगी- फुलनार जंगलात चकमकीत सी- ६० जवान महेश नागुलवार या जवानाचा बळी घेताना झालेल्या चकमकीत सक्रिय सहभाग असलेल्या दोन जहाल नक्षलवाद्यांना पोलिसांनी आरेवाडा जंगलात अटक केली. ५ मार्च रोजी ही कारवाई करण्यात आली.

कंपनी क्र. १० चा प्लाटून पार्टी कमिटी मेंबर केलू पांडू मडकाम उर्फ दोळवा (२६,रा. मुरकुम ता. उसूर जि. बिजापूर, छत्तीसगड) व भामरागड दलमची सदस्य रमा दोहे कोरचा उर्फ डुम्मी (३२,रा. मेंढरी ता. एटापल्ली ) अशी त्यांची नावे आहेत. त्या दोघांवर शासनाचे ८ लाखांचे बक्षीस होते.

छत्तीसगड सीमेवरील कियेर येथे माजी पंचायत समिती सभापती सुखराम मडावी (४७) यांची १ फेब्रुवारीला गळा दाबून हत्या करत नक्षलवाद्यांनी त्यांच्या मृतदेहावर पत्रक सोडले होते. दरम्यान, ११ फेब्रुवारी रोजी दिरंगी- फुलनार जंगलात पोलिस व नक्षलवाद्यांत चकमक झाली होती. यात महेश नागुलवार या जवानाने नक्षलवाद्यांशी लढताना आपल्या प्राणाची आहुती दिली होती.

या दोन्ही प्रकरणांत या दोघांचा सक्रिय सहभाग होता. भामरागड तालुक्यातीलल आरेवाडा जंगल परिसरामध्ये ते दोघे फिरत असल्याची माहिती मिळाल्यावरुन पोलिस पथक व सीआरपीएफच्या ३७ बटालियनचे जवान यांनी संयुक्त मोहीम राबवून त्यांना मोठ्या शिताफीने जेरबंद केले.

## न्यूझीलंडचा सर्वाधिक स्कोअर



चॅम्पियन्स ट्रॉफी

दक्षिण आफ्रिकेला ३६३ धावांचे लक्ष्य

न्यूझीलंडची ही सर्वोच्च धावसंख्या गणली गेली. संघाकडून, रचिन रवींद्र (१०८ धावा) आणि केन विल्यमसन (१०२ धावा) यांनी शतके झळकावली.

■ **वृत्तसंस्था, लाहोर, दि. ५ :** चॅम्पियन्स ट्रॉफीच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिका ३६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अडखळताना दिसला.

बुधवारी, लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला आणि ६ गडी बाद ३६२ धावा केल्या. स्पर्धेच्या इतिहासातील ही सर्वोच्च धावसंख्या आहे. याच मैदानावर ऑस्ट्रेलियाने इंग्लंडविरुद्ध ३५६ धावा केल्या होत्या.

न्यूझीलंड संघाकडून, रचिन रवींद्र (१०८ धावा) आणि केन विल्यमसन (१०२ धावा) यांनी शतके झळकावली, तर डॅरिल मिशेल आणि ग्लेन फिलिप्स अर्धशतक करण्यात अपयशी ठरले. दोघांनीही ४९-४९ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेचे गोलंदाज लुंगी एनगिडीने ३ विकेट्स घेतल्या. रबाडाने २ विकेट घेतल्या. वेन मुल्डरने एक विकेट घेतली.

न्यूझीलंडने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ सुरूवातीला आक्रमक दिसून आला खरा .मात्र, नंतर त्यांचे गडी एकापाठोपाठ बाद होत गेले . एकवेळ २८ षटकांत २ बाद १६६ धावा अशी स्थिती असलेला दक्षिण आफ्रिकेचा संघ नंतर कोलमडला. मिचेल सँटनरने रॅसी व्हॅन डर ड्यूसेन (६९) आणि कर्णधार टेम्बा बावुमा (५६) यांना माघारी पाठवले. रायन रिकेल्टनला (१७ धावा) मॅट हेन्रीने पायचीत केले.

अखेरचे वृत्त हाती आले त्यावेळी दक्षिण आफ्रिकेची स्थिती ३५.३ घटकात १९८ वर ३ बाद अशी होती.

## १५ किलो सोन्यासह अभिनेत्रीला पकडले

■ **वृत्तसंस्था, बंगळुरू, दि. ५ :** कन्नड अभिनेत्री रान्या राव हिला बेंगळुरू आंतरराष्ट्रीय विमानतळावर १४.८ किलो सोन्यासह महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) अटक केली.



रान्या ही कर्नाटक पोलिस गृहनिर्माण महामंडळाचे पोलिस महासंचालक (डीजीपी) रामचंद्र राव यांची सावत्र मुलगी आहे. तिने 'माणिक्य' आणि 'पत्की' या कन्नड चित्रपटांमध्ये काम केले आहे. सध्या तिला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

रान्या राव दुबईहून एमिरेट्सच्या विमानाने भारतात परतली. गेल्या १५ दिवसांत ती चार वेळा दुबईला गेली असल्याने सुरक्षा यंत्रणा तिच्या हालचालींवर आधीच लक्ष ठेवून होत्या. तपासात असे दिसून आले की राण्याने दागिन्यांच्या खोलीत काही सोने घातले होते. तसेच, तिने त्याचा काही भाग तिच्या कपड्यांमध्ये लपवला होता. तिला कोठडी सुनावण्यात आली आहे.

## कमबख्त को यूपी भेज दो, ईलाज....

आझमीच्या विधानावर सीएम योगी भडकले

■ **वृत्तसंस्था, लखनौ, दि. ५ :** समाजवादी पार्टीचे आमदार अबू आझमी यांनी औरंगजेबाबचे कौतुक करत वादग्रस्त विधान केले होते. या विधानाचे राज्यभरात पडसाद उमटले.

महाराष्ट्र विधानसभेसह उत्तर प्रदेशातील विधानसभेत अबू आझमींच्या विधानावरून वाद दिसून आला. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी नाव न घेता अबू आझमी यांच्या जोरदार हल्ला चढवला. त्या कमबख्तला एकदा उत्तर प्रदेशला पाठवा, आम्ही त्यांचा उपचार करु, असे आदित्यनाथ म्हणाले. यावेळी त्यांनी सभागृहात बोलताना समाजवादी पार्टीवर जोरदार हल्ला चढवला.

योगी आदित्यनाथ म्हणाले की, समाजवादी पक्षाचे एक नेते आहेत. त्या कमबख्तला औरंगजेब आवडतो. तो औरंगजेबाला आपला आदर्श मानतो. जर तुमच्यात हिंमत असेल तर त्याला पक्षातून काढून टाका. अशा लोकांना उत्तर प्रदेशात पाठवा, आम्ही त्याचा चांगला उपचार करू.

## सरदेसाई वाड्यात उभारणार छत्रपती संभाजी महाराजांचे भव्य स्मारक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी शिवसृष्टी संदभार्तील प्रश्न उपस्थित केला होता.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरदेसाई वाड्यात भव्य स्मारक उभारणार असल्याची घोषणा केली आहे. छत्रपती संभाजी महाराज हे शौर्याचे प्रतीक आहेत. ते धर्मवीर, स्वराज्यारक्षक आहेत. सरदेसाई वाड्यात उचित प्रकारचे स्मारक उभारण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दलचा इतिहास जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली आहे. छत्रपती संभाजी महाराज यांना संगमेश्वर येथील सरदेसाई वाडा येथे कैद करण्यात आले होते. हा वाडा पाहण्यासाठी अनेक पर्यटक गर्दी करत आहेत. मात्र वाड्याची दुर्दशा पाहून त्यांची निराशा होते आहे.

छत्रपती संभाजी महाराजांना कैद केले होते तो वाडा अधिग्रहीत करून तेथे छत्रपती संभाजी महाराजांना साजेसे स्मारक उभारण्याकरिता राज्य सरकार पुढाकार घेईल. छत्रपती संभाजी महाराज हे शौर्याचे प्रतिक आहे. या वाड्यात स्मारक उभारण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

# महिलेला स्वतःचे नग्न फोटो पाठवल्याचा आरोप

## पीडितेचा विधिमंडळापुढे उपोषण करण्याचा इशारा



■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. ५ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारमधील आणखी एक मंत्री अडचणीत सापडण्याची चिन्हे आहेत. फडणवीस यांचे निकटवर्तीय असणारे कॅबिनेट मंत्री जयकुमार गोरे यांच्यावर एका महिलेला स्वतःचे विवस्त्र फोटो पाठवल्याचा आरोप झाला आहे.

या महिलेने या प्रकरणी योग्य ती कारवाई झाली नाही, तर १७ मार्चपासून विधान भवनासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. यामुळे राजकीय वर्तुळात एकच हल्लकल्लोळ माजला आहे. पीडित महिलेने यासंबंधी राज्यपालांसह मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व विरोधी पक्षांच्या नेत्यांना पत्र पाठवून मंत्री जयकुमार गोरे यांची हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे. आपल्या पत्रात पीडितेने हे संपूर्ण प्रकरण विषद केले आहे. त्यानुसार, सातारा जिल्ह्यातील माण-खटाव मतदारसंघाचे जयकुमार गोरे हे आमदार आहेत. २०१६ मध्ये आमदार असताना जयकुमार गोरे यांनी सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या घराण्यातील वारस असलेल्या महिलेला त्रास देण्यास सुरुवात केली.

त्यांनी अनेक महिने स्वतःचे नग्न फोटो महिलेला व्हॉट्सॲपवर पाठवले होते. या त्रासाला कंटाळून महिलेने सातारा पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर जयकुमार गोरेंवर गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर अटक टाळण्यासाठी गोरेंनी प्रथम सातारा जिल्हा न्यायालय आणि नंतर मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. पण न्यायालयाने त्यांचा अटकूपर्व जामीन अर्ज फेटाळला. त्यानंतर गोरे यांना अटक होऊन १० दिवसांची जेलवारीही झाली होती.

### पीडिता सरसेनापती हंबीररावांच्या घराण्यातील

जयकुमार गोरे यांच्याकडून सोशल मीडियावर बदनामी सुरू आहे. याचा कुटुंबाला खूपच त्रास होत असल्याची तक्रार पीडितेने सातारा जिल्हाधिकाऱ्यांकडे मांडली होती. तेव्हा त्यांनी पोलिस अधीक्षक संपर्क साधतील, असे सांगितले. पण पुढे काहीच झाले नाही. मी सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या घराण्यातील आहे. काहीही दोष नसताना मला त्रास दिला जात आहे, असा आरोप पीडितेने आपल्या पत्रात केला आहे.

### गोरेंची न्यायालयात लेखी माफी, पण पुन्हा त्रास

या घटनाक्रमानंतर जयकुमार गोरे यांनी २०१६ मध्ये सातारा जिल्हा न्यायालयात पीडित महिलेची लेखी माफी मागितली. तसेच पुन्हा त्रास देणार नाही, अशी वकिलांमार्फत हमीही दिली. पण आता महायुती सरकारमध्ये जयकुमार गोरे यांना ग्रामविकास मंत्रिपदाचे बक्षीस देण्यात आले आणि त्यांनी महिलेला पुन्हा त्रास देण्यास सुरुवात केली. जानेवारी २०२५ पासून अनेक व्हॉट्सॲप ग्रुपवर पीडितेने २०१६ मध्ये दाखल केलेली तक्रार व्हायरल करण्यात आली. त्यामुळे पीडितेचे नाव उघड झाले. तिची बदनामी केली गेली. ९ जानेवारी २०२५ रोजी पीडित महिलेच्या घरी पत्र आले. त्यात २०१६ची तक्रार होती. हे पत्रही सोशल मीडियावर व्हायरल करून तिची बदनामी सुरू आहे, असे पीडित महिलेने आपल्या पत्रात म्हटले आहे.

### पीडितेविरोधात खंडणीची खोटी तक्रार दाखल

जयकुमार गोरे यांनी आपले पीए अभिजित काळे यांच्यामार्फत माझ्याविरोधात दहिवाडी पोलिस ठाण्यात २ कोटी खंडणीची तक्रार दाखल करून दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. या तक्रारीचे पुढे काय झाले हे माहीत नाही. मी खरी होते आणि आहे हेच यावरून सिद्ध होते, असेही पीडितेने म्हटले आहे.

# दुग्धशाळा वसाहतींच्या विकासासाठी शासन एकात्मिक योजना राबवणार का?

## भाजपा गटनेते प्रविण दरेकर यांचा सवाल

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. ५ : राज्यातील दुग्धशाळा वसाहतींच्या इमारतींचा विकास क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून करण्यासाठी शासन एकात्मिक योजना तयार करणार का? असा महत्त्वाचा सवाल विधान परिषदेत भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकर यांनी उपस्थित केला.

### दुग्ध विकास विभागाच्या तारांकित प्रश्नावर चर्चा

आज विधान परिषदेत दुग्ध विकास विभागाच्या तारांकित प्रश्नावर चर्चा सुरू असताना, आ. प्रविण दरेकर यांनी दुग्धशाळा वसाहतींच्या पुनर्विकासासाठी शासनाकडून ठोस योजना तयार करण्याची मागणी केली. सभागृहात बोलताना आ. दरेकर म्हणाले, राज्यातील दुग्धशाळा वसाहतींच्या इमारती जुन्या व मोडकळीस आलेल्या आहेत. क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून त्यांचे पुनर्विकासाचे नियोजन झाले, तर त्यातून रहिवाशांसाठी उत्तम घरे उपलब्ध होतील आणि त्या घरांचा उपयोग शासकीय कर्मचाऱ्यांसाठीही करता येईल. त्यांनी पुढे सांगितले की, राज्य सरकार सध्या गृहनिर्माण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणत आहे आणि अनेक नवीन योजनांची अंमलबजावणी करत आहे. त्यामुळेच अशा दुग्धशाळा वसाहतींचा समावेश करून त्यांचा एकात्मिक विकास करण्याची योजना तयार करण्याबाबत सरकार काय विचार करत आहे?

### दुग्ध विकास मंत्र्यांचे उत्तर सकारात्मक भूमिका

दरेकर यांच्या प्रश्नावर उत्तर देताना दुग्ध विकास मंत्री अतुल सावे म्हणाले, दरेकर यांनी मांडलेली सूचना सरकार गांभीर्याने विचारात घेईल. राज्यातील ज्या डेअरीच्या जागा आहेत, त्याठिकाणी गृहनिर्माण योजनांच्या माध्यमातून काही करता येऊ शकते का, याचा शासन नक्की विचार करेल आणि पुढील काळात योग्य तो प्रयत्न केला जाईल.

### वसाहतींच्या विकासासाठी लवकरच निर्णयाची अपेक्षा

या चर्चेमुळे दुग्धशाळा वसाहतींच्या पुनर्विकासासंदर्भात राज्य सरकारकडून लवकरच ठोस निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. दुग्ध व्यवसायाशी संबंधित नागरिक आणि कर्मचाऱ्यांना या योजनेचा मोठा फायदा होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# संतोष देशमुख प्रकरणी धनंजय मुंडे यांना सहआरोपी करा



विजय वडेट्टीवार यांची मागणी

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. ५ :संतोष देशमुख प्रकरणात धनंजय मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला असला तरी त्याने हा प्रश्न सुटणार नाही. या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी धनंजय मुंडे यांना सहआरोपी करावे, अशी मागणी काँग्रेस विधीमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली. बीडमध्ये अनेक गंभीर गुन्हे घडले आहेत, खंडणी आणि खुनाच्या घटना समोर आल्या आहेत. मुंडे यांना सहआरोपी केल्यास अशा अनेक गुन्ह्यांचा उलगडा होईल, असा दावा त्यांनी केला. महाराष्ट्र बिहारच्या पुढे गेला आहे का? असा सवाल करत, वडेट्टीवार यांनी राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. महायुती सरकारमधील मंत्र्यांचे कारनामे उघड होत असून, पश्चिम महाराष्ट्रातील एका पैलवान मंत्र्याने एका महिलेला विवस्त्र फोटो पाठवल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. त्या मंत्र्यावर शिक्षा होऊनही तो केवळ दहा हजार रुपये दंड भरून मोकळा झाला आणि पुन्हा त्या महिलेच्या मागे लागला. महिलेला ब्लॅकमेल करण्यात आले. जर भाजपच्या मंत्र्यांचे वर्तन असे असेल, तर राज्यातील महिलांचे संरक्षण कसे होणार? असा सवाल वडेट्टीवार यांनी केला. उत्तर महाराष्ट्रातील एका मंत्र्याने राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांची २६ एकर जमीन बळकावल्याचा आरोपही त्यांनी केला. या मंत्र्यांनी काळे धंदे सुरू केले असून, त्यांना मंत्रिपदावर राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही. त्यांच्यावर त्वरित कारवाई केली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तिस?या दिवशी पत्रकार परिषदेत बोलताना विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारमधील मंत्र्यांचे कारनामे उघड केले. यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या पक्षांतराच्या चर्चांवर उत्तर देताना वडेट्टीवार म्हणाले, मी पुरोगामी विचारधारेशी जोडलेलो आहे. काँग्रेसचा निष्ठावान शिपाई आहे. सत्ता मिळो वा न मिळो, मी पक्षाशी एकनिष्ठ राहणार. जातीयवादी शक्तींसोबत जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. माझ्याबाबत अफवा पसरवली जात आहे. असे त्यांनी स्पष्ट केले.

## वाघ आणि बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये भीती

### साखळी कुंपणासाठी २०० कोटींचा निधी मंजूर

मुंबई, दि. ५ : राज्यात वाघांची संख्या वाढल्यामुळे नागरिकांच्या जीवितासह शेतीचे मोठे नुकसान होत आहे. भंडारा जिल्ह्यालगत असलेल्या कोका वन्यजीवन अभयारण्याच्या बफर झोनमधील एका गावात वाघाने महिलेवर हल्ला करून तिचा जीव घेतला. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी वन विभागाच्या विरोधात चक्काजाम आंदोलन केले. तसेच, बिबट्यांच्या हल्ल्यामुळेही जीवितहानी होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस विधीमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत लक्षवेधी प्रश्न उपस्थित करत, ज्या गावांमध्ये वाघ आणि बिबट्यांचा वावर आहे, त्या गावांना साखळी कुंपण घालण्याची मागणी केली. त्यांनी सांगितले की, वन्यप्राण्यांमुळे शेतकजयांना शेतीच्या कामात अडथळा येत आहे. शेतकरी भयभीत असल्याने शेती हंगामात शेतात जाऊ शकत नाहीत. त्यामुळे जंगलालगतच्या गावांची नोंद घेऊन सोलर किंवा साखळी कुंपण करण्याची तातडीची आवश्यकता आहे. या मुद्द्यावर उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी वाघांची संख्या २००० साली १०१ होती, जी २०२५ पर्यंत ४४४पर्यंत वाढली आहे, असे स्पष्ट केले. वाघ आणि बिबट्यांच्या हल्ल्यांवर नियंत्रण आणण्यासाठी सरकारने सोलर फेन्सिंगसाठी कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. तसेच, साखळी कुंपणासाठीही सरकार सकारात्मक असून, त्यासंदर्भात लवकरच पुढील निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी आश्वासन दिले. वाघ आणि बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे वाढलेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शुक्रवारी संबंधित लोकप्रतिनिधींसोबत विशेष बैठक घेण्याचे निर्देश दिले आहेत. या बैठकीत वाघ आणि बिबट्यांपासून नागरिकांचे रक्षण करण्यासाठी पुढील उपाययोजना ठरवण्यात येणार आहेत.

## मुख्यमंत्र्यांकडून मंत्री अतुल सावे यांचे अभिनंदन

मुंबई, दि. ५ : ओबीसी विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री अतुल सावे यांचे खास अभिनंदन केले आहे. सावे यांनी केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष कृती करत५४ ओबीसी वसतिगृहे सुरू केली, त्यामुळे मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या चर्चेदरम्यान, अतुल सावे यांनी ओबीसी विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या योजनांची माहिती सभागृहात दिली. राज्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी निवासाची मोठी समस्या आहे. त्यावर तातडीने निर्णय घेत, सावे यांनी प्रस्तावित ७२वसतिगृहांपैकी ५४ वसतिगृहे सुरू केली. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना राहण्याची चांगली सुविधा मिळणार आहे. याशिवाय, ओबीसी विद्यार्थ्यांना मिळणारे विद्यावेतन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णयही सरकारने घेतला आहे. या पावलामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल आणि विद्यार्थ्यांना वेळेवर आर्थिक मदत मिळेल. सभागृहातील सर्व सदस्यांनी सावे यांच्या या कार्याचे कौतुक केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील त्यांचे अभिनंदन करत, इतर मंत्र्यांनीही अशाच पद्धतीने काम करावे, असे मत व्यक्त केले. ओबीसी विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी घेतलेल्या या निर्णयाचे समाजाच्या विविध स्तरांतून स्वागत केले जात आहे. सरकारच्या या पुढाकारामुळे शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या अपमानाच्या निषेधार्थ विरोधकांचे पायऱ्यांवर आंदोलन

मुंबई, दि. ५ : छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केल्याच्या आरोपावरून विरोधकांनी विधानभवनाच्या पाय?यांवर तीव्र आंदोलन केले. राहुल सोलापूरकर आणि प्रशांत कोरटकर यांच्या विरोधात त्वरित कारवाईची मागणी करत काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवारगट) यांचे आमदार एकवटले. विरोधकांनी कोश्यारी ते कोरटकर, भाजपकडून छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान असा आरोप करत आक्रमक भूमिका घेतली. तसेच, सोलापूरकर ते कोरटकर, अटक करा अशा घोषणा देत या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी विधानसभेचे कामकाज सुरू होण्यापूर्वीच विरोधकांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर उतरून आंदोलन केले. या आंदोलनामुळे वातावरण तापले असून, राज्य सरकार यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## प्रत्येक तीन जिल्ह्यांसाठी एक संपर्क मंत्री नेमणार

मुंबई, दि. ५ : भाजप आणि शिवसेनेच्या धर्तीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटानेही पक्ष बळकटीसाठी नवा निर्णय घेतला आहे. पक्षाच्या संघटनेला मजबुती देण्यासाठी प्रत्येक तीन जिल्ह्यांसाठी एक संपर्क मंत्री नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संपर्क मंत्र्यांची मुख्य जबाबदारी पक्ष संघटन मजबूत करणे आणि महायुतीमध्ये समन्वय राखणे अशी असणार आहे. तसेच, स्थानिक कार्यकर्त्यांच्या अडचणी सोडवणे, त्यांच्या कामाला महत्त्व देणे आणि त्यांना बळकटी देणे हेही यामागील उद्दिष्ट आहे. संपर्कमंत्र्यांमुळे पक्षाची गटपातळीवरील सुसूत्रता वाढेल, असे पक्षाचे मत आहे. येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाचे संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. संपर्क मंत्री कार्यकर्त्यांसोबत थेट संवाद साधून पक्षाच्या धोरणांची अंमलबजावणी करतील. त्यामुळे पक्षाला स्थानिक पातळीवर अधिक बळकटी मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. भाजप आणि शिवसेनेप्रमाणेच राष्ट्रवादी काँग्रेसनेही हा निर्णय घेतल्याने राज्याच्या राजकारणात नवा राजकीय तडका पाहायला मिळणार आहे.

# अणुशक्तीनगर मतदारसंघातील प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. ५ : अणुशक्तीनगर विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावेत, असे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. मुंबई महानगरपालिकेने सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठवावा, असे आदेश त्यांनी दिले.

### महत्त्वाच्या विषयांवर बैठक

अणुशक्तीनगर मतदारसंघातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रालयातील समिती कक्षात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, आमदार सना मलिक, माजी मंत्री नवाब मलिक, तसेच वित्त व नियोजन, नगरविकास, बंदरे, मत्स्यव्यवसाय, वैद्यकीय शिक्षण, अन्न व नागरी पुरवठा, बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र मेरिटाइम बोर्ड आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुंबईतील विद्यमान शिधावाटप कार्यालयांची पुनर्रचना करून अणुशक्तीनगर परिसरात नवीन



शिधावाटप कार्यालय सुरू करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. तसेच, १ एप्रिल रोजी या कार्यालयाचे उद्घाटन करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

ट्रॉम्बे व मुंबई परिसरातील मच्छीमार समुदायाच्या कल्याणासाठी जाळी विणकाम गृह, सार्वजनिक शौचालय, विद्युतीकरण, पाणीपुरवठा आणि अंतर्गत रस्ते यासारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाईल. या सुविधांसाठी नाबार्डकडे ६१ कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठवण्यात आला असून, त्याचा पाठपुरावा करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

मुंबईतील आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यासाठी तातडीने प्रस्ताव पाठवण्याचे आदेश त्यांनी दिले. यामुळे वैद्यकीय शिक्षणाच्या संधी वाढण्यासोबतच नागरिकांना उत्तम आरोग्यसेवा मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

### तत्काळ अंमलबजावणीचे निर्देश

या बैठकीत उपस्थित सर्व विभागांना आपापल्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. उपमुख्यमंत्री पवार यांनी स्पष्ट केले की, नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन हे निर्णय घेतले जात असून, त्यांच्या अंमलबजावणीला कोणतीही दिरंगाई चालणार नाही.

या निर्णयांमुळे अणुशक्तीनगर आणि ट्रॉम्बे परिसरातील नागरिकांना महत्त्वपूर्ण सुविधा मिळणार असून, वैद्यकीय शिक्षण आणि मच्छीमारांच्या जीवनमानाच्या सुधारण्यासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरणार आहे.

# कोर्टाच्या तारखा लवकर, पण एमआरआय-सिटी स्कॅनसाठी प्रतीक्षा : राहुल नार्वेकर

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. ५ : कोर्टाच्या तारखा लवकर मिळतात, पण एमआरआय आणि सिटी स्कॅनच्या तारखा मिळत नाहीत, अशा शब्दांत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी राज्यातील सरकारी रुग्णालयांमधील आरोग्य सुविधांबाबत नाराजी व्यक्त केली. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तिस?या दिवशी प्रश्नोत्तर तासात अकोला पश्चिमचे काँग्रेस आमदार साजिद पठाण यांनी अकोला जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमआरआय मशीन उपलब्ध नसल्याने रुग्णांचे हाल होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. या प्रश्नावर उत्तर देताना वैद्यकीय



शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी अशी परिस्थिती नसल्याचे सांगितले. मात्र, त्यांच्या उत्तरावर अनेक आमदारांनी आक्षेप घेतला. विरोधकांच्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर विधानसभा अध्यक्षांनी स्वत:च्या मतदारसंघातील परिस्थिती सांगत सरकारी रुग्णालयांमध्ये एमआरआय आणि सिटी स्कॅनसाठी रुग्णांना मोठी प्रतीक्षा करावी लागत असल्याचे स्पष्ट केले.

त्यांनी सेंट जॉर्ज हॉस्पिटल, जी.टी. इस्पितळ आणि सर जे.जे. इस्पितळातील स्थितीवरही प्रकाश टाकला. या परिस्थितीवर त्वरित उपाययोजना व्हाव्यात, यासाठी लवकरच सविस्तर निवेदन सादर करण्याचे निर्देशही नार्वेकर यांनी दिले. सरकारी रुग्णालयांमध्ये मूलभूत वैद्यकीय सोयी-सुविधा उपलब्ध होण्यासाठी शासन कोणते पाऊल उचलते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मंत्र्यांकडून आमदार निवासातील खोल्या अद्याप रिकाम्या नाहीत

मुंबई, दि. ५ : महायुतीतील तब्बल २० बड्या मंत्र्यांना अधिकृत बंगले मिळाल्यानंतरही त्यांनी आमदार निवासातील खोल्या अद्याप रिकाम्या केल्या नाहीत. या संदर्भात फेब्रुवारीपर्यंतची नोटीस देण्यात आली होती. मात्र, अजूनही या खोल्या ताब्यातच आहेत, त्यामुळे अनेक आमदारांना राहण्याची मोठी अडचण निर्माण झाली आहे. मनोरा आणि मॅजेस्टिक आमदार निवास दुरुस्तीच्या कारणास्तव बंद असल्याने अनेक आमदारांसाठी मुंबईत राहण्याची पर्यायी व्यवस्था उपलब्ध नाही. त्यामुळे सरकार दरमहा प्रत्येकी एक लाख रुपये भाड्याने देत आहे. अशा परिस्थितीत, अधिकृत बंगले मिळूनही मंत्र्यांकडून आमदार निवासातील खोल्या न सोडल्याने मोठा वाद निर्माण झाला आहे. या मंत्र्यांमध्ये गिरीश महाजन, नितेश राणे, हसन मुश्रीफ, संजय शिरसाट, योगेश कदम, जयकुमार रावल, शंभूराजे देसाई, चंद्रकांत पाटील, राधाकृष्ण विखे पाटील यांसह इतर अनेक बड्या मंत्र्यांचा समावेश आहे. आमदारांसाठी निवासाची सुविधा नसताना मंत्री मात्र खोल्या ताब्यात ठेवत असल्याने सरकारच्या कार्यप्रणालीवर सवाल उपस्थित होत आहेत. याबाबत प्रशासन आणि सरकार कोणती भूमिका घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## विरोधी पक्ष घोषणा देत होते.... राम कदम विरोधकांवर संतापले



मुंबई, दि. ५ : विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. बीड प्रकरणावरून राजकीय वातावरण तापलेले असतानाच अबू आझमी यांनी औरंगजेबाबाबत केलेल्या विधानामुळे काल सत्ताधारी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. तर मंत्री धनंजय मुंडे यांचा तीन महिन्यांनंतर राजीनामा घेण्यात आला. तर आज अबू आझमी यांना अधिवेशन संपेपर्यंत निलंबित करण्यात आले आहे. सुधीर मुनगंटीवारांनी त्यांचे सदस्यत्व रद्द करण्याची मागणी केली आहे. तर मुख्यमंत्र्यांनी आझमींना १०० टक्के जेलमध्ये टाकणार असे म्हटले आहे.

## विधानसभेत आदित्य ठाकरे, गुलाबरावांत खडाजंगी

### खाते कळले की नाही, ठाकरेंचा सवाल



मुंबई, दि. ५ : विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी सभागृहात शिवसेनेच्या ठाकरे गटाचे आदित्य ठाकरे व राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. यावेळी आदित्य ठाकरे यांनी पाटलांना तुम्हाला खाते कळाले की नाही, असा सवाल केला. त्यावर पाटलांनी मला हे खाते तुमच्या बापानेच दिले होते असे प्रत्युत्तर दिले. त्यानंतर आदित्य ठाकरे यांनी म्हणूनच तुम्ही पळून गेला होता, असा खोचक टोला त्यांना हाणला. या प्रसंगाने सभागृहात एकच गदारोळ माजला. आदित्य ठाकरे आज विधानसभेत चांगलेच आक्रमक दिसून आले. त्यांनी आज राज्याचे पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांना धारेवर धरले. राज्याच्या मंत्र्यांनी सभागृहात अभ्यास करून यावा. एखाद्या प्रश्नाचे उत्तर माहिती नसेल तर तो राखून ठेवावा. मंत्र्याला सांगा अभ्यास करून उत्तर द्या. पण यामुळे मंत्र्यांना त्यांचे खाते कळाले की नाही हा प्रश्न उपस्थित होते, असे ते गुलाबराव पाटलांना उद्देशून म्हणाले.

### चूक लक्षात येताच सारवासारव

आदित्य ठाकरे यांची ही खोचक टिप्पणी गुलाबरावांना चांगलीच जिव्हारी लागली. आदित्य ठाकरे खाली बसल्यानंतर ते लगेच जागेवर उभे राहून म्हणाले, अहो यांच्या बापाला कळले होते, म्हणून त्यांनी मला खाते दिले होते. यावेळी त्यांनी वडिलांऐवजी बाप असा शब्द वापरला. ही चूक लक्षात येताच त्यांनी वडील शब्द वापरून सारवासारव केली.

## कोरटकर अन सोलापूरकर सरकारचे जावई आहेत का?

# आव्हाडांची घणाघाती टीका

■ महासागर प्रतिनिधी,



मुंबई, दि. ५ : अबू आझमी यांनी औरंगजेबाबाबत केलेल्या विधानामुळे त्यांचे अधिवेशन संपेपर्यंत निलंबन करण्यात आले आहे. औरंगजेबाचे कौतूक करणे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांचा अपमान असल्याचे म्हणत त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. यावरून छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या राहुल सोलापूरकर आणि प्रशांत कोरटकरवर सरकार कारवाई का करत नाही? असा असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केला. ते दोघे सरकारचे जावई आहेत का? असेही आव्हाड म्हणाले. ते विधानभवनाबाहेर माध्यमांशी बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याविषयी टीका करणारे, त्यांच्या चातुर्यावर बोटं उठवणारे प्रशांत कोरटकर आणि राहुल सोलापूरकर हे सरकारचे जावई आहेत का? असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केला. शिवाजी महाराजांबद्दल यांना किंचितही प्रेम नाही. सगळे नाटक आहे. त्या नाटकाच्या एका पात्रामध्ये सगळे झाकण्यासाठी अबू आझमीला पुढे केले. अबू आझमींवर काय कारवाई करायची ती करा, पण प्रशांत कोरटकर आणि राहुल सोलापूरकरांचे काय करणार? ते तरी महाराष्ट्राला कळू द्या, अशी टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली. ...पण कोरटकर आणि सोलापूरकरला काही करू नका पंडित नेहरूंनी काय लिखान केले?, मग सावरकर काय लिखाण केले? यावर चर्चा करा. मग त्याच्या आधी कुणी काय लिखाण केले त्यावर चर्चा करा. अन्मग चर्चेसाठी एक महिना घ्या. पण कोरटकर आणि सोलापूरकरला काही करू नका, अशा शब्दांत जितेंद्र आव्हाड यांनी संताप व्यक्त केला.

### कारण नसताना कोणते लांबण लावू नका

तुम्हाला राहुल सोलापूरकर आणि प्रशांत कोरटकरला वाचवाचये असेल, तर वाचवा. पण कारण नसताना टिळक काय म्हणाले, सावरकर काय म्हणाले, आगरकर काय म्हणाले, नेहरू काय म्हणाले, गांधी काय म्हणाले, आंबेडकर काय म्हणाले, असे लांबण लावू नका. प्रशांत कोरटकर आणि राहुल सोलापूरकर जिवंत असताना तुमच्या डोळ्यांदेखत काय म्हणाले त्याच्याबद्दल बोला ना, असा सल्ला जितेंद्र आव्हाड यांनी सरकारला दिला. अबू आझमींच्या निलंबनाला आमचा पूर्ण पाठिंबा असल्याचे ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी सांगितले होते. परंतु,या बेगडी हिंदुत्व वाद्यांचा आणि बेगडी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांवरच्या प्रेमाचा या ठिकाणी ज्या पद्धतीने अविष्कार केला जातोय, हा अत्यंत निषेधार्ह असल्याचे ते म्हणाले होते.

# अबू आझमींच्या निलंबनाला आमचा पूर्ण पाठिंबा : भास्कर जाधव

■ महासागर प्रतिनिधी,

मुंबई, दि. ५ : अबू आझमींनी शिवराय आणि शंभुराजांचा अवमान केला आहे. अबू आझमींच्या निलंबनाला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. पण सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना आपली भूमिकाच मांडू दिली नाही, असे ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव म्हणाले. तसेच कोरटकर, सोलापूरकरांविरोधात प्रस्ताव दिला, असे त्यांनी सांगितले. भास्कर जाधव माध्यमांशी बोलताना म्हणाले की, आमदार अबू आझमींनी औरंगजेबाचे कारणाशिवाय खूप मोठे गुणगान केले. एकप्रकारे छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा अवमान केला. महाराष्ट्राचा आणि देशाचा अवमान केला. त्याच्याविरोधात सभागृहात प्रस्ताव आल्यानंतर त्या प्रस्तावाचे समर्थन देण्याचाच आम्ही प्रयत्न केला. आजही अबू आझमी यांना निलंबित करण्यात आले, त्या निर्णयासाठी आमचा सरकारला पूर्ण पाठिंबा आहे.

कुठेही आमचा विरोध नाही. परंतु,या बेगडी हिंदुत्व वाद्यांचा आणि बेगडी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांवरच्या प्रेमाचा या ठिकाणी ज्या पद्धतीने अविष्कार केला जातोय, हा अत्यंत निषेधार्ह आहे.

सत्ताधारी पक्षाला या विषयावर सातत्याने बोलायला दिले जाते, आणि विरोधी पक्षाची भूमिका सुद्धा त्या ठिकाणी मांडण्याची संधी दिली



जात नाही. जो कुणी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांचा अपमान करेल,राष्ट्रपुरुषांचा अपमान करेल, तो कुठल्याही जातीचा, कुठल्याही धर्माचा, कुठल्याही पक्षाचा आणि कुठल्याही पक्षाचा असला, तरी सुद्धा शिवाजी महाराजांचा अपमान हा कुठल्या जातीधर्माच्या माणसाला करायचा अधिकार नाही. त्यामुळे सर्वांना समान शिक्षा मिळाली पाहिजे, ही सरकारची भूमिका असली पाहिजे.

### कोरटकर, सोलापूरकरां विरोधात प्रस्ताव दिला

या सभागृहात पहिल्या दिवशी महाराष्ट्र विधानसभा अधिनियम ९७ अन्वये आम्ही प्रशांत कोरटकरांनी ज्या पद्धतीने शिवाजी महाराज, संभाजी महाराजांसंदर्भात वक्तव्य केले, त्याविरोधात स्थगन प्रस्ताव दिला. त्याचबरोबर अभिनेता राहुल सोलापूरकर याच्यासंदर्भातही हा प्रस्ताव दिल्याचे भास्कर जाधव यांनी सांगितले.

# स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्जाची मुदत १५ मार्चपर्यंत

■अकोला,दि.५ (प्रतिनिधी): भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेत सन २०२४-२५ या वर्षासाठी ऑनलाईन अर्ज हींिं://हारी.ारहरळीं.ीस या पोर्टलवर दि. १५ मार्चपर्यंत भरता येतील. विद्यार्थ्यांनी मुदतीत कार्यवाही करण्याचे आवाहन समाजकल्याण सहायक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेद्वारे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा या विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट वितरित होते.

त्यामुळे या पोर्टलवर विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर अर्ज व आवश्यक कागदपत्रे तसेच आधार लिंक व केवायसी पूर्ण करण्यात आलेल्या अद्ययावत बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत सबमिट करून त्याची तसेच सर्व कागदपत्रांची प्रिंट (हार्ड कॉपी ) सहाय्यक आयुक्त कार्यालयास सादर करावीत. असे आवाहन डॉ. अनिता राठोड सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण अकोला यांनी केले आहे.

समाजकल्याण कार्यालयाचा पत्ता डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, निमवाडी पोलीस वसाहत जवळ, दक्षतानगर, अकोला असा आहे.

# मुख्य भाजीबाजारात भीषण आग

## चार दुकाने जळून खाक;लाखो रुपयांचे नुकसान

■अकोला,दि.५ (प्रतिनिधी): अकोला शहरातील मुख्य भाजी बाजारात पहाटे भीषण आग लागली असून, चार दुकाने पूर्णपणे जळून खाक झाली आहेत. या आगीमुळे बाजार परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.अकोल्याच्या भाजी बाजारात भीषण आग लागली आहे. तब्बल चार दुकाने जळून खाक झाली आहेत. अकोला शहरातील मुख्य भाजी बाजार भागात आज पहाटे ही भीषण आग लागली. चार किराणा दुकाने आगीच्या आटोक्यात आली असून जळून खाक झाली आहेत. लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. आग इतकी भयंकर होती की, अग्निशमन दलाच्या ८ ते १० गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. तब्बल दोन तासांच्या प्रयत्नानंतर आग नियंत्रणात आणण्यात आली.



पहाटे ४ वाजता एका किराणा दुकानाला अचानक आग लागली. काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केले आणि शेजारील दुकानेही आगीच्या आटोक्यात घेतली. दुकानांतील मोठ्या , प्रमाणात माल, तेल आणि इतर ज्वलनशील पदार्थ असल्याने आग झपाट्याने पसरली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या दोन गाड्या तातडीने घटनास्थळी पोहोचल्या. मात्र, आगीची तीव्रता जास्त असल्याने आणखी लागल्या.

गाड्या बोलाव्या दुकाने बंद असल्यामुळे आग आटोक्यात आणण्यासाठी अडथळा येत होता. त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या मदतीने शटर तोडण्यात आले आणि त्यानंतर आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. अग्निशमन अधिकारी मनीष कथले यांनी दिलेल्या माहितीनुसार, आग लागण्याचे प्राथमिक कारण शॉर्टसर्किट असल्याचे मानले जात आहे.

## 'बेटी बचाव बेटी पढाव'अंतर्गत शहरात शुक्रवारी वॉकेथॉन

■अकोला,दि.५ (प्रतिनिधी): 'बेटी बचाव बेटी पढाव' उपक्रम, तसेच जागतिक महिला दिनानिमित्त महिला सुरक्षितता हा विषय घेऊन शहरात शुक्रवार, दि. ७ मार्च रोजी वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. विविध मान्यवर व महिलाभगिनी, तसेच नागरिकांच्या सहभागासह शुक्रवारी दु. ४ वा. जिल्हा परिषदेपासून ते हुतात्मा स्मारकापर्यंत वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या हस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती बी.वैष्णवी व जिल्हा पोलीस अधिक्षक बच्चन सिंह यांच्या उपस्थितीत हिरवी झेंडी दाखवुन शुभारंभ होईल. महिलांनी या वॉकेथॉनमध्ये सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी गिरीश पुसदकर व महिला व बालकल्याण अधिकारी श्रीमती राजश्री कौलखेडे यांनी केले आहे.

# बालस्नेही पुरस्काराने जिल्हाधिकारी अजित कुंभार यांचा गौरव



■अकोला,दि.५ (प्रतिनिधी): महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगातर्फे उत्कष्ट जिल्हाधिकारी म्हणुन अजित कुंभार यांना बाल हक्कासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबाबत मुंबई येथील समारंभात बालस्नेही पुरस्काराने गौरविण्यात आले.

बाल संरक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी आणि यंत्रणांचा सन्मान करण्यासाठी मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे मंगळवारी समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री पंकज भोयर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यात बालकांच्या हक्कांसाठी विविध योजना राबविण्यात आल्या. बालविवाह प्रतिबंधासाठी कार्यशाळांचे आयोजन, स्वयंसेवी संस्थांच्या सहभागाने बाल हक्क सप्ताहाचे यशस्वी आयोजन, हरविलेल्या व बालगृहात दाखल बालकांच्या कुटुंबाचा यशस्वी शोध घेऊन त्यांना कुटुंबात पाठविणे, बालकामगार निर्मूलन, कार्यशाळांचे आयोजन, जिल्हा स्त्री रूग्णालयात बालस्नेही कक्षनिर्मिती, त्याचप्रमाणे, शिक्षण हक्क कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. हा पुरस्कार संपुर्ण टीमच्या एकत्रित प्रयत्नांचे फळ आहे. आम्ही भविष्यातही बालकांच्या कल्याणासाठी कार्यरत राहू, अशी प्रतिक्रिया जिल्हाधिका-यांनी यावेळी व्यक्त केली.

# शेतकऱ्यांच्या सतर्कतेने चोरटे पोलिसांच्या जाळ्यात



■हिवरखेड,दि.५ (प्रतिनिधी): हिवरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत चोऱ्यांचे प्रमाण वाढले असून चोरटे पकडल्या जात नसल्याने चोरट्यांचे मनोबल प्रचंड वाढले आहे. आता तर चोरट्यांनी चक्क एकाच रात्री लक्षावधी रुपये किमतीच्या दहा मोटारी चोरून सर्वत्र खळबळ माजवून दिली.

परंतु शेतकऱ्यांच्या सतर्कते मुळे दोन चोरट्यांना हिवरखेड पोलिसांनी जेरबंद केले आहे. पोलीस स्टेशन हिवरखेड येथे ० ३ मार्च रोजी फिर्यादी शेतकरी सचिन गजानन कोरडे रा. हिंगणी बु. यांनी रिपोर्ट दिला की, त्यांचे हिंगणी बु. शिवारातील शेतात पिकाला पाणी देण्यासाठी त्याचे शेताचे बाजुच्या कालव्यावर लावलेली कागी कंपनीची मोटर मशिन ०१/०३/२०२५ चे रात्री कोणीतरी चोरुन नेली आहे.

तसेच त्यांचे गावातील आणखी अनेक शेतकऱ्यांच्या सुध्दा कालव्यावर लावलेल्या मोटर मशिनी चोरुन नेल्या आहेत. अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशनला कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला.

शेतकऱ्यांच्या सतर्कतेमुळे वरखेड पोलिसांनी गुन्ह्याच्या तपासात आरोपी शेख जाकीर शेख जाबाज, शेख इमरान शेख वल्ली दोन्ही रा. बगीचा प्लाट हिवरखेड ता. तेल्हारा यांना अटक करुन आरोपीकडून कागी कंपनीची व्ही ९ मॉडल मोटर मशिन अंदाजे १५,००० रु., सिआरआय कंपनीची मोटर मशिन किं.अं. १५,००० रु., सीआरआय कंपनीची आहे.

# अकोला महानगर काँग्रेस तर्फे मनपा समोर एक दिवसीय धरणे आंदोलन संपन्न




■अकोला,दि.५ (प्रतिनिधी): महानगरपालिका क्षेत्रातील विविध समस्येला घेऊन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार मंगळवारी महानगरपालिके समोर महानगर काँग्रेस कमिटी तर्फे एक दिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन संपन्न झाले. घोषणाबाजी देत व महानगरपालिकातील विविध समस्यावर अनेकांची भाषणे या ठिकाणी संपन्न झाली. डॉ.प्रशांत पाटील वानखडे अध्यक्ष महानगर काँग्रेस कमिटी यांच्या अध्यक्षतेखाली हे धरणे आंदोलन संपन्न झाले. मालमत्ता कर कमी करा व शास्ती किंवा व्याज रद्द करा, दररोज पाणीपुरवठा करा, पाणी टॅक्स कमी करा, गुंठेवारीचे प्रक्रियेमुळे घरकुललाचा लाभ अकोलकारांना मिळत नाही आहे त्यामुळे ती प्रक्रिया गुंठेवारीची सोपी व सरळ करा व घरकुल लाभार्थ्यांची दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील चेक त्वरित वितरित करा, नगररचना विभाग व जन्म मृत्यू विभागातील अनागोंदी व वाढलेला भ्रष्टाचारावर आळा घाला, शहरात एवढा मोठा टॅक्स घेऊन ही सार्वजनिक ठिकाणी महिला पुरुषांसाठी सुलभ शौचालय उपलब्ध नाहीत ते त्वरित बांधण्यात यावे, रमाई योजना पुन्हा सुरू करण्यात यावी अशा विविध मागण्या घेऊन महानगर काँग्रेस कमिटीने एक दिवसीय धरणे आंदोलन महानगरपालिका अकोला समोर केले. मोठ्या संख्येने नागरिक काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते या ठिकाणी उपस्थित होते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव प्रकाश तायडे, मदन भरगड माजी महापौर, बबनराव चौधरी, काँग्रेस पक्षाचे निरीक्षक महासचिव धनंजय देशमुख, आकाश कवडे, अध्यक्ष युवक काँग्रेस संपूर्ण नगरसेवक रवी शिंदे, महबूब खान, पराग कांबळे, इरफान भाई, मोईन खान, नौशाद भाई, ॲड इकबाल सिद्धीकी, जुने शहर ब्लॉक काँग्रेस अध्यक्ष गणेश कळसकर, महिला काँग्रेसच्या पुष्पाताई देशमुख, अफ्फरोज लोधी, कशिश खान, अनुजा शहा, नरेश मूर्ती, रहमान बाबू, सरदार खान, विनोद मराठे, रवींद्र तायडे, नफीज खान, राजेश मते, गणेश ताले, नरेश ठाकरे, संदेश वानखडे, प्रशांत प्रधान, भगवान भोईर, शेख अब्दुल्ला, प्रदीप वखारिया, नरेश मूर्ती, आदि उपस्थित होते.

## थोडक्यात

### जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकरी संकटात

**अकोला** : जिल्यातील एदलापूर शेतशिवारातील संत्रा गळतीचे भयावह दृश्य समोर आले आहे. या भागात संत्रा गळती होत आहे. परंतु ज्या बांधावर गाडी जाते, तिथेच कृषी विभागाचे अधिकारी पोहचतात मात्र, जिथे रस्ता नाही तिथला शेतकरी वंचित का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.अकोट तालुक्यात संत्रा उत्पादक शेतकरी चिंतेत सापडला आहे. अकोट तालुक्यात संत्रा पिकावर देठसुकी रोगामुळे संत्रा पिकाला मोठी गळती सुरू झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना खर्च निघणे कठीण झाले आहे. या भागातील अनेक शेतकऱ्यांचे एकरी ६५ टक्के पीक धोक्यात आले आहे.त्यामुळं शेतकऱ्यांच्या अडचणीत प्रचंड वाढ झाली आहे. दरम्यान, मागील हंगामात या भागातील शेतकऱ्यांना हेक्टरी १५ लाखाच उत्पन्न झालं होत. मात्र, यंदा देठसुकी रोगामुळे हेक्टरी ६१ हजार रुपयांचे संत्र्याचे उत्पन्न शेतकऱ्यांच्या हाती आले आहे. प्रत्येकी झाडातून ६५ टक्के उत्पन्न वाया जातं आहे. अकोट तालुक्यातील एदलापूर शेतशिवारातील संत्रा गळतीचे हे भयावह दृश्य सध्या पाहायला मिळत आहे. केवळ पस्तीस टक्के उत्पन्न हाती येत असून त्याला भाव अपेक्षाप्रमाणे नसल्याच शेतकरी सांगत आहेत, इतक्या गंभीर परिस्थितीत कृषी विभागाने पाठ फिरविल्याचा आरोप होत आले.

### क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या अकोला जिल्हाध्यक्षपदी गवळी

**अकोला:** पुणे येथे क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांचे अत्यंत विश्वासू असलेले चंद्रशेखर गवळी यांची क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या अकोला जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी अकोला जिल्ह्यातील तरुण आक्रमक चेहरा म्हणून ओळख असलेले चंद्रशेखर गवळी यांच्यावर अकोला जिल्ह्याच्या जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी देऊन तुपकरांनी एक प्रकारे येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर अकोला जिल्ह्यात संघटन केली.

# आत्मा अज्ञाना मूळे झोपला आहे

## शिव समरण करून अध्यात्म द्वारे सदविचार जागवा : मुख्य राजयोगिणी रुख्मिणी दीदी

■अकोला,दि.५ (प्रतिनिधी): अध्यात्म बिना सद विचार करणे शक्य नाही. अध्यात्म सद विवेक जागवते,माणुसकी प्रदर्शन करते , आई वडिलांची सेवा करा यासाठी मन तयार करतो.छोट्याना सन्मार्ग दाखवते व्यसनपासून दूर राहा अशी शिकवण देते यासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय सतत विविध उपक्रम राबवून सम ाजात जागृती करते. याचसाठी अकोल्यात प्रजापीता ब्राम्हकूमारीज ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या माध्यमातून सतत अध्यात्म आणि अध्यात्मिक सर्व ज्ञान वाटपाचे काम करण्यासाठी कार्यक्रम सुरु असतात. अशी माहिती मुख्य संयोजिक राजयोगिणी रुख्मिणी दीदी यांनी आज पत्रकार परिषदेत दिली केले. २ मार्चपासून ९ वी त्रिमुर्ति शिव जयंती,आणि महाशिवरात्री महोत्सव निमित्त प्रजापिता ब्रह्माकृमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, अकोला यांच्या वतीने अकोल्यात मोफ्रत भव्य आध्यात्मिक मेला, ३६ फूट ऊंच शिवलिंग दर्शन,१२ ज्योतिर्लिंग दर्शन,रोमांचकारी ३डी शो आणि आरोग्य तथा व्यसनमुक्ति मार्गदर्शन, आध्यात्मिक चित्र प्रदर्शनी, सहस्त्र शिवलिंग दर्शन, कुंभकरण झांकी आदींचे आयोजन केले होते. या प्रदर्शनीला मोठा प्रतिसाद मिळत असल्यामुळे या प्रदर्शनीचा समारोप आज ६ मार्च रोजी रात्री होत आहे. आरोग्य जागृती साठी चालवला जात असलेल्या हा उपक्रम चालवला जातो. अकोल्यात प्रचंड प्रतिसाद मि ळत असल्यामुळे एक दिवस मुक्काम वाढविला असल्याची माहिती पत्रकार परिषदेत दिली . यावेळी रामदास पेठ युनिट च्या संचालिका सुमन दीदी, मलकापूर युनिट संचालिका अर्चना दीदी, गांधी च्या वर्षा दीदी, जुनेशहर च्या वैशाली दीदी, उमरी युनिट च्या हर्षा दीदी आदि उपस्थित होते.

# सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड व त्याच्या साथीदारांना फाशीची शिक्षा मिळावी यासाठी अकोला शिवसेना तर्फे आंदोलन

■अकोला,दि.५ (प्रतिनिधी): सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराड व त्याच्या साथीदारांना फाशीची शिक्षा मिळावी यासाठी शिवसेना केंद्रीय मंत्री मा.खासदार प्रतापराव जाधव साहेब व जिल्हा संपर्कप्रमुख गोपीकिशनजी बाजोरिया साहेब यांच्या सूचनेनुसार शिवसेना जिल्हाप्रमुख अश्विन नवले यांच्या नेतृत्वामध्ये अकोला जिल्हा शिवसेनेतर्फे आज दिनांक ५ मार्च २०२५ रोजी शहीद मदनलाल धिंग्रा चौक बस स्टॅन्ड जवळ आंदोलन करण्यात आले. यावेळी हत्येतील मुख्य आरोपी वाल्मीक कराड याच्या पुतळ्याला अकोला बस स्टँड जवळील शहीद मदनलाल धिंग्रा चौक येथील उड्डाणपूला फाशी देऊन वाल्मीक कराडला फाशी द्या अश्या घोषना देण्यात आल्या. व शासनाकडे सरपंच संतोष देशमुख यांना न्याय मिळावा यासाठी वाल्मीक कराड व त्याच्या साथीदाराला फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. आंदोलनावेळी शिवसेना शहर प्रमुख रमेश गायकवाड, नगरसेवक शशी चोपडे, शहर संघटक सागर पुर्णेये, अकोला पश्चिम विधानसभा प्रमुख राजेश दांडेकर, रवी भामरे, बाशीटाकळी उपतालुकाप्रमुख सुरेश पाटील, अविनाश मोरे, उपशहर प्रमुख नितीन बदरखे, आकाश दलाल, प्रतीक मानेकर, दीपक पानझडे, शिवम पुरोहित, प्रदीप काशीद, विभाग प्रमुख गोलू गावंडे, योगेश वाव्हाळ, वैद्यकीय समन्वयक नागेश इंगोले, रमेश सोनारगन, गजानन नवथळे, मनोज अग्निहोत्री आदि उपस्थित होते.




# खानापूर रोडवरील टीकेव्ही चौक ते ढोणे नगर रोडचे तात्काळ डांबरीकरण करा

## अन्यथा शनिवारी रास्ता रोको-व्यापारी व ग्रामस्थांचा इशारा

■पातुर,दि.५ (प्रतिनिधी): शहरातील प्रमुख मार्गांपैकी एक असलेल्या टीकेव्ही चौक ते ढोणे नगर या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, त्याच्या तात्काळ डांबरीकरणासाठी व्यापारी आणि ग्राम स्थांनी पातुर तहसीलदार डॉ. राहुल वानखडे यांना निवेदन दिले आहे. जर प्रशासनाने लवकरात लवकर हा रस्ता दुरुस्त केला नाही, तर शनिवारी रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

या मार्गावर ३० ते ३५ खेड्यातील नागरिक, विद्यार्थी आणि व्यापारी रोज प्रवास करतात. मात्र, मागील चार ते पाच वर्षांपासून रस्त्याची स्थिती अतिशय खराब झाली आहे. ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे अनेक अपघात होत आहेत, तर धुळीमुळे दमा आणि फुफ्फुसाचे विकार वाढत आहेत.गेल्या दोन वर्षांपासून पाणीपुरवठा योजनेतील पाईपलाईन सातत्याने फुटत असून, त्यामुळे रस्त्यावर सांडपाणी साचून अपघातांचे प्रमाण वाढले आहे.



पातुर नगरपरिषदेकडून या पाईपलाईनच्या दुरुस्तीवर लाखो रुपये खर्च केला जात असला, तरी खड्डे बुजविले जात नाहीत, आणि फक्त बोगस कामे केली जात आहेत, असा आरोप नागरिकांनी केला आहे.टीकेव्ही चौक ते ढोणे नगर रोड हा ग्रामपंचायत हद्दीत येतो,.

त्यामुळे त्याच्या देखभालीची जबाबदारी ग्रामपंचायतीवर आहे. मात्र, ग्रामपंचायत आणि संबंधित अधिकाऱ्यांनी या भागाकडे दुर्लक्ष केल्यामुळे नागरिकांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.ग्रामस्थांच्या मते, पातुर तालुक्यातील पायाभूत सुविधांसाठी वेळोवेळी शासनाकडून निधी दिला जातो. पण तो गरज असलेल्या रस्त्यांसाठी वापरला जात नाही. यामुळे टॅक्स भरणाऱ्या नागरिकांना कोणत्याही सुविधा मिळत नाहीत, असा आरोप व्यापारी आणि रहिवाशांनी केला आहे. रस्त्याच्या त्वरित दुरुस्तीसाठी व्यापारी व ग्रामस्थांनी ५ मार्च २०२५ रोजी तहसीलदारांना निवेदन दिले. १५ दिवसांत योग्य पावले उचलली नाहीत, तर रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा दिला आहे.

हा रस्ता पातुर शहराला अनेक गावांशी जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. त्यामुळे तहसील प्रशासन, ग्रामपंचायत आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने दखल घ्यावी व रस्त्याचे डांबरीकरण त्वरित सुरू करावे, अशी मागणी नागरिक, व्यापारी आणि ग्रामस्थांनी केली आहे.

# कापड्याच्या दुकानाला आग लाखो रुपयांची हानी

■अकोट,दि.५ (प्रतिनिधी): अकोट बस स्टँड रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज चौक लगत असलेल्या एका रेडिमेड कापड दुकानासह इलेक्ट्रिक दुकानाला आग लागल्याची घटना ४ मार्चला रात्री ११ वाजताच्या सुमारास घडली. या आगीत लाखोंची हानी झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. शिवाजी महाराज चौकातील अक्षय पेडेकर यांच्या अक्षय रेडिमेड दुकान व तसेच त्याच बाजूला असलेले ए. जी इलेक्ट्रिकल्स या दुकानाला आग लागली. अक्षय रेडीमेडचे दुकानाला आग लागल्याने सदर दुकानात कापड असल्याने मोठा पेट घेतला होता. या आगीत कापड दुकानात लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे दुकान मालकाने सांगितले. तसेच बाजूलाच असलेल्या ए, जी इलेक्ट्रिकल दुकानालाही आग लागली. अकोट ए,जीअग्निशामक विभागाचे पथक घटनास्थळावर दाखल होवून त्यांनी आग नियंत्रणात आणली.



महावितरणससह पोलीस विभागाचे अधिकारी व कर्मचारीदेखील घटनास्थळी दाखल झाले होते. आग नियंत्रणात आणण्यासाठी न. प. अग्निशामक विभागाचे अधिकारी अभिषेक काळे, अविनाश शेरेकर, आकाश निंबाळकर, लावण्या मिसळे, रोहित बुंदुले, अनिकेत अंबुलकर, शुभम राऊत, पप्पू तोडे यांनी आगेला आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले.

# निसर्गाचे संवर्धन एक आव्हानात्मक काम!

निसर्गामध्ये पंचतत्वाचा समावेश असतो.आकाश, वायू, अग्नि, जल आणि पृथ्वी मिळून या ब्रम्हांडाची निर्मिती झाली आहे. आज संशोधनाच्या नावाखाली आकाशात अनेक सॅटेलाईट सोडण्यात आले आहेत. काही जमिनीवर परतले आहेत. तर काही ब्रम्हांडात फिरत आहेत. पृथ्वीवरून हे सर्वकाही अनुभवावयास मिळते आहे. मानवाने स्वतःच्या सुखासाठी आपल्या शोध प्रवृत्तीला चालना देऊन या निसर्ग चक्रामध्ये हस्तक्षेप करणे सुरू ठेवले आहे. याचाच परिणाम निसर्गाचे संतुलन बिघडण्यात झालेला पहायला मिळतो आहे. पंचतत्वातील सर्वच घटकांचे मोठ्या प्रमाणावर प्रदुषण घडून आले आहे. या कारणाने भारतातील ऋतूचक्र पुर्णतः कोलमडून पडले आहेत.

--------------

पावसाच्या दिवसांत पाऊस पडत नाही. हिवाळ्यात थंडी वाजत नाही. यामुळे उष्णतामानात प्रचंड वाढ झालेली दिसून येते आहे. उष्णतामानामुळे अंगाची लाही लाही होते आहे. अंगातली काम करण्याची क्षमता ही कमी झालेली पहायला मिळते आहे.

गर्मीमुळे अंगातील घामामुळे शरीरातील क्षारांचे प्रमाण कमी होते आहे. यामुळे काम करण्याची क्षमता प्रभावीत होते आहे. अंगातील उत्साहात घट होऊन पाहिजे तेवढी कामे निकालात निघत नाहीत. याच कारणाने कारखानदार लोक जास्तीचे व अखंड उत्पादन करवून घेण्यासाठी एआयचा वापर करण्यास केंद्र सरकारला बाध्य करीत आहेत.

उन्हाळ्यातील झाडांचे संगोपन हे एक आव्हानात्मक काम असते. आपल्याकडील उन्हाळा हा तीव्र स्वरूपाचा असतो. पळस, काटेसावर सारखी झाडे उन्हाळ्याची तीव्रता ही कशी असू शकते याचे भान आपणांस करून देतात. खरे तर चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा हा घनदाट वन क्षेत्रासाठी प्रसिद्ध आहे.

असे असले तरीही आज औद्योगिक विकासामुळे वनक्षेत्रात घट झालेली दिसून येते आहे. कोळसा, सिमेंट, लोह इत्यादी खणीजे या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर असल्याने खाणींचे साम्राज्य सगळीकडे पसरलेले आढळून येते आहे. या कारणाने जमिनीतील पाण्याची पातळी ही खाली गेलेली पहायला मिळते आहे. अनेक गावे पाण्यापासून वंचित झालेली आहेत.

उन्हाळा सुरू झालेला असतांनाच अनेक गावांमध्ये पाणी समस्या ही भेडसावते आहे. यासाठी राज्य सरकारचे धोरण हे कारणीभूत ठरते आहे. जल जीवन मिशन च्या माध्यमातून अनेक गावांमध्ये पाणी पुरवठा योजना सुरू करण्यात आल्या आहेत. त्यातील बहुतांश कामे ही अर्धवट स्वरूपात राहिलेली आहेत.

योजनांवरील पैसा खर्च तर होतो आहे. परंतु अनेक ठिकाणी ही कामे निकृष्ट दर्जाची झालेली आहेत. पाईप लाईन पाणी पुरवठा सुरू होण्याआधीच फुटलेली आढळून आलेली आहे.

सिमेंटच्या कामांमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. यामुळे कामे अर्धवट ठेवून परत वाढीव प्रस्ताव सादर करून कमिशन खाण्याची सवय आमच्या राज्यकर्त्यांना आणि कंत्राटदारांना लागलेली आहे. यामुळे गावांचा विकास जागोजागी रखडलेला पहायला मिळतो आहे. मग ती रस्त्यांची कामे असोत, पाण्याच्या टाकीचे काम असो वा कुठलीही विकास कामे असोत, यातील कमिशनवर (लोण्याच्या गोळ्यावर) विविध कामे करणाऱ्या अधिकारी लोकांचे, कर्मचाऱ्यांचे, लोकप्रतिनिधींचे सतत लक्ष असते. यामुळे देशातील वेगवान प्रगतीला ब्रेक लागत असतो. याची जाणीव जनतेला असली पाहिजे.

वन विभागाकडून पावसाळ्यात अनेक प्रकारचे वृक्षारोपण करण्यात येते. दरवर्षी नित्यनेमाने हे काम सुरू असते. यातील किती झाडे वाचतात आणि त्याचे वृक्षात रूपांतर होते हा अभ्यासाचा विषय झाला आहे. रोपांचे वृक्षात रूपांतर होण्यासाठी नोकरदारांची पुर्ण हयात ही खर्च झालेली पहायला मिळते आहे. हे एवढे सहजसाध्य काम नाही. तरीही आम्ही विकासाच्या नावाखाली मोठमोठी झाडे सहजरीत्या कापून टाकीत आहोत.

यामुळे तापमानात भर पडली आहे. उन्हाळा नकोसा होतो आहे. झाडांचे संगोपन व संवर्धन करण्यासाठी प्रत्यक्ष झटावे लागते.त्यावर लक्ष ठेवावे लागते. जंगलातील, ओसाड रानातील जमिनीचा कस हा शेती सारखा कसदार नसतो. जंगलातील जमीन ही अनेक प्रकारची असलेली पहायला मिळते आहे. जंगलातील मोठमोठी झाडे ही पाणी धरून ठेवण्याची कामे करतात. कारण त्यांची मुळे ही जमीनीत खोलवर गेलेली असतात. तसेच काही झाडे ही वातावरणातील पाणी शोषून घेऊन त्यावर जगणारी असतात.

झाडांचे संगोपन हे लहान मुलांसारखे असलेले पहायला मिळते. झाडांची जास्त काळजी घेतल्या गेली की ती परावलंबी होतात. वातावरणातील बदलास बळी पडतात. आज तर उधळी नामक अळीने जंगलातील अनेक झाडांवर आक्रमण केलेले आढळून येते आहे.

या अळ्या झाडांच्या सालीमधील रस शोषून घेऊन त्यावर आपली उपजीविका भागवीत असतात. आता तर कडूलिंबाचे, सागाचे, झाड पणं यातून सुटलेले नाही. संपूर्ण झाडाला उधळीने माखलेले असते. यातून झाडाची सुटका होणे हे महाकठीण काम झालेले आहे.

यामुळे अनेक झाडांचे आयुष्य हे धोक्यात आले आहे.यावर कायमचा उपाय शोधून काढला गेला पाहिजे.उधळीचे जंगलातील झाडांवरील आक्रमण हे थोपवीणे गरजेचे झाले आहे. मोठमोठे वृक्ष आतून पोखरली गेलेली आहेत.ते केंव्हा उन्मळून पडतील याचा नेम नाही.

आम्ही वृक्ष लागवडीच्या नावाखाली इव्हेंट साजरा करतो आहे.तो प्रसिद्धीपुरता मर्यादित झाला आहे.नंतर त्या लावलेल्या झाडांचे काय होते आहे याकडे कुणाचेही लक्ष जात नाही. काही वृक्ष लागवड करणारी मंडळी याबाबत जागरूक आहेत.परंतु त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यांना वन खात्याची पाहिजे तशी साथ पणं मिळत नाही.

वन खात्याचे अनेक कर्मचारी नौकरी करणे आहे म्हणून काम करणे एवढेच त्यांचे काम असते. त्यांचा जंगल वाढीशी काहीही संबंध नसतो. उलट दरवर्षी त्याच त्या जागी झाडे लावून ते मोकळे होत असतात.राज्य सरकारला पणं हेच पाहिजे आहे. वृक्षारोपणं ही दुभती गाय झालेली आहे. यामुळे अनेकांना नेहमीसाठी काम मिळते आहे. यातून मिळणारा मलिदा कोणांस नको आहे ?

मोठ्या झाडांमुळे पाणी संवर्धन होते ही गोष्ट खरी आहे. परंतु यासाठी मोठी झाडे जीवंत राहायला तर हवीत ना ! आज आम्ही समृद्धी महामार्गाच्या विस्तारासाठी करोडो वृक्षांची कत्तल बेमालूमपणे करतो आहे.

विकासाच्या नावाखाली सर्वकाही चालवून घेतो आहे.तर दुसरीकडे शेती फायदेशीर राहिलेली नाही असे म्हणायचे आणि अवैध वृक्षतोड करून जबरदस्तीने शेती करणे बेधडकपणे मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. यावर अंकुश कसा ठेवणार आहे?

समृद्धी महामार्गाच्या मधोमध किंवा रस्त्याच्या दुतर्फा कडेला शोभेची झाडे लावून रस्त्याचे सुशोभीकरण करतो आहे. निश्चितच ही बाब डोळ्यांना सुखावणारी आणि गारवा देणारी आहे. परंतु ही झाडे प्रवाशांना कुठलीही सावली उपलब्ध करून देऊ शकत नसल्याने चमकणाऱ्या रस्त्यांमुळे मोठ्या प्रमाणावर अपघात घडून येत आहेत. याची जाणीव सरकारला नसावी असे वाटते. झाडांच्या नैसर्गिक संवर्धनावर भर दिला गेला पाहिजे.

आज झाडांच्या सुरक्षेसाठी लावलेले गार्ड, जाळ्या, प्लास्टिक बॉटल भंगारवाले चोरून नेऊन आपली दारूची गरज भागवीत आहेत. यामुळे खुल्या जागेमध्ये लावलेल्या झाडांचे जनावरांपासून संरक्षण करणे कठीण काम झालेले आहे. त्यासाठी जनतेमध्ये निसर्गाप्रती जागरूकता निर्माण होणे गरजेचे झाले आहे.

आपल्या डोळ्यांसमोर घडणाऱ्या चुकीच्या गोष्टींचा सर्वांनी मिळून विरोध केला पाहिजे. आज याकडे कानाडोळा केला जातो आहे. यामुळे असंवैधानिक व नियमबाह्य कृत्यांना चालना मिळते आहे. आज मोठ्या प्रमाणावर जंगलतोड होते आहे.

नैसर्गिक पहाडांचे सपाटीकरण केले जात आहे. अवैध खणिज संपत्ती, वाळू, माती मिळविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले जात आहेत. यासाठी प्रशासनातील लोकांचे सहकार्य घेतले जात आहे. नोकरीतील प्रामाणिकतेचा अंत झाल्याने थोड्याश्या पैशाच्या आमिषाला बळी पडून अनेक निसर्ग विरोधात कामे केली जात आहेत. याचा परिणाम हा संपूर्ण जीवसृष्टीवर होणार आहे.

पाण्याची पातळी घसरणे, जंगल संपत्ती जळून खाक होने ही आम गोष्ट झालेली आहे. नैसर्गिक आपत्तीच्या नावाखाली आपले सारे पाप झाकले जात आहे. मानवाच्या प्रवृत्तीत जोपर्यंत प्रामाणिकतेला वाव असणार नाही तोपर्यंत हा प्रवास असाच सुरू असणार आहे.कारण आम्ही स्वतःचाच विचार करून अमाप संपत्ती गैरमागार्ने मिळविण्याच्या शर्यतीत सहभागी झालेलो आहोत.

यातून सुटका होण्यासाठी देशातील लोकांचा, संपत्तीचा विकास साधण्यासाठी जनतेला आपल्या मानसिकतेत मोठा फेरबदल करावा लागणार आहे.तरच निसगार्चा समतोल साधला जाऊ शकतो असे वाटते आहे.

मिलिंद गड्डमवार
सामाजिक कार्यकर्ते, मुक्त पत्रकार
राजुरा. 9511215200

# ऑस्कर पुरस्कार...

## ४५ सेकंदांत द्यावी लागते व्हिक्ट्री स्पीच

ऑस्कर हा चित्रपटसृष्टीतील सर्वात प्रसिद्ध पुरस्कार आहे, ज्याची वर्षभर वाट पाहिली जाते. पण जर एखाद्या ऑस्कर विजेत्याला पुरस्कार म्हणून मिळालेली ट्रॉफी परत विकायची असेल तर त्याला फक्त ८७ रुपये मिळतील, तर या पुतळ्याला बनवण्याचा खर्च ३५ हजार रुपये आहे.

-----------------

१९२७ मध्ये, अमेरिकेच्या एमजीएम स्टुडिओचे प्रमुख लुई बी मेयर यांनी त्यांचे तीन मित्र, अभिनेता कॉनराड नागेल, दिग्दर्शक फ्रेड निब्लो आणि चित्रपट निर्माते फ्रेड बिटसन यांच्यासह, संपूर्ण उद्योगाला फायदा होईल असा एक गट तयार करण्याची योजना आखली. तसेच, चित्रपट निर्मात्यांना प्रेरणा देणारा पुरस्कार सुरू करण्याचा विचार केला. ही कल्पना पुढे नेण्यासाठी लोकांना सहभागी करून घेणे आवश्यक होते.




यासाठी लॉस एंजेलिसमधील बिल्टमोर हॉटेलमध्ये एका डिनरचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये हॉलिवूडमधील ३६ प्रसिद्ध लोकांना आमंत्रित करण्यात आले होते. 'अकादमी ऑफ मोशन पिक्चर ऑफ आर्ट्स अँड सायन्सेस' स्थापन करण्याचा प्रस्ताव त्यांच्यासमोर ठेवण्यात आला. सर्वांनी मान्य केले. मार्च १९२७ पर्यंत त्याचे अधिकारी निवडले गेले. ज्याचे अध्यक्ष हॉलिवूड अभिनेता आणि निमार्ता डग्लस फेअरबँक्स होते.

१६ मे १९२९ रोजी पहिला पुरस्कार सोहळा रूझवेल्ट हॉटेलच्या ब्लॉसम रूममध्ये आयोजित करण्यात आला होता. सुमारे २७० प्रसिद्ध व्यक्तींनी यात भाग घेतला. मग, समारंभाला उपस्थित राहण्यासाठी, ५ डॉलर्स (आजच्या १०० डॉलर्स) चे सदस्यत्व घ्यावे लागत असे. आजही हीच अकादमी ऑस्कर पुरस्कार देते. सध्या अकादमीमध्ये सुमारे १० हजार सदस्य आहेत. हे सर्व लोक चित्रपट उद्योगाशी संबंधित आहेत. अकादमी चित्रपट नसलेल्या लोकांना सदस्यत्व देत नाही.

अकादमीची स्थापना आणि पुरस्कार समारंभ आयोजित करण्यासाठी सुरुवातीच्या बैठकांमध्ये ट्रॉफीची रचना करण्यात आली होती. अशाच एका बैठकीत, एमजीएम कला दिग्दर्शक सेड्रिक गिबन्स यांनी ट्रॉफीचे एक रेखाटन तयार केले. त्यात एक योद्धा तलवार धरून चित्रपटाच्या रीलवर उभा असल्याचे दाखवले होते. रीलवर पाच ठिपके देखील कोरलेले होते, जे अकादमीच्या पाच शाखांचे प्रतिनिधित्व करतात - अभिनेते, दिग्दर्शक, निमार्ते, तंत्रज्ञ आणि लेखक.

सेड्रिकची रचना अमेरिकन शिल्पकार जॉर्ज मेटलँड स्टॅनली यांनी कोरली होती. स्टॅनलीने अनेक मॉडेल्स बनवले, त्यापैकी एक सेड्रिकने निवडले. आजही तीच रचना अबाधित आहे, जी १३.५ इंच लांब आहे आणि ८.५ पौंड म्हणजे सुमारे ४ किलो वजनाची आहे. प्रत्येक ऑस्कर ट्रॉफी कांस्यापासून बनलेली असते, जी २४ कॅरेट सोन्याने लेपित असते.

दुसऱ्या महायुद्धादरम्यान धातूच्या कमतरतेमुळे, पुरस्कार विजेत्यांना रंगवलेल्या प्लास्टर ट्रॉफी देण्यात आल्या. हे तीन वर्षे चालू राहिले. युद्धानंतर अकादमीने विजेत्यांना प्लास्टर ट्रॉफीऐवजी सोन्याचा मुलामा दिलेला कांस्य ट्रॉफी देण्याचे मत दिले.

अकादमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट्स अँड सायन्सेसच्या अधिकृत नियमांनुसार, 'कोणताही विजेता किंवा इतर कोणताही व्यक्ती बाजारात ऑस्कर पुरस्कार विकू शकत नाही.' ट्रॉफी घरी नेण्यापूर्वी, विजेत्यांना एक करार करावा लागतो ज्यामध्ये असे म्हटले आहे की ती विकली जाणार नाही किंवा नष्ट केली जाणार नाही.

एक ऑस्कर पुरस्कार ट्रॉफी बनवण्यासाठी सुमारे ४०० डॉलर्स, म्हणजे सुमारे ३५ हजार रुपये खर्च येतो. १९५१ मध्ये लागू झालेल्या या नियमात एक दोष देखील आढळून आला. हा नियम लागू होण्यापूर्वी देण्यात आलेल्या पंधरा ऑस्कर ट्रॉफी २०१२ मध्ये लिलाव करण्यात आल्या. त्यावेळी त्यात ३० लाखांहून अधिक डॉलर्स मिळाले होते.

चित्रपट जगतातील सर्वात मोठ्या पुरस्काराचे अधिकृत नाव 'अकादमी पुरस्कार ऑफ मेरिट' आहे, परंतु ते 'ऑस्कर पुरस्कार' या नावाने अधिक प्रसिद्ध आहे. त्यांना 'ऑस्कर' हे नाव का मिळाले याचे नेमके कारण माहित नाही. तथापि, ३ प्रमुख सिद्धांत फिरत आहेत...

१९३६ ते १९४३ पर्यंत अकादमीच्या ग्रंथपाल मार्गारेट हेरिक यांनी जेव्हा पहिल्यांदा ट्रॉफी पाहिली तेव्हा त्या म्हणाल्या, हे मला माझ्या काका ऑस्करची आठवण करून देतात. तिथे उपस्थित असलेल्या एका वृत्तपत्रातील स्तंभलेखकाने एका लेखात याचा उल्लेख केला आहे. येथूनच अकादमी पुरस्कारांना ऑस्कर पुरस्कार असे टोपणनाव मिळाले.

१९३६ मध्ये 'डेंजरस' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार जिंकणारी अभिनेत्री बेट डेव्हिसने ट्रॉफी स्वीकारताना सांगितले की, ऑस्कर ट्रॉफीचा मागचा भाग अगदी तिचा पती अंघोळीतून बाहेर पडताना दिसत होता तसाच दिसतो. डेव्हिसचे पती गायक हार्मन ऑस्कर नेल्सन होते.

१९३४ मध्ये, कॅथरीन हेपबर्न यांना 'मॉर्निंग ग्लोरी' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. प्रसिद्ध हॉलिवूड स्तंभलेखक सिडनी स्कोल्स्की यांनी याबद्दल एक लेख लिहिला, ज्यामध्ये त्यांनी 'ऑस्कर' हा शब्द वापरला. १९७५ च्या त्यांच्या 'डोंट गेट मी रॉंग - आय लव्ह हॉलीवूड' या संस्मरणात, स्कोल्स्कीने लिहिले की हे नाव स्टॅट्युएट या अधिकृत नावाने निराश झाल्यावर आले.

सुरुवातीला, पुरस्कार विजेत्यांची नावे समारंभाच्या आधी कडक निबंधांखाली पत्रकारांसोबत शेअर केली जात होती, परंतु १९४० मध्ये ही परंपरा खंडित झाली. खरं तर, यावर्षी लॉस एंजेलिस टाईम्सने पुरस्कारांची अधिकृत घोषणा होण्यापूर्वीच विजेत्यांची यादी लीक केली.

तेव्हापासून, विजेत्यांची नावे सीलबंद लिफाफ्यांमध्ये ठेवण्यात आली, ज्याची जबाबदारी प्राइस वॉटर हाऊस कूपर्स (पीडब्ल्यूसी) या अकाउंटिंग फर्मकडे देण्यात आली. ही फर्म मते मोजण्याची आणि विजेत्यांची नावे असलेले लिफाफे सादरकर्त्यांना देण्याची जबाबदारी घेते. समारंभादरम्यान, निकालांचा एक लिफाफा स्टेजच्या दोन्ही बाजूला असतो. २०११ पासून, हे लिफाफे लॉस एंजेलिस येथील डिझायनर मार्क फ्रीडलँड यांनी डिझाइन केले आहेत, जे प्रत्येक श्रेणीसाठी तीन लिफाफे तयार करतात.

ऑस्कर पुरस्कार जिंकल्यानंतर दिलेल्या भाषणासाठी ४५ सेकंद हा निश्चित वेळ आहे. या वर्षीच्या ऑस्करसाठी नामांकित सर्व कलाकार २५ फेब्रुवारी रोजी लॉस एंजेलिसमध्ये रात्रीच्या जेवणासाठी एकत्र आले. यावेळी अकादमीच्या अध्यक्षा जेनेट यांग यांनी सर्वांना त्यांचे भाषण लहान आणि ४५ सेकंदात पूर्ण करण्यास सांगितले.

ऑस्करच्या मंचावर दिलेले सर्वात लांब भाषण अभिनेत्री ग्रीर गार्सन यांनी दिले. १९४३ मध्ये त्यांना 'मिसेस मिनिव्हर' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. त्या ५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ बोलल्या. सर्वात लहान भाषण अभिनेत्री पॅटी ड्यूकने दिले. १९६३ मध्ये 'द मिरॅकल वर्कर' या चित्रपटासाठी तिला सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. तेव्हा तिने फक्त 'धन्यवाद' म्हटले.

# देशाच्या विकासाला बळ देणारे हात



वीजेने मानवी जीवन सहज आणि सुसह्य केले आहे, किंबहुना वीजेशिवाय जगण्याची कल्पनाच करता येत नाही. बटन दाबल्याबरोबर घर प्रकाशमान व्हावं एवढीच रास्त अपेक्षा सर्वसामान्यांची आहे. परंतु या बटणामागे असलेली भलीमोठी वीजयंत्रणा आणि या यंत्रणेच्या माध्यमातून विजेचे नियंत्रण करणारे व २४ तास अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी रात्रंदिवस धडपड करणारे हात म्हणजे महावितरणचे लाईनमन.

वीज वितरण क्षेत्रात महावितरण ही देशातील सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी आहे. सुमारे ८१ हजार कर्मचारी, रक्तवाहिन्याप्रमाणे पसरलेल्या १२ लाख किलोमीटरच्या वीज वाहिन्या,४१३२ उपकेंद्रे, तसेच ८ लाख ७५ हजार ३३९ रोहित्राच्या माध्यमातून २५ हजार मेगावॅट वीज ही मुंबईचा काही भाग वगळता राज्यातील विविध वर्गवारीतील ३ कोटी ३ लाख ७० हजार ग्राहकांपर्यंत अखंड पोहचविण्याच काम महावितरणचा लाईनमन अविरत करत असतो.

वीजपुरवठा खंडित झाला की सर्वकाही ठप्प होते आणि वीज पुरवठा खंडित झाल्यावरच वीजेचे महत्वही कळते.परंतु गेलेली वीज परत कशी आली हे कोणी कधी जाणून घेतलं नाही किंवा तशी गरजही वाटली नसल्याने महावितरणचा लाईनमन आजवर दुर्लक्षीतच राहीला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

परंतु लाईनमनच्या कामाची दखल घेत देशभरातील लाईनमनबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केंद्रशासनाने ४ मार्च हा 'लाईनमन दिवस' साजरा करण्याच्या सुचना सर्व सार्वजनिक आणि खाजगी आस्थापनांना दिल्या आहेत. महावितरणमध्ये ४ मार्च हा 'लाईनमन दिन' साजरा केला जातो आणि यावर्षी सर्वत्र तो साजरा देखील केला गेला.

सध्यातरी बंद पडलेली वीज यंत्रणा पुर्ववत करण्यासाठी प्रत्यक्ष माणुसच लागतो. त्यामुळे ठप्प झालेली किंवा रात्री- बेरात्री खंडित झालेला वीज पुरवठा पुर्ववत होतो, तथापि ते पुर्ववत करण्यासाठी त्याठिकाणी महावितरणचा लाईनमन प्रसंगी प्रतिकूल आणि धोकादायक परिस्थितीत खांबावर, रोहित्रावर चढुन काम करतो असतो,तेंव्हाच खंडित झालेली वीज पुर्ववत होते हे याठिकाणी आवर्जुन नमुद केले आहे.

वीजपुरवठा खंडित झाला की तो पूर्ववत होईपर्यंतचा प्रतीक्षा काळ हा वीजग्राहकांना नकोसा असतो, वीज दिसत नाही. वीजयंत्रणेत काम करण्याचा कितीही वर्षांचा अनुभव असला तरी विजेशी मैत्री होऊ शकत नाही. त्यामुळे एखाद्या क्षणी अनावधानाने झालेली चूकही जीवावर बेतू शकते. याची अनेक उदाहरणे देता येतील, एवढ्या धोकादायक क्षेत्रात महावितरणचा हा सैनिक आपले कर्तव्य बजावत असतो.

महावितरणची उघड्यावर असलेली संपूर्ण यंत्रणा, जंगल, दऱ्या -खोऱ्यातून आलेल्या वीज वाहिन्या,वीज खांबे, रोहित्रे इत्यादीवर ऊन, वादळ -वारा, पाऊस याचा मोठा परिणाम होत असतो. त्यामुळे वीज यंत्रणेची नियमित देखभाल - दुरूस्ती करतांना किंवा वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर प्रसंगी एखादा फॉल्ट शोधण्यासाठी शेकडो किलो मीटर वीज वाहिन्यांचे पेट्रोलिंग करावे लागते. पावसाळ्यात तर अशा आव्हानांची नियमितपणे भर पडत असते आणि महावितरणचा लाईनमन या आव्हानांना समर्थपणे पेलत असतो.

करोना सारख्या महामारीत तसेच वादळवाऱ्याच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काम करणाऱ्या लाईनमनचे कौतूक करणे हे त्यांचा आत्मविश्वास वृदिंगत करणारे आहे. एकेकाळी फक्त पुरूषप्रधान असलेल्या या क्षेत्रात लाईन वुमनही पुरूषांच्या खांद्याला खांदा लाऊन सक्षमपणे या क्षेत्रातील आपले कर्तव्य बजावत आहेत.

वीज पुरवठा सुरळीत करण्यावरच लाईमनचे काम थांबत नाही तर, विविध वर्गवारीतील वीज ग्राहकांना नविन वीज जोडणी देणे, वीजबिलाची वसुली करणे, वीज चोरी पकडणे, थकबाकीदारांचा वीज पुरवठा खंडित करणे, ग्राहकांच्या तक्रारी सोडविणे इत्यादी कामे नित्याचाच भाग असणाऱ्या महावितरणच्या या जीगरबाजाला मानाचा मुजरा!

-----------

फुलसिंग राठोड
जनसंपर्क अधिकारी
महावितरण, अमरावती परिमंडल.

# राजीनामा आणि साखर वाटप...



संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांनी मंगळवारी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर याबद्दल वेगवेगळ्या प्रतिक्रिया राजकीय वर्तुळतून उमटत आहेत. अहिल्यानगरमध्ये धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्यानंतर आनंद व्यक्त करण्यात आला आहे. मराठा समाज बांधवांनी साखर वाटप करून हा आनंद व्यक्त केला.

मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सीआयडीने आरोपपत्रात सादर केलेले फोटो आणि व्हिडिओ काल सोशल मीडियावर व्हायरल झाले. त्यानंतर राज्यभरातून संतापाची लाट उसळली. देशमुख यांच्या समर्थकांनी बीड बंदची देखील हाक दिली आहे. याच पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्यानंतर अहिल्यानगरमध्ये मराठा समाज बांधवांनी साखर वाटली आहे. यावेळी संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्यावी तसंच धनंजय मुंडे यांची आमदारकी देखील रद्द करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

एखाद्याला मंत्रीपद मिळाल्यानंतर साखर आणि पेढे वाढप केल्याच्या बातम्या वाचण्यात येत होत्या. परंतु, मंत्रीपद गेल्याने सामान्य लोकांकडून साखर वाटप जरा वेगळेच वाटले.

## प्रयागराजला आदर्श नियोजन करणारे योगी आदित्यनाथ!

वाचक लिहितात

मकर संक्रांती पासून महाशिवरात्रीपर्यंत प्रयागराजतीर्थावर महाकुंभपर्व संपन्न झाले.सनातन भारतीय संस्कृतीचा डंका विश्वभरात दुमदुमला! अलीकडच्या काळातील 'न भूतो न भविष्यती... असा हा धार्मिक सोहळा होता.

या सोहळ्याचे वर्णन योगी आदित्य नाथांनी फार मार्मिक शब्दात केले श्रद्धावानांची श्रद्धा वृद्धिंगत झाली, भक्तांची भक्ती फुलली, धर्माभिमान्यांनी धर्म परायणता जपली, पुण्यवंतांनी पुण्य संचय केला, अन्नछत्र चालवणाऱ्यांना जठराग्नी शांत झालेल्यांचे आशिर्वाद मिळाले, कामगारांना काम मिळाळे, उद्योगांची भरभराट झाली,पण ज्यांची वृत्ती छिद्रांन्वेषी होती त्यांना गंगा मातेचे पावित्र्य न दिसता वेगळेच काही दिसले. हा सोहळा संपन्न होण्यासाठी योगींनी गेले कित्येक महिने अथक परिश्रम केले.

मोठा कौटुंबिक सोहळा संपन्न झाल्यानंतर कुटुंब प्रमुख आपल्या कुटुंबातील सर्वांचे आदरातिथ्य करतो, त्याप्रमाणे योगींनीही सफाई कर्मचारी आणि पोलीस प्रशासनातील कर्मचारी यांच्या समवेत भोजन करून त्यांचा मानसन्मान केला कुंभ पवार्नंतरच्या स्वच्छता सेवेतही ते स्वतः सहभागी झाले. यामुळेच सर्वांनाच कृतकृत्य झाल्यासारखे वाटले.

जे अलीकडच्या काळात कधी घडले नाही ते योगींनी घडवले. भारताची गौरव गाथा सुवर्णाक्षरांनी लिहिली गेली. गंगामाता, भारतमाता आणि तिचे सुपुत्र गोरक्षनाथ पिठाचे उध्वर्यु , उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री महंत योगी आदित्यनाथ यांना त्रिवार वंदन!

■ श्रीमती संध्या काटदरे
माणगाव, रायगड.

# किशमिश आणि मनुका सारखेच आहेत का?



तुम्ही ड्राय फ्रुट्समध्ये किशमिशचा मोठ्या प्रमाणात वापर करत असाल. काळ्या, तपकिरी, पिवळ्या, हलक्या केशरी, हिरव्या किशमिशचे प्रकार दुकानांमध्ये तुम्ही पाहिले असतील. यासोबतच दुकानात आणखी एक पदार्थ असतो जो किशमिश सारखा दिसतो. पण तो किशमिश नसतो. तर तो पदार्थ मनुका असतो. जो पूर्णपणे किशमिश सारखाच दिसतो. दोन्ही पदार्थ दिसायला सारखे आहे पण वेगळे आहे. किशमिश आणि मनुका दोन्ही वेगळे पदार्थ आहेत.

**किशमिश आणि मनुकामध्ये अंतर?**

द्राक्ष हे फळ सुकवून मनुका बनवतात. त्यात अनेक रंग, प्रकार आहेत. तुम्हालाही मनुका आणि किशमिश यांच्यात फरक करता येत नसेल तर काळजी करू नका. बरेच लोक त्यास एकच मानतात, परंतु तसे नाही. किशमिश आणि मनुका यामध्ये खूप फरक आहे.

किशमिश एक ड्राय फ्रुट आहे. तर औषध म्हणून मनुक्याचा वापर होतो. दोघांमध्ये पोषक तत्व वेगळे असतात. मनुका खाल्ल्यामुळे शरीरातील रक्ताची कमतरता दूर होते. तर किशमिश खाल्ल्यामुळे बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून आराम मिळतो.

द्राक्षे सुकवून किशमिश बनवतात, तेव्हा द्राक्षांचे सर्व पोषक तत्व किशमिशमध्ये उतरतात. किशमिश तुम्ही ड्रायफ्रुड म्हणून खाता जे चवीला गोड असतं. तर मनुका देखील द्राक्ष सुकवून तयार करतात. पण ज्या द्राक्षांपासून मनुके तयार केले जातात ते आकाराने लहान असतात. मनुके औषधी कारणांसाठी देखील वापरले जातात. त्याची चवही गोड असते. यामुळे पोटाशी संबंधित समस्या दूर होतात. अपचन, गॅस, पचनाचे आजार प्रतिबंधित करते.

किशमिश छोटी द्राक्षे सुकवून बनवतात, तर मुनका थोडी मोठी आणि पिकलेली द्राक्षे सुकवून बनवतात. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे किशमिश मध्ये बिया नसतात पण मनुकामध्ये अनेक बिया असतात.

किशमिशमध्ये लोह, फायबर, प्रोटीन, कॅल्शियम, पोटॅशियम, व्हिटॅमिन बी 6 इत्यादी गुणधर्म असतात. तुम्ही दररोज 10-15 किशमिश खाऊ शकता. ज्यामुळे पचनक्रिया योग्य राहते.

मनुका शरीरातील लोहाची कमतरता भरून काढते. कमी रक्तदाब असलेल्यांसाठीही मनुका फायदेशीर आहे. उच्च रक्तदाब असल्यास मनुका खाणं टाळा. मनुका हृदयासाठी फायदेशीर आहे.

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### जगमे रह जायेंगे प्यारे..!

जिभेला हाड नाही म्हणून
काही कां बरळावं ?
त्यामुळे कुणाचे संसार होती
उध्वस्त, हे ही ध्यानात घ्यावं ..

जिभेपाशी आहे सुत्र
जोडावया शत्रु मित्र
म्हणून संयम व सबुरी
हेच यशस्वी जीवनाचे सुत्र ..

शब्दशक्ति आहे अनमोल
म्हणून तोलुन मापून बोल
कारण जगमे रह जायेंगे
आखरी प्यारे तेरे बोल ..!

# नेफ्रोप्लस तर्फे डायलिसिस योद्ध्यांसाठी नागपुरात आशाये कार्यक्रमाचे आयोजन

**नागपूर, ५ मार्च :** भारतातील सर्वात मोठे डायलिसिस केंद्रांचे नेटवर्क असलेल्या नेफ्रोप्लसतर्फे नागपूरमध्ये डायलिसीसवर असलेल्या रुग्णांच्या उत्थानासाठी आणि त्यांना मदतीचा हात देण्यासाठी आशाये या प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डायलिसिस रुग्णांचे सक्षमीकरण व्हावे हा या विशेष कार्यक्रमाचा हेतू होता. या विशेष कार्यक्रमाच्या माध्यमातून डायलिसिसवर असलेल्या रुग्णांना एकत्र येत संवाद साधण्याची, आपल्या अनुभवांची देवाणघेवाण करण्याची आणि डायलिसिस उपचाराच्या प्रवासात एकमेकांसाठी आधार शोधण्याची संधी मिळाली. नेफ्रोप्लस टीम, रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांना एकत्र आणत, २०० हून अधिक पाहुण्यांच्या उत्स्फूर्त सहभागासह हा कार्यक्रम एक समृद्ध अनुभव ठरला.

नागपूर येथील कुसुमती वानखेडे सभागृहामध्ये सकाळी ९ ते दुपारी २ दरम्यान हा कार्यक्रम संपन्न झाला. आशाये अंतर्गत विविध शैक्षणिक, मनोरंजनात्मक आणि प्रेरणादायी उपक्रम राबवले गेले. कार्यक्रमाची सुरुवात सांस्कृतिक सादरीकरणाने झाली. त्यानंतर तंबोला आणि

**डायलिसिस रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांना एकत्र आणणारा सामाजिक उपक्रम**



डिजिटल गेम्सचे आयोजन करण्यात आले जेणेकरून रुग्णांमध्ये सकारात्मकता आणि नवे कौशल्य अंगिकारण्याची जिद्द निर्माण होईल. वैद्यकीय तज्ञांचा वेबिनार कार्यक्रमाचे विशेष आकर्षण होते, ज्यामध्ये नामांकित नेफ्रोलॉजिस्ट, हृदयरोगतज्ञ आणि इतर प्रतिष्ठित आरोग्यतज्ञांसह अनुभवी आरोग्यसुविधा व्यावसायिकांनी यांनी मूत्रपिंडाचे आरोग्य राखण्याबाबत तसेच डायलिसिस प्रक्रिया समजून घेण्याबाबत आपले ज्ञान सर्वांसोबत सामायिक केले.

सुप्रसिद्ध वैद्यकीय तज्ञ डॉ. उत्कर्ष देशमुख कार्यक्रमाला विशेष पाहुणे म्हणून लाभले. कार्यक्रमाबाबत आपले विचार मांडताना ते म्हणाले, हा कार्यक्रम मूत्रपिंडाच्या आजाराशी लढणाऱ्या योद्ध्यांसाठी समर्पित आहे. आशा आणि जिद्दीचा हा उत्सव आहे. कला, शिक्षण आणि परस्पर सहकार्याच्या माध्यमातून डायलिसिस रुग्ण, त्यांचे कुटुंबीय, त्यांची काळजी घेणारे आणि संपूर्ण समाज यांना एकत्र आणण्याचे कार्य आशाये करत आहे. डायलिसिसच्या प्रक्रियेत अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असले तरी, ज्ञान, अनुभवांची देवाणघेवाण आणि सर्जनशीलता या प्रवासाला बळकट करत सकारात्मकतेचा मार्ग मोकळा करू शकते हे नेफ्रोप्लसच्या या कार्यक्रमाने दाखवून दिले.

नेफ्रोप्लसचे सह-संस्थापक कमल डी शाह यांनी या कार्यक्रमाविषयी प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले, आशाये हा डायलिसिस रुग्णांच्या जिद्दीचा आणि सामर्थ्याचा सन्मान आहे. नेफ्रोप्लसच्या माध्यमातून आम्ही शिकण्यासोबत आनंद निर्माण करणाऱ्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करतो. वर्षानुवर्षे रुग्णांचा मोठा प्रतिसाद पाहून या कार्यक्रमाचे महत्त्व अधोरेखित होते. रुग्णांचे सततचे सहकार्य आणि सहभागाबद्दल आम्ही मनापासून आभारी आहे, त्यांच्यामुळेच हा कार्यक्रम खऱ्या अर्थाने यशस्वी झाला आहे.

आशाये हा कार्यक्रम प्रेरणादायी आणि सकारात्मक वातावरणात पार पडला. डायलिसिस रुग्णांच्या संघर्षशीलतेचा आणि आनंदी जीवन जगण्याच्या त्यांच्या दृढनिश्चयाचा यावेळी सन्मान करण्यात आला.

## सॅमसंग इंडियाकडून ऑसम इंटेलिजन्स, ऑल-न्यू डिझाइन आणि सुधारित टिकाऊपणा असलेले गॅलॅक्सी ए५६ ५जी, गॅलॅक्सी ए३६ ५जी लाँच



**गुरूग्राम, भारत ५ मार्च :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज ऑसम इंटेलिजन्स असलेले गॅलॅक्सी ए५६ ५जी आणि गॅलॅक्सी ए३६ ५जी च्या लाँचची घोषणा केली. या स्मार्टफोन्समध्ये सर्जनशीलतेला नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी अद्भुत सर्च व व्हिज्युअल अनुभव आहेत. ऑल-न्यू डिझाइनशैली असलेल्या नवीन गॅलॅक्सी ए सिरीज स्मार्टफोन्समध्ये सुधारित टिकाऊपणा व कार्यक्षमता, तसेच प्रबळ सुरक्षितता आणि गोपनीयता संरक्षण देखील आहे.

गॅलॅक्सी ए५६ ५जी आणि गॅलॅक्सी ए३६ ५जी मध्ये ऑसम इंटेलिजन्स उपलब्ध आहे, जे भारतातील ग्राहकांसाठी एआयचे लोकशाहीकरण सक्षम करते. सर्वसमावेशक मोबाइल एआय सूट ऑसम इंटेलिजन्स प्रगत एआय वैशिष्ट्ये सादर करते, जसे गॅलॅक्सीची फॅन-फेव्हरेट एआय वैशिष्ट्ये. गुगलचे सुधारित सर्कल टू सर्च वैशिष्ट्ये फोनच्या स्क्रिनवरून सर्च व डिस्कव्हर अधिक सोपे करते. सर्कल टू सर्चमधील सुधारणांसह वापरकर्ते त्यांना ऐकायला येणारी गाणी त्वरित सर्च करू शकतात, ज्यासाठी ॲप्समध्ये स्विच करण्याची गरज भासणार नाही. त्यांच्या फोनमधून सोशल मीडियावर गाणे प्ले करायचे असो किंवा त्यांच्याजवळ असलेल्या स्पीकर्समधून ऐकू येणारे संगीत असो, सर्कल टू सर्च कार्यान्वित करण्यासाठी फक्त नेव्हिगेशन बारवर लाँग प्रेस करून ठेवा, त्यानंतर गाण्याचे नाव व आर्टिस्ट ओळखण्यासाठी म्युझिक बटनवर टॅप करा.

ऑसम इंटेलिजन्समध्ये इंटेलिजण्ट व्हिज्युअल एडिटिंग वैशिष्ट्यांची श्रेणी देखील आहे, जसे ऑटो ट्रिम, बेस्ट फेस, इन्स्अण्ट स्लो-मो आणि इतर अनेक. ऑटो-ट्रिम व बेस्ट फेस फ्लॅगशिप-लेव्हल एआय वैशिष्ट्ये आहेत, जी आता गॅलॅक्सी ए५६ ५जी सह लोकशाहीकरण होत आहेत. नवीन स्मार्टफोन्समध्ये ऑब्जेक्ट एरेजर देखील आहे, जे वापरकर्त्यांना फोटोजमधून नको असलेले व्यत्यय काढून टाकण्याची सुविधा देते. तसेच, फिल्टर्स फोटोमधील रंग व स्टाइल्स बदलत सानुकूल फिल्टर निर्मिती करते, ज्यामुळे वापरकर्ते मूड व आवडीनुसार अद्वितीय आणि वैयक्तिकृत इफेक्ट देऊ शकतात.

## अरविंद लिमिटेडच्या फॉर ऑल काईंड्स ऑफ कुल मोहिमे तर्फे लिनेनला नवे स्वरूप देण्याचा प्रयत्न

**नवी दिल्ली, ५ मार्च :** आंतरराष्ट्रीय तसेच देशांतर्गत ग्राहकांसाठी फायबर-टू-फॅशन सोल्यूशन्स प्रदान करणाऱ्या अरविंद लिमिटेडने आपल्या नवीन समर कॅम्पेन 'Linen by Arvind, For All Kinds of Cool' ची घोषणा केली आहे. हे कॅम्पेन उन्हाळ्यात लिनेन कपड्यांच्या स्टाईल आणि आरामदायक वैशिष्ट्यांना नव्याने परिभाषित करण्यासाठी सादर करण्यात आले आहे, विशेषतः त्यांच्यासाठी जे उन्हाळ्यात लिनेनला प्राधान्य देतात.

या मोहिमेच्या अंतर्गत, अरविंद लिमिटेडने ३०० हून अधिक नवीन स्टाईल्ससह आपल्या लिनेन कलेक्शनचा विस्तार केला आहे. या नव्या कलेक्शनमध्ये Intelli-fabric तंत्रज्ञानाचा समावेश आहे, ज्यात रिंकल-रेझिस्टंट लिनेन, ब्रिदेबल ब्लेंड्स आणि ऊन लिनेन यांसारखी वैशिष्ट्ये आहेत, जी आधुनिक जीवनशैलीला पूरक आहेत. याशिवाय, सुटिंग रेंजमध्येही विविध पर्याय समाविष्ट करून, ऑफिस तसेच खास प्रसंगांसाठी स्टायलिश आणि आरामदायक लिनेन कपडे उपलब्ध करण्यात आले आहेत. हे नवे कलेक्शन देशभरातील १६०+ 'The Arvind Store' आणि प्रमुख मल्टी-ब्रँड आउटलेट्समध्ये उपलब्ध आहे.

अरविंद लिमिटेडचे चीफ बिझनेस ऑफिसर प्रणव दवे म्हणाले, लिनेनला नेहमी उन्हाळ्यासाठी उत्तम पर्याय म्हणून पाहिले जाते. मात्र, या नव्या कलेक्शनद्वारे आम्ही लिनेन फक्त उन्हाळ्यासाठीच नव्हे, तर वर्षभर वापरण्यास योग्य असा कपडा म्हणून सादर करत आहोत. सध्याचे फॅशन ट्रेंड्स बहुपयोगी कपड्यांकडे झुकत आहेत आणि लिनेन ही या गरजांसाठी उत्तम निवड आहे. ऑफिस, प्रवास किंवा दैनंदिन जीवन लिनेन हा सदैव ट्रेंडी आणि आरामदायी पर्याय आहे. आम्हाला लोकांना केवळ त्याच्या आरामदायी गुणधर्मांसाठीच नव्हे, तर आत्मविश्वास वाढवणाऱ्या शैलीसाठीही प्रेरित करायचे आहे. खरी स्टाईल हीच, जी तुम्हाला चांगले दिसण्यासह उत्तम वाटण्याची अनुभूती देते.

## ग्रामीण भागातील स्थलांतराची समस्या सोडवण्याबरोबरच लहान शेतकऱ्यांना समृद्ध करण्यासाठी डेयरी हा एक महत्त्वाचा पर्याय

**नवी दिल्ली, ५ मार्च :** केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री तसेच भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते अमित शाह यांनी डेअरी क्षेत्रातील शाश्वतता आणि परिपूर्णता (सर्कुलरिटी)' या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी हे स्पष्ट केले की, ग्रामीण भागातील स्थलांतराची समस्या सोडवण्याबरोबरच लहान शेतकऱ्यांना समृद्ध करण्यासाठी डेअरी म्हणजेच दुग्धव्यवसाय हा एक महत्त्वाचा पर्याय आहे. परिपूर्णतेशी संबंधित उपयुक्त पद्धती २५० दुग्ध उत्पादक संघांपर्यंत पोहोचवण्यासाठी डेयरी क्षेत्राने आज एक दूरदर्शी सुरुवात केली आहे.

देशाच्या विकासासह ग्रामीण भागाच्या विकासात आणि भूमीहीन तसेच लहान शेतकऱ्यांना समृद्ध बनविण्यात भारताच्या डेयरी क्षेत्राचा मोठा वाटा आहे यात शंका नाही. पोषणविषयक समस्यांचे निराकरण करण्यात, भारताला जगातील क्रमांक एकचा दुग्ध उत्पादक देश बनविण्यात आणि शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध करून देण्यात डेअरी क्षेत्र महत्वाची भूमिका बजावत आहे.

कृषी, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, विणकाम, पतपुरवठा आणि व्यापार अशा विविध उपक्रमांमध्ये सक्रिय असलेल्या आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या कणा असलेल्या सहकार



क्षेत्राची स्वातंत्र्यानंतरही दीर्घकाळ उपेक्षा करण्यात आली होती. भारतातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहकार क्षेत्राशी जोडलेली असतानाही या क्षेत्राकडे फारसे लक्ष दिले गेले नव्हते. याच पार्श्वभूमीवर मोदी सरकारने जुलै २०२१ मध्ये ऐतिहासिक निर्णय घेत सहकारिता मंत्रालय स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आणि त्याचा कार्यभार केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे सोपवण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सहकारातून समृद्धि ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी स्वतंत्र सहकारिता मंत्रालय स्थापन केले, तर लोककल्याणाशी संबंधित धोरणांसाठी प्रसिद्ध असलेले भारतीय राजकारणातील चाणक्य अमित शाह यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सहकार क्षेत्राचा पाया मजबूत करण्याचे अभूतपूर्व काम केले जात आहे. देशभरातील विविध राज्यांमध्ये सहकारी संस्थांची निर्मिती आणि मजबुतीकरण याचे द्योतक आहे.

मोदीजींची दूरदर्शी विचारसरणी आणि अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली २०२३-२४ चा सादर झालेला पहिला केंद्रीय अर्थसंकल्प हा सहकार क्षेत्रासाठी विशेष तरतुदी असलेला होता, जो एक स्तुत्य उपक्रम होता. पुढील पाच वर्षांत २ लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था/डेअरी/मत्स्य सहकारी संस्थांच्या स्थापनेने ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील व सहकार क्षेत्राला देखील बळकटी मिळेल.

मोदीजींच्या नेतृत्वाखाली आणि अमित शाह यांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली सहकार मंत्रालय सहकार क्षेत्राच्या उन्नतीसाठी विविध योजनांवर काम करत आहे. गेल्या तीन वर्षांत देशात केवळ सहकार चळवळीलाच गती मिळाली नाही, तर तळागाळापर्यंत तिचा आवाका वाढवण्याचे प्रयत्नही वेगाने सुरू आहेत. तसं पाहिलं तर मोदीजींच्या नेतृत्वाखाली सहकार चळवळ अधिक उर्जेने पुढे नेण्याचे काम अमित शाह यांच्या कार्यकाळात झाले आहे. अमृतकाळात शेतीपासून कारखान्यापर्यंतची संपूर्ण साखळी गावोगावी उभी करण्यावर भर देताना शाह यांनी स्पष्ट केले की, मोदी सरकार सहकारातून शक्ती, सहकारातून सहयोग आणि सहकारातून समृद्धी या त्रिसूत्री 'प्रॉफिट फॉर पीपल' मंत्राची अंमलबजावणी करत आहे.

पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांची जोडी सहकारातून समृद्धी या मंत्राद्वारे 'गाव ते ग्लोबल'चा प्रवास सोपा करण्यासाठी आणि अनेक वर्षांपासून जाणीवपूर्वक दुर्लक्षित सहकारी संस्थांना नवे आयाम देण्यासाठी प्रयत्नशील आहे. 'संकल्प ते सिद्धी' असा हा प्रवास ग्रामीण भारताला आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टीने महत्वाचा ठरेल असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

## एक शो, दोन व्यक्तिरेखा: कैसे मुझे तुम मिल गये मधील अर्जित तनेजाचा दमदार अभिनय

**मुंबई, ५ मार्च :** झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'कैसे मुझे तुम मिल गये'ने हल्लीच दोन वर्षांची रोमांचक झेप घेतली असूनआतायामालिकेत नवीन वळणे, नवीन व्यक्तिरेखा आणि प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे आकर्षक नाट्य सादर केले जाणार आहे. या मोठ्या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी प्रतिभावान कलाकार अर्जित तनेजा आहे, जो विराट आहुजाची भूमिका साकारत असतानाअचानकएका नाट्यमय स्मृतीभ्रंशाच्या वळणानंतर रणवीर अरोरा या पूर्णपणे नवीन व्यक्तिरेखेमध्ये सहजपणे प्रवेशकरतो. या बदलामुळे अर्जितला एकाच मालिकेत करण्याच्या अनोख्या आव्हानाला सामोरे जावे लागत आहे. त्यात रणवीर विराटच्या रूपात आपल्या भूतकाळातील काही तुकडे एकत्र करण्यास सुरुवात करतो.

विराट त्याच्या भूतकाळ आणि कौटुंबिक संघर्षांमध्ये खोलवर रुजलेला असला तरी, रणवीर हे एक नवीन व्यक्तिमत्व आहे ज्याची स्वतःचीअशी शैली, दृष्टिकोन आणि प्रेरणा आहेत. या दोन्ही व्यक्तिमत्त्वांमधील तीव्र फरक चाहत्यांना आकर्षित करतो. त्यांना रणवीरची डायनामिक ऊर्जा आणि अद्वितीय व्यक्तिमत्त्व आवडतआहे. दोघांमधील अंतर्निहित संबंध असूनहीरणवीरची व्यक्तिरेखा, अभिव्यक्ती आणि भावना विराटपेक्षा वेगळ्या आहेत याची खात्री करण्यासाठी अर्जितकसोशीनेकाळजी घेत आहे. अशाप्रकारच्यादुहेरी भूमिका साकारणे सोपे काम नाही, परंतु अर्जितनेअतिशय समर्पणाने हेआव्हान स्वीकारले आहे. विराट आणि रणवीरच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये संक्रमण करण्यासाठी त्यालाप्रचंड लक्ष केंद्रित करावे लागते, कारण तो भूतकाळातील आठवणींचे क्षण रणवीरच्या नवीन वास्तवाशी संतुलित करतो.

या दुर्मिळ संधीबद्दल उत्साह व्यक्त करताना अर्जित तनेजा म्हणाला, एकाच मालिकेत दोन वेगवेगळ्या व्यक्तिरेखा साकारण्याची संधी मिळणे हे कोणत्याही अभिनेत्यासाठी स्वप्न असते. रणवीर हा विराटच्या अगदी विरुद्ध आहे आणि त्याच्या जागी पाऊल ठेवणे म्हणजे पूर्णपणे नवीन जगात प्रवेश करण्यासारखे आहे. विराट गहन, भावनिक आणि आपल्या भूतकाळात खोलवर रुजलेला होता, तर रणवीर आत्मविश्वासू, करिष्माई आणि जीवनाकडे अधिक खुल्या दृष्टीने पाहणारा असा आहे. माझ्या कलेचे निरनिराळे पैलू शोधणे आणि या परिवर्तनासह प्रेक्षकांना आश्चर्यचकित करण्याचाअनुभव खूप रोमांचक आहे. कधीकधी दोन्ही भूमिकांमध्ये बदल करणे म्हणजे एक रोलरकोस्टर राईडचअसते - मी सकाळी विराटच्या भूमिकेत भावनिक फ्लॅशबॅक दृष्य चित्रित करतो तर संध्याकाळी भडक आणि स्टायलिश अशा रणवीरमध्ये स्वतःचेरूपांतरकरतो. हे संक्रमण कठीण आहे, परंतु अत्यंत समाधानकारकदेखील आहे. प्रत्येक व्यक्तिरेखेच्या मानसिकतेमध्ये स्वतःला वाहूनघेणे, प्रेक्षक त्यांना दोन पूर्णपणे भिन्न व्यक्ती म्हणून पाहतील याची खात्री करणे हीच याची गुरुकिल्ली आहे. माझ्या दोन्ही व्यक्तिरेखांमध्ये प्रामाणिकपणा आणण्यासाठी मी आवाजाचे मॉड्युलेशन आणि माझ्या देहबोलीवर मोठी मेहनत घेतलीआहे आणि चाहत्यांकडून मला मिळत असलेल्या प्रेम आणि कौतुकाबद्दल मी त्यांचाआभारी आहे.

प्रेक्षकांनी या नवीन वळणाला खूप उत्तमप्रतिसाद दिला असूनअनेकांनी अर्जितच्या भूमिकांमधील सहज बदलाचे कौतुक केले आहे. कैसे मुझे तुम मिल गयेआपलीआकर्षक कथा उलगडत आहे. यामालिकेच्याआगामी भागांमध्ये प्रेक्षक अधिक भावनिक खोली, अनपेक्षित वळणे आणि प्रेम, ओळख आणि नशिबाच्या मर्यादांची चाचणी घेणाऱ्या मनमोहक प्रवासाची अपेक्षा करू शकतात.

## आज का अंदाज

गुरूवार ६ मार्च २०२५

### खुल जा सीम सीम

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ५ | ७ | २ | ६ | ७ | ८ |
| १०० | १५८ | २३० | २५० | ११० | २४० | १६० | १२५ |
| ३३५ | २२० | ४५६ | ३४० | २०० | १५० | २२३ | २२४ |
| २९० | ४४६ | १२२ | ७०० | २२८ | १२३ | ३४० | ३५० |
| १२ | ४२ | ५२ | ७३ | २१ | ६४ | ७१ | ८४ |
| १३ | ४५ | ५४ | ७५ | २४ | ६५ | ७५ | ८६ |
| १४ | ४७ | ५७ | ७० | २८ | ६८ | ७६ | ८७ |

**६ मार्च : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | ३२ | ६३ | ०१ |
| २५ | ३६ | ६५ | ०४ |
| २६ | ३७ | ६७ | ९६ |

## सोनी सबवरील वीर हनुमान: एक भव्य महाकाव्य उलगडणार


**मुंबई, ५ मार्च :** सोनी सब वाहिनी आपल्या वीर हनुमान या नव्या मालिकेतून हनुमानाचे जीवनचरित्र आपल्या प्रेक्षकांसमोर उलगडणार आहे. बाल मारुतीच्या जीवनातील कमी ज्ञात असलेल्या कथांचे चित्रण बघायला मिळणार आहे, ज्यामध्ये त्याला आपल्या जीवनाचा खरा उद्देश काय आहे, याचा शोध लागतो आणि त्यानुसार त्याची पुढील वाटचाल होते. भक्ती आणि श्रद्धेने ओतप्रोत असलेली, स्वस्तिक प्रॉडक्शन्सद्वारा निर्मित ही मालिका ११ मार्च रोजी सुरू होत असून दर सोमवार ते शनिवार रात्री ७:३० वाजता मालिका प्रसारित करण्यात येणार आहे. मारुतीचा बालपणीचा लोभस खोडकरपणा आणि त्यातूनच भक्ती, युक्ती आणि शक्तीचे प्रतीक म्हणून उदयाला आलेल्या या देवतेचे चित्रण प्रेक्षकांसमोर येत आहे. दमदार कथा




आणि समृद्ध कथा मांडणीच्या बळावर ही मालिका भारतीयांच्या एका लाडक्या दैवताचे जीवनचरित्र पडद्यावर साकारत आहे, जे नव्या पिढीच्या प्रेक्षकांना देखील आकर्षित करेल.

या मालिकेत बाल हनुमानाच्या भूमिकेत आन तिवारी सोबत अंजनीच्या भूमिकेत सायली साळुंखे, केसरीच्या रूपात आरव चौधरी आणि वाली व सुग्रीव यांच्या दुहेरी भूमिकेत माहिर पांधी दिसणार आहे. या मालिकेत बाल हनुमानाचे निष्पाप रूप दिसेल तसेच स्वतःच्या दिव्य शक्तींची वाढती जाणीव आणि त्याच्या मार्गातील अडचणी व त्यावर मात करण्याची त्याची क्षमता दिसेल. हनुमानाची कथा आजही लक्षावधी लोकांसाठी मार्गदर्शक शक्ती म्हणून कार्य करते. हनुमान कथा ही धैर्य, निःस्वार्थतेची आणि वाईटावर चांगल्याच्या विजयाची कालातीत कहाणी आहे.

## शब्दकोडे क्रमांक २०५२



**आडवे शब्द :-**

१) खूप, फार, अतिशय
३) माणूस, आदमी
६) कृश होणे वाळणे
८) सर्प
१०) बगळा
१२) श्रीयुत
१३) अपहार
१४) तात्काळ
१७) आरडाओरड, कल्लोळ
१९) गोंधळ व अव्यवस्थेची स्थिती
२३) समशेर
२५) छिद्रातून जमिनीवर पडणारा प्रकाश
२७) रात्रभर
२९) निराश
३१) सापाची एक जात
३२) युक्ती
३४) एक द्विदल धान्य
३५) विहिरीतून पाणी काढण्याचे विशिष्ठ प्रकारचे भांडे
३७) मन स्वाधीन असलेला, लहरी, निधड्या छातीचा
३९) वाहतूक
४१) चाकरी करणारा
४२) देणारा
४३) निमित्त
४४) आरोप
४५) शपथ
४७) पराभवाची माळ
४८) एकाद्यास मृत्युपासून वाचविणे
५१) कान
५२) पाणी
५३) एक प्रश्नार्थक शब्द
५४) पुरुष
५६) फायदा
५७) होडी, जहाज इ
६०) मोठी सुरी
६१) अमृत
६२) बुटका, बटु
६३) आकाशाला भिडणारे
६४) विष
६६) मालक
६७) अहंकार, ताठा
७०) जीव
७१) मृत्यू नसलेला
७३) लाकूड कापण्याचे साधन
७५) श्रम, मेहनत
७६) नर्तन
७७) राजाला, वरिष्ठाला दिलेली भेट वस्तू
७८) उंट हाकणारा

**उभे शब्द :-**

१) अमर्याद
२) विडा साहित्याचे ताट
४) सारखा
५) राजा
६) घोडा
७) कमळाचे तळे
८) तात्पर्य
९) मातीचा दिवा
११) जेमतेम, मोठ्या मुश्किलीने
१३) वस्तुंच्या जागा सारख्या बदलणे
१५) चिकटविणे
१६) मातीचा कण
१८) शंकर
२०) अंड्यातील पिवळा भाग
२१) प्राचीन
२२) पद्धत
२४) वल्लरी
२५) पंकज
२६) भित्रा
२८) मदत
३०) शांत करणे
३२) एक रत्न
३३) माया, प्रेम
३४) पाणी
३६) कापडाचा एक प्रकार
३८) घेणे, अंगीकार
३९) गोव्याची राजधानी
४१) छचोर चाळे करणारी स्त्री
४२) किंमत
४६) संपूर्ण
४७) त्रास, कष्ट
४९) सिंह
५०) दरवाजा
५२) आपले राष्ट्रगीत
५५) गाढव
५७) लोकसंख्येची मोजणी
५८) यज्ञ
५९) उंदीरासारखा एक प्राणी
६१) परमेश्वर
६५) एकाच्या हातातून दुसऱ्याच्या हाती देणे
६६) हिंमत, धैर्य
६८) नवऱ्याचा भाऊ
६९) नशीब
७२) पराग
७३) मणका
७४) व्रत

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## राशीभविष्य

**मेष :** जवळच्या मित्राची भेट होईल. राजकारणात तुमचे विरोधक पराभूत होतील. आज न्यायालयीन खटल्यांमध्ये यशासोबतच नुकसानही सहन करावे लागेल. आज आर्थिक स्थिती सुधारेल.

**वृषभ :** आज तुम्हाला पालकांकडून सहकार्य मिळेल. समाजात मान-सन्मान मिळेल. प्रेमसंबंधांमध्ये भावनिक वागणूक जवळ आणेल. लग्नाची चर्चा पुढे नेण्यापूर्वी एकमेकांची योग्य काळजी घ्या आणि नात्याला वेळ द्या.

**मिथुन :** काही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर झाल्यास आर्थिक लाभ होईल. तुम्हाला तुमच्या नोकरीत पैसे आणि भेटवस्तू मिळतील. सामाजिक कार्यावर जास्त पैसा खर्च करण्यापूर्वी तुम्ही नीट विचार केला पाहिजे.

**कर्क :** आज आर्थिक स्थितीत चढ-उतार असतील. उत्पन्न चालू राहील पण खर्च जास्त होईल. घरामध्ये धार्मिक शुभ अधिकाजयांवर पैसा खर्च होण्याची शक्यता आहे. शहाणपणाने पैसे खर्च करा.

**सिंह :** बेरोजगारांना रोजगार मिळेल. नको त्या प्रवासाला जावे लागेल. राजकारणात विरोधक अधिक सक्रिय होतील. विज्ञान आणि संशोधन कार्यात लक्षणीय यश मिळेल. ज्याचे सर्वत्र कौतुक होईल.

**कन्या :** आज तुम्हाला वैवाहिक जीवनात आनंददायी काळ जाईल. पर्यटनस्थळी सहलीला जाता येईल. प्रेमप्रकरणात पैसा जास्त खर्च होईल. एखाद्या चांगल्या मित्राकडून चांगली बातमी मिळेल.

**तुळ :** आज तुमचे वरिष्ठ तुमचे व्यवहार आणि गोड बोलण्याने खूप प्रभावित होतील. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल. कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील.

**वृश्चिक :** आज तुमच्या संचित संपत्तीत वाढ होईल. प्रलंबित पैसे मिळण्यात काही वाढ होऊ शकते. व्यवसायाशी संबंधित लोकांना अचानक पैसे मिळू शकतात. एखादी महागडी वस्तू खरेदी करता येईल.

**धनु :** आई-वडिलांची सेवा केल्याने तुम्हाला आशीर्वाद मिळेल. आज आरोग्यात बिघाड होईल. गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या लोकांना उपचारासाठी घरापासून दूर जावे लागेल.

**मकर :** आज जुनी जखम बरी होऊ शकते. म्हणजे जुना प्रतिस्पर्धी नव्या रूपात समोर येऊ शकतो. आज तुम्हाला मुलांकडून काही चांगली बातमी मिळेल. अभ्यास आणि व्यवसायाशी संबंधित लोकांना विशेष यश मिळेल.

**कुंभ :** काही अनुचित घटना घडण्याची शक्यता आहे. पाठदुखीचा त्रास कायम राहील. आज परदेश दौजयावर किंवा लांबच्या प्रवासाला जाण्याची शक्यता आहे. उद्योगधंद्यातील अडथळे दूर होतील.

**मीन :** तुम्हाला तुमच्या सासरच्या मंडळींकडून काही शुभ कार्यक्रमाचे आमंत्रण मिळेल. व्यवसायात नवीन सहकारी प्रगतीचे घटक सिद्ध होतील. सरकारच्या सहकार्याने योजना मार्गी लागतील.

महासागर अकोला

●गुरुवार,दि.६ मार्च २०२५



# डॉ. शरद गडाख यांच्याकडे राहुरी विद्यापीठाच्या कुलगुरु पदाचा प्रभार

**अकोला :** स्थानिक डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्याकडे राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा कुलगुरु पदाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. राज्यपालांच्या निर्देशान्वये हा प्रभार दिला गेला आहे. डॉ. शरद गडाख यांची अकोला कृषि विद्यापीठाचे कुलगुरु होण्यापूर्वी ते महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये संशोधन व विस्तार शिक्षण संचालकपदी कार्यरत होते हें उल्लेखनीय.डॉ. शरद गडाख यांनी अकोला चे कुलगुरू म्हणून १९ सप्टेंबर २२ पासून सूत्र हाती घेतले. डॉ. गडाख यांच्या



नावीन्यपूर्ण आणि व्यावसायिक दृष्ट्या महत्वपूर्ण उपक्रमांची मालिका यामध्ये विद्यापीठाची पडीक जमीन लागवडीखाली आणने,विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक जिल्ह्यात विद्यापीठाचे विक्री केंद्र सुरु करणे, फळबागेखाली लागवड क्षेत्र वाढविणे, विविध फळांचे प्रात्यक्षिक प्रकल्प, सेंद्रिय शेती प्रकल्प, शेतकरी शास्त्रज्ञ मंच, तर विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक परीक्षा मंच, उद्योजकता विकास मंच, हायटेक ॲग्री मंच यासारखे नाविन्यपूर्ण उपक्रम त्यांनी राबविले. डॉ. शरद गडाख यांच्या प्रदीर्घ अनुभवाची नोंद घेत राज्यपाल मा. सी. पी. राधाकृष्णन यांनी डॉ. गडाख यांना राहुरी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त पदभार दिला आहे.

## टँकरमधून लिक्विड नायट्रोजन गॅस गळती



**टँकरमधून लिक्विड नायट्रोजन गॅस गळती झाल्याची घटना मंगळवारी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २३ वरील रामटेक फाट्याजवळ घडली. हा टँकर गुजरातकडून नागपूरकडे जात होता. अचानक गॅस गळती सुरूझाल्याने परिसरात खळबळ उडाली होती.**

# एस.टी.कामगारांच्या विविध आर्थिक लाभसाठी शासनाने केलेली फसवणूक

**▪अकोला,दि.५ (प्रतिनिधी):**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे (एसटी) कर्मचारी बुधवारी (५ मार्च २०२५) राज्यभरातील आगार वा एसटी महामंडळाच्या विभागीय नियंत्रक कार्यालय परिसरात आंदोलन केले आहे. वर्ष २०२० रोजी पगारवाढ जाहीर झाल्यावरही महामंडळासह शासन कामगारांवर कसे अन्याय करत आहे, त्याबाबत आंदोलकांनी महत्वाचा भाष्य केले आहे. अकोल्यातील एसटी महामंडळाच्या एसटी महामंडळाचया विभाग नियंत्रक कार्यालय परिसरात एसटी कामगारांकडून बुधवारी (५ मार्च २०२५) दुपारी आंदोलन केले आहे. महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट .कामगार संघटनेच्या नेतृत्वात हे आंदोलन केले आहे. आंदोलनाचे नेतृत्व करणारे महाराष्ट्र एस. टी. कामगार संघटनेचे विभागीय सचिव रुपम वाघमारे,, विभागीय अध्यक्ष यांनी केले.

शासनाने एस टी कामगारांना पाच महीन्या पूर्वी दिलेल्या पगार वाढीत नमूद केलेल्या कालावधी नुसार पगार वाढ दिली नाही. विविध संघटनांच्या संयुक्त कृती समीती सोबत महामंडळ व शासनासोबत झालेल्या चर्चेनुसार एप्रिल २०२० पासून पगार वाढ शासनाने जाहीर केली परंतू प्रत्यक्ष देते वेळी एप्रिल २०२४ पासून दिली व एस टी कामगारांची फसवणूक झाली. तसेच या सोबतच अनेक मागन्या सुद्धा प्रलंबित आहे. त्यामुळे न्याय हक्कासाठी एसटीच्या कामगारांना हे आंदोलन करावे लागत आहे. शासनासह एसटी महामंडळाने तातडीने मागण्या मान्य न केल्यास हे आंदोलन भविष्यात तिव्र केले जाणार असल्याचा इशाराही दिला. आंदोलनात विभागीय अध्यक्ष गणेश डांगे, विभागीय सचिव रुपम वाघमारे, युनिट सचिव युवराज जाधव, युनिट अध्यक्ष चैताली म्हस्के, राहुल ताटे, राहुल शट्टेल, दिपक मोगरे, योगिता तिवारी, प्रदीप सोनखासकर, मिलिंद धवस आणि इतरही पदाधिकाऱ्यांसह कर्मचारी उपस्थित होते.

महामंडळाने सन २०१६- २०२० मध्ये केलेल्या एकतर्फी केलेल्या करारातील उर्वरीत रक्कमेचे वाटप करावे, एसटी कर्मचाऱ्यांना २०१८ पासूनची महागाई भत्ताची थकबाकी द्यावी, शासकीय कर्मचारी यांचे प्रमाणे ५३ टक्के वाढीव महागाई भत्ता देण्यात यावा, करारा नुसार ३ टक्के वार्षिक वेतन वाढीची थकबाकी द्यावी, कामगार करारानुसार ८ टक्के, १६ टक्के, २४ टक्के नुसार घरभाडे भत्त्याची थकबाकी देण्यात यावी, जाचक शिस्त व आवेदन पद्धत रद्द करून नविन पद्धत सुरू करावी, प्रवासी भाडेवाढ पूर्वी प्रमाणे ५ रुपयांच्या पटीत करावी आणि इतरही एकूण १६ मागण्या शासनाकडे आंदोलकांकडून करण्यात येत आहे.

# एमआरआय मशीन खरेदीचा मुद्दा गाजला

## आ. साजिद खान आक्रमक ; निधी परत जाण्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**▪अकोला,दि.५ (प्रतिनिधी):**
सवीपचार रुग्णालयात एमआरआय मशीन खरेदीसाठी आलेला निधी हा तसाच परत गेला, त्यामुळे या निधी परत जाण्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व लवकरात लवकर एम आरआय मशीन खरेदी करून कार्यान्वित करण्यात यावी अशी मागणी पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बुधवारी लावून धरली.

विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवारपासून सुरू झाले. बुधवारी अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांनी जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय व्यवस्था कोलमडली असल्याचे



म्हणत त्याचा परिणाम गोरगरीब जनतेला भोगावे लागत असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

यावेळी आ. पठाण म्हणाले की, सन २०१७ मध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने एम आरआय टेस्ला ३ मशीन खरेदी करण्याबाबत प्रस्ताव पाठविला होता, त्यानुसार वैद्यकीय महाविद्यालयाला तब्बल १० कोटी ९० लक्ष रुपयांचा निधी सुद्धा मंजूर करण्यात आला होता. मात्र गेली आठ वर्ष उलटूनही ही मशीन अद्यापही का खरेदी करण्यात आली नाही ?

निधी परत गेला तर तो निधी परत जाण्यास जबाबदार कोण ? आतापर्यंत अनेक रुग्ण जे एमआरआय मशीन कार्यान्वित नसल्याने प्रभावित झाले त्याची जबाबदारी कोणाची ? यांसह चक्क प्रश्नांचा भडिमार केला. यावर आरोग्य मंत्री यांनी उत्तर देत निधी परत गेला यास कोणी एक घटक जबाबदार नसल्याचे सांगितले असता आ. वडेट्टीवार यांनी सुद्धा काही उपप्रश्न विचारले.

यावेळी स्वतः विधिमंडळ अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मध्यस्थी करीत अधिवेशन संपण्यापूर्वी अकोला शासकीय वैद्यकीय रुग्णालय आणि राज्यातील इतर रुग्णालयाचा प्रश्न मार्गी लावण्याचे आदेशित केले.

# भक्तिभावात झाला,'श्याम के दिवाने'चा श्याम फागुण उत्सव

## ढप,चंग व पुष्प व होळी नृत्याचा जल्लोष





**▪अकोला,दि.५ (प्रतिनिधी):** महानगरातील 'श्याम के दिवाने' समूहाच्या वतीने स्थानीय स्टेटस लॉन मध्ये आयोजित तृतीय भव्य श्याम फागुण उत्सवास भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत यात सहभाग घेतला.यावेळी ढप चंग समवेत फुलांची होळी सोबत खाटू श्यामच्या अवतारावर भव्य भजन संध्या संपन्न झाली.या संगीत उत्सवात जयपूर चे प्रसिद्ध भजन गायक चैतन्य दधिच,गुडग़ांव ची भजन गायिका सौ. वर्षा गर्ग व जयपूरचा प्रसिध्द बँड बंदुभाई म्युझिकल गृप यानी श्यामबाबाचे संगीतमय भजने व भक्तिगीते सादर करीत भक्तिभाव निर्माण केला.या भजन संध्येत राजस्थानी कलाकारांनी ढप,चंग व बासरीवर आपली कला सादर करीत जल्लोष निर्माण केला.यावेळी उपस्थित महीला, पुरुषांनी 'हारे का सहारा, श्याम हमारा'चा जयघोष करीत सामूहिक नृत्य केले. उत्सवात श्यामबाबाची दिव्य झाकी व दिव्य ज्योत साकार करण्यात आली.या झाकीच्या दर्शनार्थ उत्सव स्थळी भक्तांची लांब रांग लागली होती. पूजा विधी पं श्रीकांत यांनी तर श्यामबाबाची श्रृंगार व सजावट सेवा





कु.आरती शिवकुमार पंडित,श्री श्याम श्रृंगार समितीच्या वतीने करण्यात आली. उत्सवात उपस्थित भाविकांवर पुष्प व अत्तर वर्षा करण्यात येऊन होळीचा जल्लोष व अन्य खेळ खेळण्यात आले.चैतन्य दधिच व सौ. वर्षा गर्ग यांनी श्यामबाबाची भक्तिगीते व भजने करून भक्तीभाव निर्माण केला.प्रारंभी भजनकार उमेश शर्मा डब्बू व कु नेतल शर्मा यांनी भजने सादर करीत भजन प्रस्ताविका सादर केली.यावेळी व्यापार, उद्योग, सेवा, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक विश्वातील मान्यवरांनी आपली उपस्थिती दर्शवित या उत्सवास शुभेच्छा प्रदान केल्यात. उत्सवात बसण्याची उत्तम प्रकारची व्यवस्था यावेळी करण्यात आली होती. मध्यरात्री पर्यत चाललेल्या या भक्तीपूर्ण भजन संध्येत दूरवरून महिला, पुरुष भाविक उपस्थित होते.सर्वांचे यावेळी श्याम के दिवाने गृपच्या वतीने आभार मानण्यात आले.उत्सवाचे महाप्रसादाने करण्यात आले.उत्सव सफलतेसाठी श्याम के दिवाने गृपच्या सर्व सेवाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

## जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनची मासिक सभा आणि जागतिक महिला दिन ८ मार्चला

अकोटः जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन अकोलाची मासिक सभा आणि जागतिक महिला दिन कार्यक्रम शनिवार दिनांक ८ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ४ चार वाजता गुजराती समाज कॉन्व्हेंट स्कूल सभागृह बी. आर. हायस्कूलच्या मागे आयोजित करण्यात आली आहे. त्यामध्ये निवृत्तीवेतन धारकांच्या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा आणि जागतिक महिला दिनानिमित्त महिला सभासदांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या आणि ज्येष्ठ धन्वंतरी डॉ. आशाताई निकते या उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत तरी सर्व निवृत्तीवेतन धारकांनी संघटनेच्या महिला आणि पुरुष सभासदांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य डॉ सत्यनारायण बाहेती उपाध्यक्ष रामभाऊ बिरकड सचिव एकनाथराव उके व प्रसिद्धी प्रमुख मनोहर लऊळ यांनी केले आहे.

## परीक्षेसाठी अर्ज करण्याची मुदत वाढविली

**अकोला :** जी. डी. सी. अँड ए आणि सीएचएम परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत दि. ७ मार्चपर्यंत वाढविण्यात आली आहे. शासकीय सहकार व लेखा पदविका (जीडीसी अँड ए), तसेच सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र (सीएचएम) परीक्षा दि. २३, २४ व २५ मे रोजी होणार आहेत. परीक्षेसाठी संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज दि. ७ मार्च रोजी रा. ८ वाजेपर्यंत भरता येईल. बँकेत चलनाने भरणा करण्याची मुदत दि. १३ मार्च रोजी बँकेच्या कामकाजाच्या वेळेपर्यंत करण्यात आली आहे. अकोला येथील परीक्षा केंद्रावर अकोला, वाशिम, बुलडाणा हे तीन जिल्हे संलग्न आहेत.

## स्वयंसहायित शाळांना हरकती-सूचना नोंदविण्याचे आवाहन

अकोला : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा अधिनियमांतर्गत नविन शाळा व दर्जावाढीसाठी प्राप्त ९ प्रस्तावांपैकी ४ शाळांचे प्रस्ताव शिफारशीसह शासनाकडे सादर करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, ५ शाळांच्या प्रस्तावात त्रुटी आढळून आल्या आहेत. शिफारसप्राप्त शाळांबाबत हरकती व सूचना असल्यास १५ दिवसांच्या आत नोंदविण्याचे आवाहन माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. सुचिता पाटेकर यांनी केले आहे.बाळापूर तालुक्यातील उरळ येथील श्री शिवशंकर पब्लिक स्कूल, मूर्तिजापूर येथील मूर्तिजापूर पब्लिक स्कूल, पातूर तालुक्यातील खानापूर येथील महादेव व्ही. ढोकणे प्राथमिक इंग्रजी शाळा, बाळापूर तालुक्यातील निंबी येथील बाल शिवाजी कॉन्व्हेंट यांचे प्रस्ताव शिफारशीसह शासनाकडे पाठविण्यात येत आहेत.

**वि.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,अकोला.**

**प्रोसेस** ७१०/२०२५ **तारीख** ०३/०३/२०२५

M.C.A.No.81/2024 Fix for _ 11/03/2025

**गैरअर्जदार/गैरअपिलार्थी यांनी अपीलमध्ये चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठी जाहीर नोटीस**
**(वाचा आदेश ४१ नियम १४)**

बनामः
1) Shaikh Mustak Shaikh Rajjak
R/o Vyala, Tq Balapur, Dist.Akola
2) Eagle Infra India Ltd.,
Camp at Ridhora, Tq. Balapur, dist. Akola.
A company of N.H.A.I Through its concern Manage, A Government Undetaking.
3)State of Maharashtra,
Through Collector, Akola Tq and Dist Akola.

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी हया न्यायालयामध्ये APPEAL UNDER ORDER 43 RULE 1 (r) OF CIVIL PROCEDURE CODE दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे अपील दाखल केलेले आहे. सदर प्रकरणा मध्ये पुढील चौकशी तारीख ११ /०३ /२०२५ ठेवलेली आहे.
त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वतः, आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येतील. आज दिनांक ०३ माहे मार्च सन २०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

अकोला
दिनांक ०३/०३/२०२५

(शिक्का)

**अधिक्षक**
**न्यायीक विभाग,**
**न्यायालय,अकोला.**

# रुईखेड येथे श्री बागाजी महाराज यांच्या यात्रे निमित्त विविध कार्यक्रम संपन्न

## श्री बागाजी महाराज भंडारा उत्सव समितीच्या वतीने भव्य महाप्रसाद वाटप

**▪अकोला,दि.५ (प्रतिनिधी):**
महाशिवरात्रीच्या पवित्र दिवशी सकाळी भव्य कावड यात्रा काढण्यात आली. श्री कपलेश्वर मंदिरातून कावडने आणलेल्या पवित्र जलाने श्री बागाजी महाराजांचा सकाळी दहा वाजता मंदिर परिसरात संस्थान चे विश्वस्त विजय राहणे यांनी कावडदारी यांचे स्वागत व पूजा अर्चाना केले गावातु परिक्रमा काडुन कावड यात्रा फिरल्यानंतर श्रद्धाळू भाविकांनी आपल्या घरासमोर पूजा-अर्चना केली.रात्री श्री बागाजी महाराज यांना कपिलेश्वर येथून आणलेल्या पवित्र जलाने अभिषेक करण्यात आला

बुधवार रोजी श्री बागाजी महाराज यांच्या मंदिरात लहान मुलांना सकाळी लोटांगण घातले जाते व दुपारी गावातील



बागाजी महाराज भजन मंडळ चा गजरात मोठ्या मुलांचे लोटांगण घालत गावातुन काढले व रात्री श्री बागाजी महाराज यांचे पुरातन काळातील रथ यात्रा सुरू झाली महिलांनी आपल्या घरांसमोर रंगीबेरंगी रांगोळ्या अकाढून बागाजी महाराज यांच्या रथाचे स्वागत व पूजा अर्चाना केले. नवस फेडण्यासाठी नारळाचे तोरण बांधण्यात आले. यामुळे यात्रेला एक भक्तिमय व पवित्र स्वरूप प्राप्त झाले.यात्रेचा मुख्य आकर्षण म्हणजे गुरुवार दिनांक २८ रोजी श्री बागाजी महाराज भंडारा उत्सव समिती चा वतीने भव्य महाप्रसाद. संपूर्ण गावातील नागरिक एकत्र येऊन महाप्रसादाच्या आयोजनात सहभागी झाले. भक्तगणांनी महाप्रसादाचा लाभ घेतला आणि एकोपा व सामंजस्याचा संदेश दिला.यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी आकोट ग्रामीणचे पोलीस निरीक्षक किशोर गुनघरे मार्गदर्शनखाली पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता विशेष सहकार्य केले. शिस्तबद्ध वातावरणात यात्रा पार पडली आणि कोणत्याही अनुचित प्रकाराला वाव मिळू न देता भक्तांनी मनसोक्त श्रद्धा व्यक्त केली.रूईखेडची श्री बागाजी महाराज यांची ही केवळ एक उत्सव नसून, ही परंपरा गावातील लोकांच्या श्रद्धेचा व संस्कृतीचा अभिमान आहे. या यात्रेच्या निमित्ताने गावकऱ्यांमध्ये बंधुत्वाची भावना वृद्धिंगत होते आणि संपूर्ण वातावरण भक्तिमय होते.

महाशिवरात्रीच्या दिवशी पासून पवित्र दिवशी रूईखेड यात्रेचा हा भव्य सोहळा भविष्यातही याच भक्तिभावाने साजरा होईल, असा विश्वास भाविकांनी व्यक्त केला.श्री बागाजी महाराज भंडारा उत्सव समिती चा वतीने ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

# लोखंडी पोल व तुकडे एकूण ५ लाख ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल लंपास

**▪पातुर,दि.५ (प्रतिनिधी):**
पातुर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या अगिखेड व सोतनवण/खानापूर बाजूला असलेल्या रस्त्याच्या कडेला सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीच्या ठिकाणी विद्युत लाईन घेऊन जाणे करिता आगीखेड शिवारात सौर ऊर्जा प्रकल्पाच्या बाजूला असलेल्या जागेत रस्त्याच्या कडेला ठेवण्यात आलेल्या च-ड-क BEAM (HB १००११६) प्रत्येकी ११ मीटर लांबीचे एकूण ८६ लोखंडी पोल पैकी ३० लोखंडी पोल प्रत्येकी किंमत १५६६७ /- रुपये एकुण कि.४,७०,०१० व १८ लोखंडी पोल मधून प्रत्येकी अंदाजे ४-४ मीटरचे तुकडे असा एकूण किंमत ९० हजार रुपये चा असा एकूण ५,६०,०१० च. मुद्देमाल कोणीतरी आरोपीने चोरून नेला आहे तसेच १४ लोखंडी पोल एकूण किंमत २,१९,३३८ चे कटरचे सहाय्याने दोन भागांमध्ये कापून त्याचे नुकसान केल्याची घटना दी.१२ /२/२०२५ ते २३/२/२०२५ चे ११वा. दरम्यान घडली आली असून दी. ३/३/२०२५ लां याप्रकरणी अज्ञात आरोपी विरुद्ध फिर्यादी नरसिंग ठाकूर वय ३८ वर्ष व्यावसाय मॅनेजर (मेघा इंजीनियरिंग ) रा.मु. पो.कंधार ह.मु. विद्युत नगर कौलखेड अकोलायांची तक्रारीवरून


अप.न.६९/२६२५ कलम ३०३(२), ३२४(५) BNS प्रमाणे पातूर पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.हाकिकत अशाप्रकारे आहे की नमूद करता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे दिनांक १२ /२/२०२५ ते दिनांक २३/०२/२०२५ चे सकाळी ११ वाजेच्या दरम्यान (मेघा इंजीनियरिंग )कंपनीच्या मौ.जे. आगीखेड व सोतनवन /खानापूर येथील सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीच्या ठिकाणी विद्युत लाईन घेऊन जाणे करिता आगीखेड शिवरात सौर ऊर्जा प्रकल्पाच्या बाजूला असलेल्या जागेत रस्त्याच्या कडेला ठेवण्यात आलेल्या च-ड-क इएअच (HB १००११६) प्रत्येकी ११ मीटर लांबीचे एकूण ८६ लोखंडी पोल पैकी ३० लोखंडी पोल प्रत्येकी किंमत १५६६७ /- रुपये एकुण कि.४,७०,०१० व १८ लोखंडी पोल मधून प्रत्येकी अंदाजे ४-४ मीटरचे तुकडे असा एकूण किंमत ९० हजार रुपये चा असा एकूण ५,६०,०१० च. मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेला आहे.

तसेच १४ लोखंडी पोल एकूण किंमत २,१९,३३८ चे कटरचे सहाय्याने दोन भागांमध्ये कापून त्याचे नुकसान केले आहे.फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पातुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हनुमंत डोपेवाड यांचे मार्गदर्शनात पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल संबोधी इंगळे करीत आहेत.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम कोले फोन ९८८१४८१४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# निरामय

## पापणी का फडफडते?



अनेकदा आपली पापणी फडफडत असते. त्या वेळी अनेकजण घरगुती उपाय करतात. अनेकजण पापणी फडफडत असेल तर काही तरी शुभ किंवा अशुभ बातमी कळणार असे म्हटले जात असते.

डोळ्याची पापणी फडफडणे ही सर्वसाधारणपणे ही सामान्य क्रिया आहे. यात गंभीर आजार वगैरे काही नसते. काही वेळाने आपोआप पापणी फडफडणे बंद होते; परंतु जर ही समस्या खूपच वेळ येत असेल तर डॉक्टरांकडे जाऊन तपासणी करायलाच हवी. डोळ्यांची पापणी फडफडणे हे तणाव आणि चिंतेमुळेदेखील होऊ शकते. जेव्हा आपण मानसिकदृष्ट्या खूपच थकलेलो असतो. आत्यंतिक तणावाचा सामना करीत असतो, तेव्हा आपल्या शरीरावर काही प्रतिक्रीया होतात. ज्यात डोळ्यांची पापणी फडफडणेदेखील सामील आहे. स्नायूंच्या अनियमित आकुंचन पावण्यानेदेखील हे होते. जेव्हा अपुरी झोप होते, तेव्हादेखील असा प्रकार होतो. जेव्हा नीट झोपत नाही, स्नायू काम करीत नाहीत, तेव्हा डोळ्यांची पापणी फडफडू लागते.

काही वेळा डोळ्यांची फडफडणे जास्त कॅफीन सेवन केल्यानेदेखील होते. जादा कॅफीन घेतल्याने नर्व्हस सिस्टीम स्टिम्युलेट करू शकते. त्यामुळे पापण्या फडफडू शकतात. डोळ्यांतील ड्रायनेसदेखील डोळ्यांच्या पापण्या फडफडण्यासाठी जबाबदार असते. आपल्या डोळ्यातील पाणी कमी होते, तेव्हा स्नायू आंकुचन होऊ लागतात. त्यानेदेखील पापण्या फडफडू लागतात. खूप तास संगणक पाहिला, तर असे होऊ शकते. त्यामुळे अशा स्थितीत 'आर्टीफिशियल टीयर ड्रॉप'चा वापर करण्याची वेळ येऊ शकते. शरीरात जर पोषक तत्वाची कमरता असेल तरी हे घडू शकते. मॅग्नेशियम, पॉटेशियम आणि व्हिटामिन्स बी-१२ च्या कमतरतेने पेशींचे कार्य प्रभावित होऊ शकते आणि डोळ्याची पापणी फडफडू शकते.

जर लागोपाठ पापणी फडफडू लागली तर ती दुखू शकते, सूज येऊ शकते. त्या वेळी ही समस्या मज्जापेशींशी निगडीत असू शकते. अशा वेळी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

## दिवस चांगला जाण्यासाठी 'हे' कराच..



आपल्यापैकी बऱ्याचजणांची सकाळ अंथरुणातून उठण्यापूर्वीच निघून जाते. लोक अलार्म लावून झोपतात; पण वेळेवर उठू शकत नाहीत. ही सवय यशाच्या मार्गात अडथळा ठरू शकते. कारण दिवसाचे पहिले काही तास आपण दिवसभर किती फलदायी आणि आनंदी राहू हे ठरवतात. आता तर विज्ञानानेही हे सिद्ध केले आहे की सकाळची सुरुवात चांगली झाली तर संपूर्ण दिवस चांगला जातो. अशा वेळी आपली सवय बदलण्याची गरज आहे.

सकाळी दहा वाजण्याच्या आधी फक्त दहा गोष्टी केल्या तर आपण नक्कीच अधिक निरोगी आणि आनंदी राहू. यासोबतच यशाचा मार्ग सुकर होईल. रोजच्या आयुष्यातील काही सवयी बदलून आपणही यशाकडे वाटचाल करू शकतो. यासाठी फार काही करण्याची गरज नाही, फक्त आपली सकाळ सकारात्मक करायची आहे. आचार्य चाणक्य म्हणतात, सकाळी लवकर उठणे ही यशाची पहिली पायरी आहे. सकाळी लवकर उठल्याने दिवसाचे काम वेळेवर पूर्ण होण्यास मदत होते आणि आत्मविश्वास वाढतो. हे जग जागे होण्याआधी तुम्हाला काही वेळ शांत घालवण्यास अनुमती देते. ध्येये ठरवण्यासाठी आणि दिवसाची योजना करण्यासाठी या वेळेचा वापर करता येतो. सकाळी उठण्यासाठी झोपेचा त्याग करण्याची गरज नाही. यासाठी झोपण्याच्या वेळेचे व्यवस्थापन करावे लागेल. वेळेवर झोपून वेळेवर उठणे त्या दृष्टीने महत्वाचे आहे.

सकाळी उठल्यानंतर करावयाची पहिली गोष्ट म्हणजे पलंग नीटनेटका करणे. खोली स्वतः स्वच्छ करावी आणि घरातील वस्तू व्यवस्थित ठेवाव्यात. स्वच्छ वातावरणात राहिल्याने तणाव कमी होतो. त्याचा आपल्या मनावर आणि आरोग्यावरही सकारात्मक परिणाम होतो. रात्रीच्या झोपेनंतर शरीराला हायड्रेशन आणि पोषण आवश्यक असते, म्हणून चयापचय सुधारण्यासाठी आणि शरीर रीहायड्रेट करण्यासाठी एक ग्लास कोमट पाणी पिऊन दिवसाची सुरुवात करावी. त्यामुळे अनेक आजारांचा धोका कमी होतो.

अनेकजण डोळे उघडताच हातात मोबाईल धरतात आणि काही वेळ त्यात मग्न राहतात. हे अजिबात करू नये. दिवसाची सुरुवात शांततेने झाली पाहिजे. फार महत्वाचे नसेल तर सकाळी दहा वाजेपर्यंत फोन तपासू नये. हा वेळ स्वतःला समर्पित करावा. हे आपल्याला आपल्यासाठी खरोखर महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्यास अनुमती देईल. सकाळी थोडी काळजी घेतल्याने आत्मविश्वास वाढतो. येणाऱ्या दिवसासाठी तो आपल्याला मानसिकदृष्ट्या तयार करतो. लक्षपूर्वक ध्यान केल्याने मन शांत होऊन लक्ष केंद्रित करण्यास मदत होते. यासाठी शांत ठिकाणी बसून श्वासोच्छवासावर लक्ष केंद्रित करावे. हा सराव कालांतराने कोणत्याही कामावर लक्ष केंद्रित करण्याची क्षमता वाढवू शकतो. दीर्घकाळात त्याचा शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम दिसून येतो.

ऊर्जा पातळी वाढवण्यात सकाळची शारीरिक क्रिया महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे रोज सकाळी किमान तीस मिनिटे व्यायाम करावा. यामुळे फक्त तंदुरुस्त राहणार नाही, तर दिवसभर उत्साही आणि ताजपणा अनुभवाल. सकाळच्या पहिल्या आहारात साखर आणि कर्बोदके खाऊ नयेत. यामुळे शरीरातील रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. थकवा, अशक्तपणा आणि वजन वाढण्यासह अनेक समस्यांमागील हे नेमके कारण आहे. मधुमेही रुग्णांनी याची विशेष काळजी घ्यावी. व्यायामानंतर, सकाळी प्रथिने आणि फायबरयुक्त पौष्टिक नाश्ता करावा. यामुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि दिवसभर सक्रिय राहण्यास मदत होते. सकाळी निरोगी न्याहरी केल्याने मूड चांगला राहतो आणि काम करण्यास मदत होते. सकाळच्या नाश्त्यामध्ये हरभरा, मूग यासारखे अंकुरलेले धान्य आणि कोणत्याही हंगामी फळांचा समावेश करावा.

सकाळी काही मिनिटे काढून रोजच्या कामांची यादी तयार करा. या यादीतील महत्त्वाच्या कामांना प्राधान्य दिल्यामुळे उत्पादकता टिकवून ठेवण्यास मदत होते.

## लठ्ठपणामुळे दरवर्षी २८ लाख लोकांचा मृत्यू

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, लठ्ठपणा ही महामारी बनली आहे. लठ्ठपणामुळे होणाऱ्या जीवघेण्या आजारांमुळे दरवर्षी २८ लाख प्रौढांचा मृत्यू होत आहे.

आता लठ्ठपणा ओळखण्याची पद्धत पूर्वीपेक्षा अधिक शास्त्रीय करण्यावर भर दिला जात आहे. भारतातील डॉक्टर गेल्या १५ वर्षांपासून लठ्ठपणा शोधण्यासाठी बॉडी मास इंडेक्स (बीएमआय) टूल वापरत आहेत. यामध्ये लोकांची उंची आणि वजन यांचे प्रमाण वापरून कोणी लठ्ठ आहे की नाही हे ठरवले जाते; मात्र आता याबाबत नवीन मार्गदर्शक तत्त्वे आली आहेत. आता लठ्ठपणा शोधण्यासाठी 'बीएमआय'चा वापर केवळ सपोर्ट मॉनिटरिंग टूल म्हणून केला जाईल. 'लॅन्सेट डायबिटीज अँड एंडोक्राइनोलॉजी कमिशन'मध्ये जगभरातील ५८ तज्ज्ञ डॉक्टरांनी लठ्ठपणाची नवी व्याख्या दिली आहे. संशोधनात असे दिसून आले आहे, की लठ्ठपणा अधिक शास्त्रोक्त पद्धतीने समजून घेतल्यास, कोणत्या प्रकारचा लठ्ठपणा कोणत्या रोगांसाठी धोका बनू शकतो हे ओळखण्यास मदत होईल. त्या दिशेने काम करून आपण त्या सर्व आजारांचा धोका टाळू शकतो. 'बीएमआय'चा सर्वात मोठा दोष म्हणजे ते चरबी आणि स्नायूंमध्ये फरक करत नाही. 'बीएमआय'च्या कमतरतांबाबत डॉक्टरांनी अनेकदा प्रश्न उपस्थित केले आहेत. ओटीपोटात जमा झालेली चरबी, कंबरेभोवती जमा झालेली चरबी किंवा यकृत आणि हृदयात जमा झालेली चरबी हात आणि पाय यांच्या चरबीपेक्षा जास्त धोकादायक असते. यामुळे हात, पाय किंवा त्वचेखाली जमा झालेल्या चरबीपेक्षा जास्त आरोग्य समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे अनेक जुनाट आजारांचा धोका संभवतो.

भविष्यात हा मोठा धोका होऊ शकतो. त्यामुळे नवीन मार्गदर्शक तत्त्वांमध्ये उपचाराची दोन टप्प्यांत विभागणी करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. 'क्लिनिकल लठ्ठपणा' हा एक जुनाट आजार आहे. त्यामुळे शरीरात जमा झालेल्या अतिरिक्त चरबीमुळे अवयवांचे कार्य प्रभावित होऊ लागते. दैनंदिन कामात अडचणी येतात. ते ओळखण्यासाठी संशोधकांनी लहान मुले आणि प्रौढांसाठी वेगवेगळे निकष तयार केले आहेत. यामुळे सांधेदुखी, श्वास घेण्यात अडचण, हृदय अपयश आणि अवयव निकामी होणे यांसारखी लक्षणे दिसतात.



'प्रीक्लिनिकल लठ्ठपणा'चा अर्थ असा आहे, की या रोगामुळे अद्याप कोणतीही आरोग्य समस्या उद्भवलेली नाही; मात्र त्यामुळे टाईप-२ मधुमेह, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधीचे आजार आणि काही कर्करोग यांसारख्या गंभीर आजारांचा धोका वाढत आहे. याशिवाय शरीरात अतिरिक्त चरबी दिसून येते. त्यात काही सुधारणा केल्या, तर आरोग्याच्या गंभीर परिस्थितीचा धोका टळू शकतो, याला खूप वाव आहे.

## यकृताचे आरोग्य बिघडण्यात वाढ

डॉ. संदीप काळोखे

लिवर म्हणजेच यकृत हा आपल्या शरीरातील एक महत्त्वाचा भाग मानला जातो. शरीरातील अनेक महत्त्वाची कार्ये करण्यासाठी लिवर जबाबदार असते. हे शरीरातील टाकाऊ पदार्थ फिल्टर करून काढून टाकण्याचे काम करते. ते अन्न पचवणाऱ्या पित्त प्रोटीनच्या निर्मितीमध्ये आणि लाल रक्तपेशींच्या निर्मितीमध्ये मदत करते. अशा परिस्थितीत शरीर निरोगी ठेवण्यासाठी यकृत निरोगी ठेवणे खूप गरजेचे आहे.



आजकाल वाईट खाण्याच्या सवयी आणि वाईट जीवनशैलीमुळे यकृताचे आरोग्य खूप बिघडते. आजकाल लोकांमध्ये लिवरशी संबंधित आजार झपाट्याने वाढतायत. त्या वेळी यकृत खराब होते, तेव्हा शरीरात काही लक्षणे दिसून येतात. काही लक्षणे अशीदेखील आहेत, जी बहुतेकदा रात्री दिसून येतात. ही लक्षणे वेळीच ओळखली गेली, तर यकृत खराब होण्यापासून वाचवता येते.

### लक्षणे

■ **सतत झोपमोड होणे**

जर तुम्हाला रात्री झोपायला त्रास होत असेल किंवा वारंवार जागे होत असेल, तर हे यकृताच्या नुकसानाचे लक्षण असू शकते. यकृताच्या समस्यांमुळे, शरीरात टॉक्सिन पदार्थांचे प्रमाण वाढते. जे मेंदू आणि मज्जासंस्थेवर परिणाम करू शकते. यामुळे झोपेशी संबंधित समस्या उद्भवू लागतात.

■ **पायाला सूज येणे**

यकृताच्या नुकसानीमुळे पाय आणि घोट्यांमध्ये सूज येण्याची शक्यता वाढते. या वेळी तुम्हाला या भागात वेदना होण्याची दाट शक्यता असते. रात्रीच्या वेळी, ही सूज खूप वाढू शकते. जर तुम्हाला हे लक्षण दिसले तर वेळीच डॉक्टरांची मदत घ्या.

■ **शरीराला खाज येणे**

जर तुम्हाला रात्रीच्या वेळी तुमच्या त्वचेवर जास्त खाज येत असेल, तर ते लिवरच्या नुकसानीचे लक्षण असू शकते. खरेतर जेव्हा यकृत योग्यरित्या काम करू शकत नाही, तेव्हा शरीरात पित्ताचे प्रमाण वाढते. यामुळे त्वचेवर खूप खाज येण्याची समस्या उद्भवते.

■ **रात्री उल्टी होणे**

जर तुम्हाला रात्री मळमळ आणि उलट्या सारखी लक्षणे जाणवली तर ते यकृताच्या नुकसानीचे लक्षण असू शकते. अशावेळी वेळीच डॉक्टरांची मदत घ्या.

■ **लघवीचा रंग बदलणे**

लघवीच्या रंगात बदल होणे हेदेखील यकृताच्या समस्येचे लक्षण आहे. ज्या वेळी यकृत योग्यरित्या कार्य करत नाही, तेव्हा शरीरात बिलीरुबिनची पातळी वाढते. ज्यामुळे लघवीचा रंग गडद पिवळा होऊ शकतो. लघवीतून फेस येणे किंवा लघवीतून दुर्गंधी येणेहे देखील यकृताच्या समस्येचे लक्षण आहे.

## चेरी खा, स्वस्थ राहा

चेरी हे फळ दिसायला छोटं असलं तरी त्यात अनेक पोषणमूल्यं दडली आहेत. छोटीशी चेरी अनेक विकारांना आळा घालण्यास समर्थ असते. वजन कमी करण्यासाठी आहारात चेरीचा समावेश करता येईल. पोटावरची चरबी कमी करण्यासाठी चेरी उपयुक्त ठरू शकते. चेरीतल्या अँटीऑक्सिडंट्समुळे कॅन्सरलाही प्रतिबंध होऊ शकतो. चेरीतल्या काही घटकांमुळे मज्जासंस्थेला आराम मिळतो. चेरी खाल्ल्याने शांत झोप लागू शकते. हृदयविकारावरही चेरी उपयुक्त ठरू शकते. या फळात पोटॅशियम खूप जास्त प्रमाणात असल्यामुळे हृदयगती सुरळीत होण्याबरोबरच रक्तातल्या कोलेस्टरॉलचं प्रमाणही कमी होतं. चेरीमुळे रक्ताल्या साखरेचं प्रमाणही नियंत्रणात राहू शकतं. चेरीमुळे रक्ताचं शुद्धिकरण होतं. या फळात 'अ' आणि 'क' जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात असतं. त्वचा आणि डोळ्यांच्या आरोग्यासाठीही चेरीचं सेवन करायला हवं.



## कर्करोगाचे निदान रक्तचाचणीने

कर्करोगाचं निदान वेळेत होणं गरजेचं असतं. हा विकार प्राथमिक अवस्थेत लक्षात आला तर रुग्णाचा जीव वाचू शकतो. येत्या काळात अत्यंत कमी खर्चिक अशा रक्तचाचणीद्वारे कर्करोगाचं वेळेत निदान करता येणार आहे. पुण्यातल्या एका शास्त्रज्ञाने ही चाचणी शोधून काढली आहे.



या चाचणीमुळे डॉक्टरांना कर्करोगावरच्या उपचारांची दिशा ठरवणं सोपं होणार आहे. ही रक्तचाचणी ऑन्को डिस्कव्हर नावाच्या लिक्विड बायोप्सी तंत्रज्ञानावर आधारित आहे. याद्वारे रुग्णाच्या रक्तातली कर्करोगग्रस्त पेशी खूप लवकर शोधता येईल. यामुळे कर्करोगाचा शरीरातला प्रसार रोखणं शक्य होईल. ही चाचणी तुलनेने खूप स्वस्त असल्यामुळे सर्व स्तरातल्या रुग्णांना लाभ घेता येईल. या चाचणीची अमेरिकन पद्धत खूपच खर्चिक आहे. आज ही चाचणी भारतात उपलब्ध नाही. पण उपलब्ध होताच ती रुग्णांसाठी वरदान ठरू शकेल.

## ओळखा स्पोर्टस बारचे धोके

नियमित व्यायाम करणारे, अ‍ॅथलिट्स स्पोर्टस ड्रिंक्स, एनर्जी बारचं सेवन करतात. मात्र यामुळे त्यांच्या दातांचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं, असं एका संशोधनातून समोर आलं आहे.



लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमधल्या शास्त्रज्ञांनी हे संशोधन केलं. यासाठी ३५२ व्यावसायिक अ‍ॅथलिट्सचा अभ्यास करण्यात आला. यापैकी ९४ टक्के अ‍ॅथलिट्स दिवसातून दोनदा दात घासायचे तर ४४ टक्के नियमित फ्लॉसिंग करायचे. या अ‍ॅथलिट्सच्या अहवालाची तुलना दोन वेळा दात घासणाऱ्या आणि फ्लॉसिंग करणाऱ्या सर्वसामान्य लोकांशी करण्यात आली. यातून काही निष्कर्ष काढण्यात आले. त्यानुसार एनर्जी बार, स्पोर्टस ड्रिंकमधल्या अतिसाखरेमुळे अ‍ॅथलिट्सना दातदुखी तसंच इतर समस्यांना सामोरं जावं लागतं असं आढळलं.

## शाकाहारीत बी १२ जीवनसत्त्वांची कमतरता



डॉ. प्रसन्न नेने

मुंबईः आजकाल अनेकजण मांसाहार सोडून शाकाहारकडे वळले आहेत. मांसाहार केल्याने अनेक आजारांचा सामना करावा लागतो, असा अनेकांचा समज असल्याने मांसाहार करणाऱ्यांनी चक्क शाकाहार स्वीकारला आहे. शाकाहारी लोक मांस खात नाहीत, म्हणून त्यांच्यामध्ये वबी १२ १२ जीवनसत्वाची कमतरता असण्याची शक्यता आहे.

व्हिटॅमिन बी -१२ शरीरासाठी अत्यंत आवश्यक

व्हिटॅमिन बी -१२ हे एक महत्त्वाचे पोषक तत्व आहे, जे शरीराच्या पेशी आणि रक्ताशी संबंधित कार्यांसाठी आवश्यक आहे. व्हिटॅमिन बी-१२ हे इतर जीवनसत्त्वांच्या तुलनेत सर्वात आवश्यक आणि आवश्यक मानले जाते. त्याच्या कमतरतेचा अर्थ शरीरातील सर्वात महत्वाच्या सूक्ष्म पोषक घटकांची घट. या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे अनेक गंभीर आजार होऊ शकतात. हे जीवनसत्व प्रामुख्याने मांस, मासे, अंडी आणि दुग्धजन्य पदार्थ यांसारख्या प्राण्यांवर आधारित खाद्यपदार्थांमध्ये आढळते. त्यामुळे शाकाहारी लोकांना कधीकधी त्याची कमतरता भासते.

शाकाहार आणि बी-१२ ची कमतरता

शाकाहारी आहारात व्हिटॅमिन बी-१२ ची कमतरता असू शकते. कारण हे जीवनसत्व वनस्पती-आधारित पदार्थांमध्ये कमी असते. हे जीवनसत्व काही शाकाहारी पदार्थ जसे की संपूर्ण धान्य, सोया दूध आणि हिरव्या पालेभाज्यांमध्येदेखील आढळते, तरीही शाकाहारी लोकांना त्याची कमतरता जाणवू शकते. जे लोक शाकाहारी असतात, त्यांना सर्वात जास्त अशक्तपणा आणि थकवा येतो. शरीरात व्हिटॅमिन बी-१२ च्या कमतरतेमुळे ॲनिमिया म्हणजेच रक्ताशी संबंधित इतर आजारही होतात. व्हिटॅमिन बी-१२ च्या कमतरतेवर केलेल्या अभ्यासात असे दिसून आले आहे, की शाकाहारी लोकांना या जीवनसत्वाच्या कमतरतेचा त्रास होत आहे. व्हिटॅमिन बी-१२ चे सर्वोत्तम स्त्रोत प्राणी-आधारित अन्न मानले जातात. हे बहुतेक भारतीय लोकांमध्ये घडते.

**व्हिटॅमिन बी -१२ च्या कमतरतेची लक्षणे**

- नेहमी थकवा जाणवतो
- केस गळणे
- त्वचेचा पिवळसरपणा
- डोळ्यांचा पांढरा भाग पिवळसर होणे
- भूक न लागणे

## लक्षणं पक्षाघाताची

व्याधी-विचार

पक्षाघात हा अत्यंत गंभीर असा आजार आहे. मेंदूला होणारा कमी रक्तपुरवठा पक्षाघाताला कारणीभूत ठरतो. रक्तपुरवठा थांबल्यामुळे मेंदूतल्या पेशी मृतवत होतात. यामुळे मेंदूचं खूप नुकसान झाल्याने रुग्णाचा मृत्यू होऊ शकतो. पक्षाघाताचा झटका आल्यानंतर रुग्णावर तातडीने उपचार करावे लागतात. पक्षाघातावर योग्य उपचार होण्यासाठी त्याची लक्षणं जाणून घेणं गरजेचं असतं. लक्षणांची जाण असेल तर त्वरित उपचार मिळवणं बऱ्याच अंशी सोपं होतं. फक्त प्रौढांनाच नाही तर तरुणांमध्येही पक्षाघाताची समस्या वाढते आहे. ही बाब निश्चितच खूप गंभीर आहे. स्थूलपणा, वाढलेलं, कोलेस्टरॉल, मद्यपान, अमली पदार्थांचं व्यसन यामुळे तरुणांमध्ये पक्षाघाताचा धोका वाढतो आहे. पक्षाघाताच धोका टाळण्यासाठी निरोगी जीवनशैलीचा अवलंब करणं गरजेचं आहे. तसंच या व्याधीच्या लक्षणांबाबत जाणून घ्यायला हवं.



पक्षाघाताचा झटका अचानक येतो. मात्र याची काही लक्षणं दिसून येतात. या चाचणीला फास्ट चाचणी म्हटलं जातं. या चाचणीत रुग्णाच्या हास्याकडे बघितलं जातं. एका बाजूला झुकलेलं किंवा वेडंवाकडं हास्य पक्षाघाताचं लक्षण असू शकतं. रुग्णाच्या हातांची तपासणी केली जाते. यात दोन्ही हात वर उचलायला सांगितले जातात. एक हात अचानक खाली येणं हे स्ट्रोकचं लक्षण ठरतं. लुळेपणामुळे हात पटकन खाली येतो. बोलताना त्रास होणं, असंबद्ध बोलणं हे लक्षणही पक्षाघाताकडे अंगुलीनिर्देश करतं. त्यामुळे रुग्णाला एखादं वाक्य बोलायला सांगणं आणि ते पुन्हा वदवून घ्याला हवं. पक्षाघाताच्या उपचारांमध्य वेळेला खूप महत्त्व असतं. रुग्णावर तातडीने उपचार व्हावे लागतात. त्यामुळे वरील लक्षणं दिसली तर तातडीने डॉक्टरांकडे धाव घ्यायला हवी.

वर नमूद केलेल्या लक्षणांव्यतिरिक्त पक्षाघाताची इतर लक्षणंही दिसून येतात. यात तोल जाणं, चालताना त्रास होणं, चेहऱ्याची एक बाजू, हात किंवा पाय लुळे पडणं, अस्वस्थ वाटणं, भोवळ येणं, श्वास घ्यायला त्रास होणं, उलटी, मळमळ, अचानक तीव्र स्वरुपाची डोकेदुखी जाणवणं यांचा समावेश आहे.

पक्षाघाताचे दुष्परिणाम टाळण्यासाठी एकाही लक्षणाकडे तुम्हाला दुर्लक्ष करता येणार नाही. ही लक्षणं दिसली की कोणतीही हयगय करता कामा नये. रुग्णवाहिका बोलावून रुग्णाला रुग्णालयात दाखल करायला हवं.

## का जाणवतो थकवा?



आपण कुठे चुकतो

अनेकांना सतत दमल्यासारखं, थकल्यासारखं वाटतं. सततच्या थकव्यामुळे तुमच्या उत्पादकतेवर परिणाम होतो. ऊर्जा, उत्साह कमी होण्यामागे काही कारणं असतात. आपल्या काही चुकांमुळे थकल्यासारखं वाटतं. या चुका टाळल्या तर तुम्ही उत्साही आयुष्य जगू शकता.

अपुरी झोप हे थकव्याचं महत्त्वाचं कारण असतं. एखाद्या रात्री शांत झोप झाली नाही तर दुसऱ्या दिवशी मरगळल्यासारखं वाटतं, डोकं जड होतं. अपुरी झोप त्रासदायक ठरू शकते.

सध्या विविध प्रकारची डाएट्स केली जातात. यामुळे कॅलरींचं प्रमाण कमी होऊन तुम्हाला थकवा येऊ शकतो. तुमच्या दैनंदिन गरजेनुसार योग्य तो आहार घेणं गरजेचं आहे. पोषक आणि सकस आहारामुळे तुम्ही ताजेतवाने राहू शकता. प्रथिनांमुळे चयापचय क्रिया सुधारते आणि शरीराला आवश्यक ती ऊर्जा मिळते. प्रथिनांचं योग्य प्रमाणात सेवन केलं तर वजन कमी व्हायला मदत होते. प्रथिनांच्या कमतरेमुळे थकवा जाणवू शकतो. त्यामुळे थकल्यासारखं वाटत असेल तर आहारात प्रथिनांचं प्रमाण वाढवता येईल.

# मानवी आरोग्याला कबुतरांपासून धोका

## ६० प्रकारचे आजार होण्याची शक्यता



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :** महानगरांमध्ये कबुतरांच्या वाढत्या संख्येमुळे मानवी आरोग्यासाठी गंभीर धोका निर्माण झाला आहे. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी आणि जेएसडब्ल्यूने याबाबत जनजागृतीसाठी एक लघुपट तयार केला आहे.

फुफ्फुसरोग तज्ज्ञ डॉ. संदीप मेस्त्री यांच्या मते, कबुतरांपासून मानवांना ६० वेगवेगळे आजार होऊ शकतात. यामध्ये क्रिप्टोकोकोसिस, हिस्टोप्लाज्मोसिस, सिटाकोसिस, राइनायटिस यांसारखे आजार प्रमुख आहेत. त्याचबरोबर त्वचेची ॲलर्जी, डोळे लाल होणे, सायनसायटिस आणि श्वसनमार्गाचे विविध आजार होण्याची शक्यता असते.

पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रोहिणी बावस्कर यांनी सांगितले की, कबुतरांच्या विष्ठेत अस्परजिलस आणि क्रायटोकॉकस प्रकारची बुरशी आढळते. कोरडी विष्ठा हवेत मिसळून श्वासाद्वारे शरीरात जाते. यामुळे फुफ्फुसांचे गंभीर आजार होऊ शकतात. महानगरांमधील उंच इमारती आणि कबुतरखान्यांमध्ये कबुतरांची संख्या सहज उपलब्ध होणाऱ्या अन्नामुळे वाढत आहे. तज्ज्ञांच्या मते, दयेपोटी कबुतरांना खाऊ घालणे थांबवणे आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

# संतोष देशमुखांच्या हत्येचे नागपुरात पडसाद

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ५ :** बीडचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली होती. या हत्याकांडात वाल्मिक कराडसह इतरही अनेक आरोपींचे नाव समोर येत आहे. विरोधी पक्षांकडूनही या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार) नेते धनंजय मुंडे यांचेही नाव पुढे आणले जात आहे. या घटनेचे पडसात आता नागपुरातही उमटले आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षातर्फे नागपुरात आंदोलन केले गेले.

मध्य नागपुरातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ चितारओळ, नागपूर येथे हे आंदोलन केले गेले. याप्रसंगी या प्रकरणातील आरोपी क्रूरकर्मा कराड आणि त्यांच्या साथीदारांसह जेही या प्रकरणात सहभागी असतील सगळ्यांना



फाशीची शिक्षा देण्याची मागणीही आंदोलकांकडून करण्यात आली. शिवसेनाचे जिल्हाप्रमुख सुरज गोजे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनानिमित्त आरोपी वाल्मिक कराड याच्या प्रतिकात्मक पुतळ्याला फासावर लटकविण्यात आले.

दरम्यान आंदोलकांनी याप्रसंगी संतोष देशमुख सारख्या हत्येचे अमानवीय कृत्य करणाऱ्या सर्व नराधमांना कठोर शिक्षा व्हायलाच हवी, अशी मागणीही यावेळी केली.

गोजे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी महाराष्ट्रात अश्या प्रकारच्या अमानवीय व निंदनीय अपराध करणाऱ्या आरोपीच्या प्रवृत्तीला ठेचून काढण्याची गरज आहे. कठोर शिक्षा झाल्यास पुढे कोणीही या पद्धतीचे कृत्य करण्यासाठी दहावेळा विचार करतील. या प्रकरणातील सगळ्या आरोपीला फाशीची शिक्षा द्या, अशी मागणीही आंदोलकांकडून याप्रसंगी केली गेली.

आंदोलनात गुलामभाई पोठीयावाला, अमित कातुरे, ओमकार पारवे, गणेश डोईफोडे, धीरज फंदी, समीर शिंदे,नीलेश तिघरे,मनिषा पापडकर, अनिता जाधव, मीना जालेकर आणि इतरही शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आंदोलनासाठी सागर मौंदिकर,धीरज काटे, राजा रामदवार, सलमान खान, सचिन यादव, मनोज गुप्ता, देवेन माहूरकर, अल्पेश शिवनकर, बाल्या मगरे, अजय दहरवाल, राहुल पांडे आणि इतरही कार्यकर्ते उपस्थित होते. कडक कारवाई न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही आंदोलकांकडून दिला गेला.

## देशमुखांच्या हत्येची क्रूरता माहीत नव्हती : नामदेव शास्त्रींना उपरती

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. ५ :** धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर नामदेव शास्त्री यांची पहिली प्रतिक्रिया दिली आहे. मला आधी संतोष देशमुखांच्या हत्येची क्रुरता माहित नव्हती. त्यामुळे पहिल्या दिवशी जे बोललो ते अजाणतेपणातून बोललो होतो, असे ते म्हणाले.

पण दुसऱ्या दिवशी जेव्हा धनंजय देशमुख परिवार गडावर आले, तेव्हा त्यांनी जाण करून दिली. तेव्हा या क्रूरतेची जाणीव झाली. तेव्हा माझेही अंतःकरण दुखावले. आरोपींना लवकरात लवकर शिक्षा मिळावी अशी माझी मागणी असल्याचे भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी केली.

संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांच्या मानसिकतेचा विचार व्हायरला हवा, ज्या लोकांनी हत्या केली त्यांची मानसिकता का बिघडली? याचे कारण शोधायला हवे, असे विधान नामदेव शास्त्री यांनी केले होते. मारेकऱ्यांच्या क्रूरतेचे फोटो सोमवारी व्हायरल झाले होते. मंगळवारी धनंजय मुंडेंचा राजीनामा झाला. यादरम्यान नामदेव शास्त्रींवर सोशल मीडियातून टीका केली जात होती. त्यानंतर नामदेव शास्त्री यांनी आपल्या त्या विधानावरून यू टर्न घेत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. माझे पहिल्या दिवसाचे वक्तव्य अजाणतेपणाचे होते, असे शास्त्री म्हणाले.

# शिफारशीने मिळालेला आयोग केवळ कार्पोरेट पार्ट्यापुरता...

## चित्रा वाघ आणि चाकणकरांवर सुषमा अंधारेंची टीका



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :** भाजपचे आमदार आणि मंत्री जयकुमार गोरे यांनी एका महिलेला स्वतःचे विवस्त्र फोटो पाठवल्याचा आरोप ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला होता. या आरोपांवरून राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली. यानंतर विरोधकांकडून सरकारवर टीका करण्यात येत आहे.

ठाकरे गटाच्या सुषमा अंधारे यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर आणि भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्यावर नाव न घेता जोरदार हल्ला चढवला आहे. शिफारशीने मिळालेला आयोग कॉर्पोरेट पार्ट्यापुरता राहिला आहे, अशा शब्दांत सुषमा अंधारे यांनी निशाणा साधला.

जयकुमार गोरे यांच्यावर होत असलेल्या आरोपानंतर सुषमा अंधारे यांनी नाव न घेता संदर्भ देत रुपाली चाकणकर आणि चित्रा वाघ यांच्यावर टीका केली. याबाबत त्यांनी ट्विट केले आहे. विषय भाजपच्या किरीटचा असो किंवा जयकुमार गोरेंचा. शिफारशीने मिळालेला आयोग कॉर्पोरेट पार्ट्यापुरता आहे, अशा शब्दांत नाव न घेता सुषमा अंधारे यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यावर निशाणा साधला. तसेच, एरवी चित्रविचित्र आवाज काढत आक्रस्ताळेपणा करणाऱ्या छोट्या भुरट्या ताई सुद्धा गोरेबद्दल चकार शब्द काढत नाही, असे म्हणत चित्रा वाघ यांच्यावरही बोचरी टीका केली.

हे सगळे नग म्हणजे 'एका माळेचे मणी अन् ओवायला नाही कुणी' असा प्रकार आहे, अशा शब्दांत सुषमा अंधारे यांनी महायुतीमधील या दोन महिला नेत्यांवर संताप व्यक्त केला आहे.

अबू आझमींच्या औरंगजेबावरील वक्तव्यावरून मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या गोंधळावर भाष्य करत आपल्याला डायव्हर्ट व्हायचे नाही, असेही सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यामुळे सरकार पूर्णतः बॅक फुटवर गेले आहे. लक्षात ठेवा ते अबू आजमी औरंगजेब म्हणत आपल्याला डायव्हर्ट करायचा प्रयत्न करतील. आपण गोरे-मुंडे-कोकाटे हे विषय लावून धरायचे आहेत, असे आवाहन अंधारे यांनी केले.

# दोन कुटुंबातील वादात चाकूने हल्ला : पित्याचा मृत्यू, मुलगा गंभीर

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ५ :** चौघा जणांनी केलेली अमानुष मारहाण आणि धारधार चाकूने सपासप वार केल्याने पित्याचा मृत्यू झाला तर पुत्र गंभीर जखमी झाला. गंभीर जखमी असलेल्या मुलावर अकोला येथे उपचार करण्यात येत आहे. खामगाव तालुक्यातील शेलोडी येथे हा रक्त रंजित थरार रंगला असून दोन कुटुंबातील जुना वाद नव्याने उफाळून आल्याने हे हत्याकांड घडले.

रघुनाथ गाडे असे मृत व्यक्तीचे नाव असून असून त्यांचा मुलगा गोपाल गाडे गंभीर जखमी असून त्याला उपचारसाठी अकोला येथे हलविण्यात आले आहे. त्याची प्रकृती अत्यवस्थ असल्याचे सांगण्यात आले.

शेलोडी येथील रघुनाथ गाडे आणि पवन दशरथ बानाईत यांच्या कुटुंबात गेल्या काही दिवसांपासून जुना वाद सुरू आहे . या वादातून पवन बानाईत याने रघुनाथ गाडे यांना एखाद्या दिवशी जीवाने मारण्याची धमकी दिली होती.

गाडे व बाणाईत परिवारातील हा वाद शमण्याऐवजी आणखी उफळला. दरम्यान, घटना प्रसंगी रात्री घरासमोर गाडी लावण्याच्या क्षुल्लक कारणावरून दोन्ही कुटुंबातील वाद पुन्हा उफाळून आला. यावेळी पवन बानाईत याने धारदार शस्त्राने रघुनाथ गाडे यांच्यावर निर्घृणपणे सपासप वार केले. त्याने वडिलांना वाचवण्यासाठी आलेल्या गोपाल गाडे याच्या पोटातही शस्त्राने वार करून गंभीर जखमी केले. गाडे कुटुंबीयांनी जखमींना खामगाव येथील उप जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले.

उपचार सुरू असतानाच रघुनाथ गाडे यांचा मृत्यू झाला तर गोपाल गाडे याची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला अकोला येथे हलविण्यात आले. त्याची प्रकृती अत्यवस्थ असून डॉक्टर त्याचे प्राण वाचविण्यासाठी शथीर्चे प्रयत्न करीत आहे.

याप्रकरणी मृत रघुनाथ गाडे यांचा पुतण्या मनोहर गाडे याने खामगाव ग्रामीण पोलीस ठाणे येथे तक्रार दिली. खामगाव ग्रामीण पोलिसांनी आरोपी पवन दशरथ बानाईत, मनोरमा दशरथ बानाईत, दशरथ आत्माराम बानाईत, मोहन दशरथ बानाईत या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास उपनिरीक्षक रांची पुसाम करत आहेत. या घटनेमुळे शेलोडी गावात तणाव निर्माण झाला असून खामगाव ग्रामीण पोलीस परिस्थिती वर नजर ठेवून आहे.

**: लोकसेवार्थ :**

## अपंगांचे पुनर्वसन करणारी हेल्पर्स ऑफ दि हॅन्डीकॅप्ड

हेल्पर्स ऑफ दि हॅन्डीकॅप्ड ही कोल्हापूर शहरात स्थापन झालेली एक स्वयंसेवी संस्था आहे. मुख्य उद्देश म्हणजे अपंगांच्या सर्वांगीण पुनर्वसन कार्यासाठी १९८४ साली कोल्हापूरमध्ये हेल्पर्स ऑफ दि हॅन्डीकॅप्ड या स्वयंसेवी संस्थेची स्थापना झाली.

या संस्थेच्या संस्थापिका-अध्यक्षा डॉ. नसीमा मोहम्मद अमीन हुरजूक यांना वयाच्या १६व्या वर्षी पराकोटीचे शारीरिक अपंगत्व आले. जिद्दीने आणि घरच्यांच्या सहकार्याने त्यांनी स्वतःचे आयुष्य पुन्हा उभे केले. दोन्ही पायांना पोलिओ असलेल्या तसेच कोल्हापुरातील प्रसिद्ध गायिका रजनी करकरे-देशपांडे या व्यक्तीशी नसीमा यांची मैत्री झाली. त्यांचे गुरू बाबूकाका दिवाण याच्या प्रेरणेने अपंगांच्या पुनर्वसनासाठी दोघी कार्यरत झाल्या. या कार्यात त्यांना मनोहर देशभ्रतार तसेच पी.डी. देशपांडे यांसारखे काही सहकारी, हितचिंतक व देणगीदारही मिळाले.

अपंगाचे शारीरिक, मानसिक, शैक्षणिक, आर्थिक, वैवाहिक आदि सर्वांगीण पुनर्वसन करणे, त्यासाठी आवश्यक सोयी, सुविधा उपलब्ध करून देणे, जनजागृती करणे, अपंगांना स्वावलंबी व समाजासाठी उपयुक्त घटक बनवून सक्षम बनवणे हे संस्थेचे ध्येय आहे.

सुरुवातीला कोल्हापुरातच संस्थेत येणाऱ्या अपंगांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना वैद्यकीय मदत, कृत्रिम साधने मिळवून देणे



लोकजागर

अशा स्वरूपाचे काम सुरू झाले. घरोंदा वसतिगृह तथा पुनर्वसन केंद्र हे उंचगाव पूर्व, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथे कोल्हापूरपासून ९ किमी अंतरावर आहे. इथे अपंगांना स्वावलंबी होता येईल अशा आवश्यक सुविधांचा विचार केला गेला आहे. शेजारीच संस्थेची समर्थ विद्यामंदिर (बालवाडी ते ८वी) व समर्थ विद्यालय (९वी व १०वी) शाळा आहेत.

अपंग-सुदृढ यांना एकत्र शिक्षण देणाऱ्या या शाळेत समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थी शिक्षण घेतात.

संस्थेचे अपंगार्थ व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, उंचगाव, कोल्हापूर येथे आहे. येथे सर्व प्रकारची कृत्रिम साधने आणि शाळा व ऑफिससाठी लागणारे फर्निचर बनविले जाते. स्वप्ननगरी - गाव-मोरे, पो. वाडोस, ता.कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथे शिक्षणापासून वंचित राहिलेल्या वा बौद्धिक अक्षमतेमुळे शिक्षण पूर्ण करू न शकलेल्या तसेच रोजगाराची आवश्यकता असणाऱ्या अपंगांच्या सक्षमीकरणासाठी व्यावसायिक पुनर्वसन केंद्र चालू आहे.

येथेच लाजवाब काजू प्रक्रिया प्रशिक्षण केंद्रही आहे. १००हून अधिक अपंग व्यक्तींना इथे रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे संस्था मुख्यालयात येणाऱ्या लाभार्थ्यांची मोफत नोंदणी होते. त्यानंतर आवश्यकतेनुसार त्यांना मदत केली जाते. २०१५ सालापर्यंत संस्थेने २५,०१९ लाभार्थ्यांना साहाय्य पुरविले आहे. एकूणच हेल्पर्स ऑफ दि हॅन्डीकॅप्ड सारखी संस्था ही अपंगांच्या पुनावार्ससाठी सातत्याने सक्रीय असलेली एक सामाजिक संस्था असून अशा संस्थेचा आदर्श घेऊन समाजात आणखी नव्या संस्था उभ्या राहतील हीच अपेक्षा.

■ ■ ■

### शब्दार्थ

**OK**

ओके 'OK' हा असा शब्द आहे, जो जवळपास प्रत्येकजण या शब्दाचा वापर करतो. हा शब्द आपण दिवसभरात किती वेळा वापरतो हे अनेकांना माहितही नसतं. एखाद्या गोष्टीवर आपली संमती व्यक्त करण्यासाठी किंवा एखादी गोष्ट करण्यास 'हो' म्हणण्यासाठी आपण 'OK' शब्द वापरतो. मात्र, अनेकदा वापरल्या जाणाऱ्या या शब्दाचा अर्थ नेमका काय याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? All Correct साठी 'OK' हा शब्द वापरला जातो. येथे All Correct' बदलून Oll Korrect" केले आहे. त्यामुळेच पूर्ण फॉर्म ह्यAll Correct' असला तरी AC या शब्दाऐवजी OK वापरला जात आहे. याचा सरळ अर्थ असा होतो की ओके म्हणजे 'ऑल करेक्ट'. मात्र, बरेच लोक ओके ची स्पेलिंग 'Okay' अशी लिहितात. ■

## बांबूची वर्ल्डक्लास सायकल

भोर गावाजवळ आपल्या डोंगरावर इंडियन एयरफोर्स आणि इतर खासगी विमान कंपन्यांमध्ये पायलट म्हणून आपली कारकीर्द करताना कॅप्टन शशिशेखर पाठक यांच्या मनात समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा होती. बांबूपासून काहीतरी उपयुक्त प्रॉडक्ट बनवून तिथल्या लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा विचार त्यांच्या मनात घोळत होता आणि त्याद्दष्टीने त्यांचं संशोधन सुरू होतं. त्याचवेळेला टेलिव्हीजनवर बांबूपासून सायकल कशी बनवायची याबाबत माहिती त्यांनी बघितली आणि या सायकलची घंटी त्यांच्या मनात वाजायला लागली.

कापलेले बांबू, विविध हत्यारं, सायकलचे विविध सुटे पार्ट, ग्लू एक ना दोन गोष्टींनी दोन वर्ष घराचीच प्रयोगशाळा करून त्यांनी एक सायकल तयार केली. जिची मेन फ्रेम बांबूची होती आणि इतर सगळे पार्ट्स इंपोर्टेड होते. मनासारखी सायकल तयार झाल्यावर शशिशेखर आनंदाने आपल्या मित्राला ती दाखवायला गेले ते अक्षरशः हवेवर स्वार होऊनच. कारण हलकेपणा आणि धक्के शोषून घेण्याच्या बांबूच्या गुणधर्मामुळे रस्त्यावरचे खड्डे त्यांना जाणवलेच नाहीत.

या सायकलची किंमत एका लाखापासून पुढे सुरू होते. मूळ उद्देश हा वर्ल्ड क्लास प्रॉडक्ट बनवण्याचा आहे. आपल्याकडचे सायकल उत्पादक कॉस्ट कॉन्शस आहेत. बांबूचीसाठी लागणारे हायली इंजिनीयर्ड प्रॉडक्ट बाहेरून मागवले जातात. या सायकलची फ्रेम बांबूची असते. त्यामुळे हलकेपणा, लवचिकता आणि टिकाऊपणा हे बांबूचे गुणधर्म या सायकललाही लागू होतात. त्यामुळे बांबूचीची सायकल सफर म्हणजे ओव्हरऑल एक सुपिरियर एक्सपिरीयन्स असतो. सायकल किंवा इतर वाहनं घेताना कुठलही चेकिंग करण्यासाठी पर्यायच बाजारात उपलब्ध नाहीत. थोडेसे पैसे जास्त घातले तर तुमच्या मापाची तुम्हाला पूर्णताः आरामदायी अशी बांबूची सायकल घेता येऊ शकते. ही सायकल पर्सन टू पर्सन हायली कस्टमाइज्ड असते. उच्च दजार्ची कारागिरी आणि तांत्रिकद्दष्ट्या परिपूर्णता हे बांबूचीचं वैशिष्ट्य आहे. सायकलची मुख्य फ्रेम बांबूची असते. सगळे हायली इंजिनीयर्ड पार्ट्स बाहेरच्या देशांमधून मागवले जातात. ही सायकल चालवताना त्या व्यक्तीला पूर्णताः आरामशीर राईडअनुभवता यावी याची पूर्णतः काळजी घेतली जाते.



■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# एवढे क्रौर्य कुठून आले?

### भुजबळांचा सभागृहात सवाल

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :** राष्ट्रवादीचे नेते व माजी मंत्री छगन भुजबळ यांनी महाराष्ट्रात सुरू असलेल्या गुन्हेगारीवरून छगन भुजबळ यांनी विधानसभेत जोरदार हल्लाबोल केला.



मागच्या काही दिवसांत महाराष्ट्रात ज्या घटना घडत आहेत, खरेतर संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. यंत्राचा, तंत्राचा, मंत्राचा हा महाराष्ट्र आपण म्हणतो. संतांचा हा महाराष्ट्र ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंत. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते संभाजी महाराजांचे पोवाडे आपण गातो, तो आपला हा महाराष्ट्र. या महाराष्ट्राला कोणाची तरी द्दष्ट लागली.

काही महिन्यातले काही प्रकरणे आहेत. बीडचे प्रकरण संतोष देशमुख, ते तर पहावत नाही. त्याचा आपण सगळ्यांनी निषेध केला, जी काही कठोर शिक्षा व्हायला पाहिजे ती झालीच पाहिजे. परभणीमध्ये संविधानाची मोडतोड केली, म्हणून आंदोलन झाले. सोमनाथ सूर्यवंशी पोलिस कस्टडीत मृत्यू पावला. त्याची आपण चौकशी करणार नाही? प्रकरणात जे आवाज उठवत होते ते म्हणतात जाऊ द्या, ते परभणीचे प्रकरण आपण त्यांना जाऊ देऊ. त्यांना माफ करा. पण का? ते माणसं नाहीत? तो मागासवर्गीय आहे म्हणून? दलित समाजाचा आहे म्हणून? संविधान सगळ्यांसाठी सारखे आहे न? अशा सवालांची बौछार भुजबळ यांनी सभागृहात केली.

# मुंडे-कराडाची एकत्र जमीन

### अंजली दमानियांचा पुन्हा आरोप

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :** अंजली दमानिया यांनी ट्विट करत धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांची एकत्र जमीन! असल्याचा दावा केला आहे. जमीनीचा सातबाराच त्यांनी आपल्या सोशल मिडीयावर प्रसारित केला. अन्‌ म्हटलंय की, हे घ्या धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांच्यातील आर्थिक सख्य



किती आहे याचे धडधडीत पुरावे. कंपनी एकत्र, जमीन एकत्र जगमित्र शुगर्स चे 6 सातबारे मी डिजिटली डाउनलोड केले 3554 गुंठे जमीन (88 एकर 34 गुंठे) जमीन एकत्र असल्याचा दावा केला आहे. यामुळे आता धनंजय मुंडेंच्या जमीनवर जप्ती येणार का असा सवाल राजकीय वतुर्ळात उपस्थित होत आहे.

# राज्यभरातील एसटी कर्मचारी रस्त्यावर

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ५ :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे (एसटी) कर्मचारी बुधवारी (५ मार्च २०२५) राज्यभरातील आगार वा एसटी महामंडळाच्या कार्यालय परिसरात आंदोलन करत आहे. वर्ष २०२० रोजी पगारवाढ जाहीर झाल्यावरही महामंडळासह शासन कामगारांवर कसे अन्याय करत आहे, त्याबाबत आंदोलकांनी महत्वाचा भाष्य केले आहे.

नागपुरातील एसटी महामंडळाच्या गणेशपेठ आगार आणि एसटी महामंडळाचया प्रादेशिक कार्यालय परिसरात एसटी कामगारांकडून बुधवार ५ मार्च रोजी दुपारी आंदोलन सुरू झाले. महाराष्ट्र एस. टी. कामगार संघटनेच्या नेतृत्वात हे आंदोलन होत आहे. आंदोलनाचे नेतृत्व करणारे महाराष्ट्र एस. टी. कामगार संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अजय हट्टेवार म्हणाले, नागपूर विभागात सर्व आठ आगारे, विभागीय कार्यशाळा व विभागीय कार्यालय



येथे कामगारांच्या न्याय हक्कासाठी हे आंदोलन होत आहे.

शासनाने एस टी कामगारांना पाच महीन्यापूर्वी दिलेल्या पगार वाढीत नमूद केलेल्या कालावधी नुसार पगार वाढ दिली नाही. विविध संघटनांच्या संयुक्त कृती समीती सोबत महामंडळ व शासनासोबत झालेल्या चर्चेनुसार एप्रिल २०२० पासून पगार वाढ शासनाने जाहीर केली.

परंतू प्रत्यक्ष देते वेळी एप्रिल २०२४ पासून दिली व एस टी कामगारांची फसवणूक झाली. तसेच या सोबतच अनेक मागन्या सुद्धा प्रलंबित आहे. त्यामुळे न्याय हक्कासाठी एसटीच्या कामगारांना हे आंदोलन करावे लागत आहे.

शासनासह एसटी महामंडळाने तातडीने मागण्या मान्य न केल्यास हे आंदोलन भविष्यात तिव्र केले जाणार असल्याचा इशाराही हट्टेवार यांनी दिला. दरम्यान राज्यात सर्वत्र हे आंदोलन होत असल्याचेही हट्टेवार यांनी सांगितले. नागपुरातील आंदोलनात एसटी सोसायटीचे अध्यक्ष प्रशांत बोकडे, संघटनेचे अध्यक्ष जगतीश पाठमासे, सचिव प्रज्ञाकर चंदनखेडे, इतर पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या

महामंडळाने सन २०१६- २०२० मध्ये केलेल्या एकतर्फी केलेल्या करारातील उर्वरीत रक्कमेचे वाटप करावे, एसटी कर्मचाऱ्यांना २०१८ पासूनची महागाई भत्त्याची थकबाकी द्यावी, शासकीय कर्मचारी यांचे प्रमाणे ५३ टक्के वाढीव महागाई भत्ता देण्यात यावा, करारानुसार ३ टक्के वार्षिक वेतन वाढीची थकबाकी द्यावी, ८ टक्के, १६ टक्के, २४ टक्के नुसार घरभाडे भत्त्याची थकबाकी देण्यात यावी, जाचक शिस्त व आवेदन पद्धत रद्द करून नविन पद्धत सुरू करावी, प्रवासी भाडेवाढ पूर्वी प्रमाणे ५ रुपयांच्या पटीत करावी आणि इतरही एकूण १६ मागण्या शासनाकडे आंदोलकांकडून करण्यात येत आहे.